ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष - ३२ वे अंक - २० वा मार्च - २०१६ किंमत रु. ५०/-



विशेषांक

## भारतातील उच्च शिक्षण : प्रश्न आणि आव्हाने

* अतिथी संपादक *
डॉ. सरोज आगलावे
प्रा. संदीप चौधरी
डॉ. अशोक बोरकर

# मराठी समाजशास्त्र परिषद

( नोंदणी क्र. महाराष्ट्र/२७-८३ औरंगाबाद )

** द्वारा **

समाजशास्त्र विभाग,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

** कार्यकारी मंडळ **

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. स्मिता अवचार |
| सचिव | : | प्रा. बालासाहेब शेंडगे |
| खजिनदार | : | डॉ. बी. एन. कावळे |
| सदस्य | : | डॉ. डी. डी. घोडगे |
| | | प्रा. सरोज आगलावे |
| | | प्रा. एम. एस. शिंदे |
| | | डॉ. गजानन वेल्हे |
| | | प्रा. विकास शेवाळे |
| | | डॉ. सुधाकर जाधव |
| | | डॉ. धनराज पाटील |
| | | डॉ. अमोल पाटील |
| | | प्रा. प्रवीण घोडेस्वार |
| | | प्रा. शिवाजी उकरंडे |
| | | प्रा. डी. एच. उराडे |


डॉ. स्मित

समाजशा

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष - ३२ वे अंक - २० वा मार्च - २०१६ किंमत रु. ५०/-

**मुख्य संपादक :** डॉ. स्मिता अवचार
**कार्यकारी संपादक :** प्रा. बालासाहेब शेंडगे
डॉ. बी. एन. कावळे
**अतिथी संपादक :** डॉ. सरोज आगलावे
प्रा. संदीप चौधरी
डॉ. अशोक बोरकर

**संपादक समिती सदस्य :**
डॉ. अशोक बोरकर डॉ. दीपक पवार,
प्रा. संदीप चौधरी डॉ. राहुल भगत,
डॉ. जयेंद्र पेंडसे डॉ. राजेंद्र कांबळे,

**संपादकीय सल्लागार मंडळ :**
डॉ. उत्तमराव भोईटे डॉ. द. ना. धनागरे
डॉ. प्रदीप आगलावे डॉ. बी. के. स्वाईं

**संपर्क पत्ता :**
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
व्दारा : समाजशास्त्र विभाग, डॉ.बा.आं.म.वि.,औरंगाबाद
www.msp-maha.com
E mail : sanshodhanpatrika@gmail.com

**टंकण व मांडणी :**
के. दत्ता कॉम्प्यु आर्ट, दत्ता कोल्हारे ०९८६०६७८४५८

टीप : या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ तसेच प्रकाशक, मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

**नवीन शैक्षणिक धोरणात संशोधन आणि नवप्रवर्तनाची गरज**
डॉ. प्रदीप आगलावे ... ७
**राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियान : एक दृष्टिक्षेप**
प्रा. संदीप चौधरी ... ११
**भारतातील उच्च शिक्षण : वास्तव आणि परिणाम**
डॉ. दादासाहेब उत्तमराव मोटे ... १५
**उच्च शिक्षणाचे वर्तमान स्वरूप**
डॉ. दीपक कृष्णराव पवार ... २१
**भारतातील उच्च शिक्षणाची वर्तमान स्थिती**
डॉ. राहुल भगत ... २७
**भारतातील उच्च शिक्षणातील समस्या**
डॉ. अशोक बोरकर ... ३२
**लिंगभाव आणि उच्च शिक्षणातील आव्हाने**
प्रा. डॉ. धनंजय सोनटक्के ... ३७
**उच्च शिक्षणात महिलांचे वाढते प्रमाण**
डॉ. नलिनी बोरकर ... ४१
**उच्च शिक्षणात दलित महिलांची भूमिका**
डॉ. ए. आर. वागडव ... ४५
**भारतातील उच्च शिक्षणातील अध्यापनाचे स्वरूप**
प्रा. जयेंद्र पेंडसे ... ४८
**उच्च शिक्षणातील समकालीन संदर्भ**
प्रा. डॉ. मोहन नगराळे ... ५३
**पुस्तक परीक्षण**
डॉ. सरोज आगलावे ... ५६
**२५व्या अधिवेशनाचा अहवाल** ... ५८

# संपादकीय

भारतातील उच्च शिक्षण ही एक व्यापक स्वरूपाची व्यवस्था असून मनुष्यबळ मंत्रालयातर्फे संचालन केले जाते. मुळातच भारतीय उच्च शिक्षण ही बहुआयामी अशी संकल्पना आहे. पारंपरिक, व्यावसायिक, तंत्रविज्ञानात्मक शिक्षण, कृषीविषयक, वैद्यकीय शिक्षण अशा अनेक घटकांनी बनलेली आहे. मनुष्यबळ विकासाच्या दृष्टीने उच्च शिक्षण हे मोलाची कामगिरी बजावत असते म्हणून कोणत्याही देशाची उच्च शिक्षण व्यवस्था ही अधिक निकोप आणि समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचणारी असावी अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. भारतातील उच्च शिक्षण त्याला अपवाद नाही. सर्वसमावेशी धोरण आखून तळागळातील लोकांना सामावून घेण्याची प्रक्रिया सातत्याने सुरू आहे. कुशल मनुष्यबळ निर्माण करणे, सुजाण नागरिक बनवणे आणि राष्ट्रीय मूल्यांची रुजवणूक करणे या प्रमुख अधिकांना लक्षात घेऊन भारतीय उच्च शिक्षणाची वाटचाल सुरु आहे. नुकतेच केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने रुसा अर्थात उच्चतर शिक्षा आयोग देशभर लागू केला आहे. त्यामार्फत सर्व केंद्रीय आणि प्रादेशिक विद्यापीठे व महाविद्यालयांना योग्य त्या प्रमाणात अनुदान वाटपाचे काम सुरू आहे.

कोणत्याही समाज व्यवस्थेचे महत्त्वाचे अंग म्हणून शिक्षण व्यवस्थेकडे पाहिले जाते. उच्च शिक्षण तर अत्यंत महत्त्वपूर्ण अशी व्यवस्था असते. या व्यवस्थेमध्ये अनेक वेळेला काही समस्या निर्माण होत असतात. त्याचे परिणाम समाजाला भोगावे लागतात. उच्च शिक्षणाची ही व्यापकता लक्षात घेऊन **'उच्च शिक्षण : प्रश्न आणि आव्हाने'** या विषयाला अनुसरुन मराठी समाजशास्त्र परिषदेच्या संशोधन पत्रिकेचा हा विशेषांक तयार करण्यात आला आहे.

या विशेषांकामध्ये एकूण ११ शोधनिबंधांचा समावेश करण्यात आला आहे. भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेवर या शोध निबंधांमध्ये चार उपविषयांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. पैकी पहिल्या विभागात उच्च शिक्षणातील नवीन शैक्षणिक धोरण आणि उच्च शिक्षण अभियान या विषयावरील लेखांचा समावेश आहे. दुसऱ्या विभागात भारतातील उच्च शिक्षणाचे स्वरूप आणि सद्यस्थिती स्पष्ट करणारे चार शोधनिबंध आहेत. तिसऱ्या विभागात उच्च शिक्षण आणि लिंगभाव या उपविषयावरील तीन शोधनिबंधांचा समावेश करण्यात आला आहे. तर चौथ्या विभागात उच्च शिक्षणातील अध्यापनाचे स्वरूप या उपविषयातील दोन लेखांचा

समावेश करण्यात आला आहे.

प्रा. डॉ. प्रदीप आगलावे यांनी 'नवीन शैक्षणिक धोरणात संशोधन आणि नवप्रवर्तनाची गरज' या शोध निबंधात भारत सरकारच्या मानव संसाधन आणि विकास मंत्रालयाने देशाचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार करण्याच्या संदर्भात मागविण्यात अलेल्या सूचनांच्या अहवालानुसार संशोधन आणि नवप्रवर्तन या विषयावर चिंतन केले आहे. मानव समाजाच्या विकासासाठी संशोधनाची नितांत आवश्यकता असून आंतरविद्याशाखीय संशोधनावर भर देण्याची आवश्यकता प्रतिपादित केली आहे.

प्रा. संदीप चौधरी यांनी 'राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियान : एक दृष्टिक्षेप' या शोध निबंधात उच्च शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन घडवून आणू शकणाऱ्या 'रूसा' या योजनेवर प्रकाशझोत टाकला आहे. रूसा मुळे उच्च शिक्षण व्यवस्था अधिक व्यापक, विस्तृत आणि शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचणार असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले आहे. रूसाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास भारताच्या उच्च शिक्षणाचे स्वरूप मोठ्या प्रमाणावर बदलून ते जागतिक पातळीशी स्पर्धा करू शकेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे.

'भारतातील उच्च शिक्षण : वास्तव आणि परिणाम' या शोध निबंधात प्रा. डॉ. दादासाहेब मोटे यांनी उच्च शिक्षणाचा व्यापक आढावा घेतला असून ज्ञान निर्मिती, ज्ञान प्राप्ती, ज्ञान प्रसार या उच्च शिक्षणाच्या ब्रीदवाक्याची सद्यस्थितीतील आवश्यकता स्पष्ट केली आहे. विद्यार्थ्यांअभावी महाविद्यालये बंद पडतात की काय? अशी भीती व्यक्त केली आहे.

डॉ. दीपक पवार यांनी 'उच्च शिक्षणाचे वर्तमान स्वरूप' या शोध निबंधात देशातील उच्च शिक्षणाची सद्यस्थिती स्पष्ट केली आहे. विशेषत: उच्च शिक्षणात वंचितांना स्थान नसल्यामुळे देशाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे सोदाहरण स्पष्ट केले आहे.

'भारतातील उच्च शिक्षणाची वर्तमान स्थिती' या निबंधात डॉ. राहुल भगत यांनी भारतातील उच्च शिक्षणाच्या संख्यात्मक आढावा घेतला आहे. त्याचप्रमाणे मनुष्यबळ विकास मंत्रालयाने वेळोवेळी उच्च शिक्षणासंदर्भात केलेल्या आर्थिक तरतुदींचे विश्लेषण केले आहे.

'भारतातील उच्च शिक्षणातील समस्या' या शोध निबंधात डॉ. अशोक बेलकर यांनी वंचित वर्गाच्या उच्च शिक्षणातील अडचणी मांडल्या आहेत. तसेच उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्याची आवश्यकता स्पष्ट केली आहे.

प्रा. डॉ. धनंजय सोनटक्के यांनी 'लिंगभाव आणि उच्च शिक्षणातील आव्हाने' या विषयावरील निबंधात उच्च शिक्षणातील स्त्रियांचे प्रमाण स्पष्ट करून असे निरीक्षण नोंदविले आहे की, उच्च शिक्षणातील महिलांचे प्रमाण वाढत असले तरी लिंगभाव विषमता मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. त्यासाठी उच्च शिक्षणात लिंगभाव समानता हे मूल्य रुजविण्याची आवश्यकता स्पष्ट केली आहे.

'उच्च शिक्षणात महिलांचे प्रमाण' या शोध निबंधात डॉ. नलिनी बोरकर यांनी उच्च

शिक्षणातील राज्यनिहाय व शाखानिहाय महिलांचे प्रमाण स्पष्ट केले आहे. तसेच उच्च शिक्षणात पुरुषांच्या बरोबरीने महिला देखील आपली गुणवत्ता सिद्ध करीत आहेत असे निरीक्षण नोंदविले आहे.

'उच्च शिक्षणात दलित महिलांची भूमिका' या शोधनिबंधात प्रा. डॉ. ए. आर. वागडव यांनी उच्च शिक्षणातील दलित स्त्रियांच्या सद्यस्थितीवर प्रकाश टाकला आहे. त्यांचे उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण अधिक असल्याचे निरीक्षण नोंदविले आहे.

प्रा. जयेंद्र पेंडसे यांनी 'भारतातील उच्च शिक्षणातील अध्यापनाचे स्वरूप' या शोधनिबंधात उच्च शिक्षणातील अध्यापनाच्या विविध पद्धती, संशोधनाचे महत्त्व तसेच उच्च शिक्षणातील सक्रिय सहभाग या विषयांवर सखोल चिंतन केले आहे.

प्रा. डॉ. मोहन नगराळे यांनी शिक्षाणाद्वारे मानवी मूल्यांची प्रस्थापना करण्यासाठी समाजातील वंचितांना, सीमांत वर्गीयांना उच्च शिक्षण उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता 'उच्च शिक्षणातील समकालीन संदर्भ' या शोध निबंधात व्यक्त केली आहे.

अशा प्रकारे मुख्य विषयाला धरुन विविध उपविषयांद्वारे भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेवर या विशेषांकामध्ये चिंतन करण्यात आले आहे. वाचकांना, समाजशास्त्राच्या अभ्यासकांना निश्चितच स्वागतार्ह वाटेल ही अपेक्षा.

धन्यवाद.

अतिथी संपादक

डॉ. सरोज आगलावे

प्रा. संदीप चौधरी

डॉ. अशोक बोरकर

# नवीन शैक्षणिक धोरणात संशोधन आणि नवप्रवर्तनाची गरज

डॉ. प्रदीप आगलावे

**प्रस्तावना :**

भारतात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये तयार करण्यात आले होते. १९९२ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांत थोडा फार बदल करण्यात आला होता. परंतु त्यानंतर विविध क्षेत्रांत बरेच परिवर्तन झाले. त्यामुळे शिक्षणाच्या राष्ट्रीय धोरणांत परिवर्तन करण्याची आवश्यकता भासू लागली. भारतास ज्ञानाच्या संदर्भात समृद्ध बनविण्यासाठी गुणवत्ता, शिक्षण, नवपरिर्वन आणि संशोधन या बाबी अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. म्हणून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार करण्यासाठी भारत सरकारच्या मानव संसाधन आणि विकास मंत्रालयाने उच्च शिक्षणाच्या संदर्भात देशातील शिक्षणतज्ज्ञ आणि विविध क्षेत्रांतील लोकांकडून सूचना मागविल्या आहेत. उच्च शिक्षणाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण विषयाच्या संबंधात विचार विमर्श करण्याकरिता जनतेपुढे ते ठेवले आहेत.

उच्च शिक्षणाच्या संदर्भातील २० महत्त्वपूर्ण विषय हे पुढीलप्रमाणे आहेत – १) गुणवत्ता शिक्षणासाठी शासकीय सुधार २) संस्थांची रँकिंग आणि ॲक्रिडिटेशन ३) नियमनाची गुणवत्ता वाढविणे. ४) केंद्रीय संस्थानांची गती निर्धारक भूमिका. ५) राज्य सार्वजनिक विद्यापीठांचा दर्जा सुधारणे. ६) उच्च शिक्षणात कौशल्य विकासास सामील करणे. ७) मुक्त आणि दूरशिक्षण आणि ऑनलाईन अभ्यासक्रमांचे संवर्धन करणे, ८) प्रौद्योगिकी शिक्षणाची संधी, ९) क्षेत्रीय विषमता दूर करणे. १०) लिंग आणि सामाजिक विषमता दूर करणे. ११) उच्च शिक्षणास समाजाशी जोडणे. १२) सर्वोत्तम शिक्षक तयार करणे. १३) विद्यार्थी सहयोग व्यवस्थेस टिकवून ठेवणे, १४) भाषेच्या माध्यमातून सांस्कृतिक एकीकरणास प्रोत्साहन देणे. १५) खासगी क्षेत्रासोबत सार्थक भागीदारी. १६) उच्च शिक्षणास वित्त पुरविणे. १७) उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करणे. १८) शिक्षणास उद्योजकांशी जोडण्याकरिता उद्योग क्षेत्राशी संपर्क स्थापन करणे. १९) संशोधन आणि नवप्रवर्तनास प्रोत्साहन देणे. २०) नवीन ज्ञान संपादन करणे.

वरील २० विषयांच्या संदर्भात शिक्षणतज्ज्ञ आणि विविध क्षेत्रांतील लोकांच्या सूचना आल्यानंतर भारत सरकार नवीन शैक्षणिक धोरण तयार करणार आहे. डिसेंबर २०१६ पर्यंत शासनाचे शैक्षणिक राष्ट्रीय धोरण तयार करण्यात येईल. २० विषयांच्या संदर्भात काही महत्त्वपूर्ण प्रश्न तयार करण्यात आले आहेत. त्या प्रश्नांच्या अनुषंगाने लोकांना आपली मते आणि सूचना शासनाला द्यायच्या आहेत.

**संशोधन आणि नवप्रवर्तन :**

भारत सरकारच्या मानव संसाधन आणि विकास मंत्रालयान देशाचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार करण्याच्या संदर्भात २० मुद्दे किंवा विषय विचार

प्राध्यापक व विभागप्रमुख, डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग व डॉ. आंबेडकर अध्ययन, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर भ्रमणध्वनी ९८८१२६२६६०

विमर्षाकरिता जनतेसमोर ठेवले आहेत. त्या विषयापैकी संशोधन आणि नवप्रवर्तन हा एक महत्त्वाचा विषय आहे.

आज आपल्या देशातील विद्यापीठांत मोठ्या प्रमाणात संशोधन होत आहे. परंतु या संशोधनाचा गुणात्मक दर्जा हा अतिशय खालावलेला आहे. विद्यापीठ शिक्षण आयोगाने महाविद्यालयीन आणि विद्यापीठांतील शिक्षकांना संशोधनासाठी प्रोत्साहन दिले आहे. विशेष म्हणजे संशोधनास अधिक चालना मिळावी म्हणून पीएच.डी. करणाऱ्या शिक्षकांना जास्तीचे इन्क्रीमेंट दिले जाते. त्यामुळे महाविद्यालयीन असो किंवा विद्यापीठीय शिक्षक पीएच.डी.चे संशोधन करतात. परंतु त्यांच्या पीएच.डी.च्या संशोधनाचा दर्जा अतिशय निकृष्ट असतो. विशेषत: समाजविज्ञान, कला इत्यादी क्षेत्रांतील संशोधनाचा दर्जा खूपच निकृष्ट आहे. त्याकरिता संशोधन आणि नवप्रवर्तनास प्रोत्साहन देणे, त्यांची गुणवत्ता वाढविणे हा नवीन शैक्षणिक धोरणातील एक महत्त्वाचा मुद्दा आहे.

आपल्या देशातील संशोधनाचा दर्जा हा अतिशय निम्न आहे. ही बाब विद्यापीठ आयोगाने देखील मान्य केली आहे. या संदर्भात सखोल चिंतन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव आहे. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण होऊन, तो प्रत्येक गोष्टीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करुन त्याचे उत्तर किंवा कारण शोधण्याचा प्रयत्न तो करतो. शिक्षणाचा उद्देशच हा सत्याचा शोध घेणे हा आहे. पाश्चात्य देशांमध्ये तेथील विद्यार्थी असो किंवा शिक्षक असो, त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टी आहे. त्यामुळे पाश्चात्य देशांतील महाविद्यालये आणि विद्यापीठांतून मोठ्या प्रमाणात सशोधन कार्य होते. नवनवीन विषयाच्या संदर्भात ते संशोधन करुन अनेक शोध लावतात. परंतु आपल्या देशात वैज्ञानिक दृष्टीच नाही. त्यामुळे ज्ञानाच्या क्षेत्रात नवप्रवर्तन आढळून येत नाही.

मुंबई शासनाने मुंबई विद्यापीठ सुधारणा प्रश्नांचे अध्ययन करुन त्यावर अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठ सुधार समिती १९२४ मध्ये स्थापन केली होती. या समितीने विद्यापीठ शिक्षणाचे ध्येय आणि कार्ये, वर्तमान विद्यापीठ शिक्षण यंत्रणेतील उणिवा, विविध जाती-जमातींत सांस्कृतिक आदानप्रदान व सलोख्याचे संबंध सुधारण्याबाबत विद्यापीठाची भूमिका, परीक्षानुवर्ती विद्यापीठाला शिक्षणानुवर्ती विद्यापीठात कसे परिवर्तीत करता येईल? उच्च शिक्षण व संशोधन या क्षेत्रात विद्यापीठाचे योगदान, विद्यापीठ आणि समाज, विद्यापीठ व शासन यांचे परस्पर संबंध, विशिष्ट जाती-जमातींत विद्यापीठ शिक्षणाच्या प्रचार-प्रसारासाठी उपययोजना, विद्यापीठाचा अभ्यासक्रम इत्यादी विषयांच्या संदर्भात प्रश्नावली तयार करुन देशातील निवडक ३२१ व्यक्तींकडे त्यांचे विचार जाणून घेण्यासाठी पाठविण्यात आली होती.[१] त्या निवडक व्यक्तीपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक होते. त्यांनी या प्रश्नांच्या संदर्भात मुंबई विद्यापीठ पुनर्रचना समितीपुढे १५ ऑगस्ट १९२४ रोजी आपली लेखी साक्ष दिली होती.

त्या लेखी साक्षीत डॉ. आंबेडकरांनी विद्यापीठाच्या शिक्षणाच्या संदर्भात स्पष्टपणे प्रतिपादन केले होते की, "विद्यापीठांत दिले जाणारे शिक्षण समाजाभिमुख असावे, ते विज्ञाननिष्ठ आणि पक्षपात विरहित असावे. कोणत्याही विशिष्ट समाज घटकांच्या

हितसापेक्ष नसावे. शिक्षणाचा उद्देश वस्तुस्थितीपूरक माहिती पुरविणे किंवा काही सिद्धांत शिकविणे हा नसावा. तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होईल, त्यांच्या मानसिक, बौद्धिक क्षमतांची वाढ होईल, प्रस्थापित अधिकारी विद्वानांच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण करण्यास ते समर्थ होतील, प्रथम सूत्राचा शोध घेऊन ते आवश्यक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतील, त्यांच्या मनात कोणत्याही विषयाविषयी जिज्ञासा निर्माण होऊन, ज्याद्वारे सखोल अध्ययनाच्या प्रवृत्ती निर्माण होतील, त्याचप्रमाणे सत्याचा शोध घेणे किती अवघड आहे याची त्यांना जाणीव होईल, तरीही त्या मार्गावर जाणे किती आवश्यक आहे ते त्यांना जाणवेल."

पुढे डॉ. आंबेडकर म्हणतात की, "एखाद्या विचाराचा किंवा संकल्पनेचा स्वीकार किंवा अस्वीकार करण्यापूर्वी त्याने विवेकनिष्ठ विचार करावा. मौलिक स्वरूपाचे शोध कार्य करणारा विद्यार्थी होण्यापेक्षा मौलिक संशोधन कशा प्रकारे केले जाते हे जाणून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. याची जाणीव त्यांना व्हावी. त्याने उपलब्ध पुराव्यांचे योग्य मूल्यमापन करावे, त्याने तर्काचा पाठपुरावा करावा. त्यावर टीका करावी. तसेच अधिकारी विद्वानांच्या मतांवर भाष्य करावे. या सर्वांसाठी विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित करणे हे विद्यापीठ शिक्षणाचे ध्येय असावे."[२]

डॉ. आंबेडकरांनी विद्यापीठ शिक्षणाचे ध्येय कोणते असावे हे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांमध्ये संशोधन कार्याची आवड निर्माण करण्यासाठी तशा क्षमता त्यांच्यामध्ये विकसित करण्याचे कार्य विद्यापीठाने केले पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी १९२४ मध्ये संशोधनाच्या संदर्भात मांडलेले विचार आजही प्रासंगिक आहेत. मौलिक संशोधन करण्याची प्रवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली तरच तो श्रेष्ठ दर्जाचे संशोधन करील आणि अनेक नवप्रवर्तक अशा गोष्टी तो निर्माण करू शकेल. एखाद्या विषयाचे सखोल अध्ययन करुन सत्याचा शोध घेण्याची प्रवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे महत्त्वाचे आहे. परंतु ही जाणीव निर्माण झाली नाही, म्हणून आपल्या विद्यापीठांतील संशोधनाचा दर्जा अतिशय निकृष्ट आहे.

नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने संशोधन आणि नवप्रवर्तनाच्या संदर्भात काही प्रश्न शिक्षणतज्ज्ञ आणि लोकांच्या विचार-विमर्शाकरिता विचारण्यात आले आहेत.

प्राथमिक शिक्षणापासून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टी विकसित केली पाहिजे. विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांना संशोधन आणि नवप्रवर्तनाबाबतची माहिती द्यावी. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची प्रवृत्ती निर्माण करण्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये अनुकूल वातावरण निर्माण करावे. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रोत्साहन देऊन मौलिक संशोधनाबाबत त्याला योग्य प्रकारे मार्गदर्शन केले पाहिजे. त्यामुळे संशोधन आणि नवप्रवर्तनास आपोआप प्रोत्साहन मिळेल. शिक्षकांच्या संशोधनाचा दर्जा ठरविण्यासाठी विद्यापीठ स्तरावर एक मूल्यांकन समिती स्थापन करण्यात यावी. संशोधनाचा विशेषत: सामाजिक आणि कला शाखेतील संशोधनाचा दर्जा ठरविण्यासाठी मानक निश्चित करण्यात यावे.

वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणारा अभ्यासक्रम प्राथमिक शिक्षणापासून तर विद्यापीठ स्तरापर्यंत असावा. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण होऊन त्यांची संशोधन क्षमता विकसित होईल. विद्यार्थ्यांना संशोधनाबाबत मार्गदर्शन करणारे संशोधन केंद्र

महाविद्यालयीन स्तरावर असावे. त्याचप्रमाणे शिक्षकांना देखील संशोधनाबाबतचे मार्गदर्शन करणारे केंद्र असावे.

उच्च शिक्षणात संशोधन आणि नवप्रवर्तनास प्रोत्साहन देणाऱ्या अभ्यासक्रमांचा समावेश असावा. हा अभ्यासक्रम प्रत्येक विद्यार्थ्यांस बंधनकारक असावा. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणात लघु संशोधन प्रकारच अनिवार्य करण्यात यावा. त्यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनाची आवड निर्माण होऊन, पुढे श्रेष्ठ दर्जाचे ते संशोधन करू शकतील.

खासगी एजन्सींना विद्यापीठ संशोधन आणि नवप्रवर्तनाचे महत्त्व पटवून देणे. विद्यापीठांतील संशोधन आणि नवप्रवर्तक देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे. तसेच खासगी एजन्सींना देखील त्या संशोधनाचा कसा उपयोग होईल, याची त्यांना खात्री पटवून द्यायला पाहिजे.

अ) समाज विज्ञान आणि मूलभूत विज्ञान या दोन्हीसाठी उदार संशोधन अनुदान देण्यात यावे.

ब) परिणामांवर आधारित संशोधनास आर्थिक मदत देणे.

क) वैचारिक संपत्ती निर्माण करणाऱ्या संशोधनावर भर देणे.

ड) केंद्रीय शिक्षण संस्थांमध्ये संशोधन पार्क तयार करणे.

ई) शिक्षकांची संयुक्त नियुक्ती ही संशोधन कार्यास शिकविणे आणि शिक्षकांना संशोधन करण्यास समर्थ बनविते.

प) आंतर-शाखा संशोधन-विद्यमान विविध शाखांच्या आंतरविभागीय स्तरावर नवीन ज्ञानाची निर्मिती करण्यासाठी संस्थांनी एकत्रित यावे.

फ) नवप्रवर्तन संशोधनासाठी मूळ राशीसहित इन्क्युबेशन केंद्र (Incubation Centre) स्थापन करणे.

संशोधन आणि नवप्रवर्तनास प्रोत्साहन देण्यासाठी वरील सर्वच गोष्टींची नितांत गरज आहे.

कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशातील संशोधन आणि त्यांच्या विकासावर अवलंबून असते. ही बाब लक्षात घेऊन समाज, कला, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रांत संशोधन झाले तर देशाची आर्थिक प्रगती शक्य आहे म्हणून विविध क्षेत्रांत संशोधन प्रकल्प तयार करण्यात यावेत.

मानव समाजाच्या विकासासाठी संशोधनाची गरज आहे. कोणत्याही देशातील संशोधन हे केवळ त्या देशापुरतेच मर्यादित राहत नाही. त्याचा उपयोग जगातील सर्वच मानव समाजासाठी होतो. भारतात संशोधनाच्या विकासाकरिता निधीची गरज आहे. त्याकरिता मानव कल्याण आणि मानवतावादी दृष्टिकोनातून आपण विदेशी निधी मिळवू शकतो.

अशा प्रकारे नवीन शैक्षणिक धोरणातील संशोधन आणि नवप्रवर्तनास प्रोत्साहन देण्यासाठी वरील प्रश्नांच्या अनुषंगाने मांडलेले विचार आणि सूचनांचा स्वीकार व्हायला पाहिजे.

**संदर्भ :**

1 ) Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches, Vol.2, Deptt. of Education,Government of Maharashtra, Mumbai, P.P.

2) Ibid, P.

* * *

# राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियान : एक दृष्टिक्षेप

**प्रा. संदीप चौधरी**

प्रस्तावना :

शिक्षण ही एक समाजाची उपव्यवस्था असून या उपव्यवस्थेच्या माध्यमातून समाजाला अपेक्षित कुशल मनुष्यबळ निर्माण करणे, समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वे घडविणे आणि व्यक्तींचे सामाजिकीकरण करणे इत्यादी महत्त्वपूर्ण कार्ये केली जातात. शिक्षण हा कोणत्याही देशाच्या दृष्टीने त्यामुळेच महत्त्वाचा घटक ठरतो. भारतात देखील शिक्षण व्यवस्थेवर सातत्याने विविध आयोग आणि योजना यांच्या माध्यमातून प्रकाशझोत टाकण्यात येतो. त्याचप्रमाणे शिक्षण व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्याचा सतत प्रयत्न केला जातो. अगदी प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत विविध आयोगांनी त्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. शिक्षण हा घटक मुनष्यबळ विकासात अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. देशाच्या विकासात विकसित मनुष्यबळाचे महत्त्वपूर्ण योगदान असते. देशातील प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत करण्याच्या उद्देशाने 'सर्व शिक्षा अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानामुळे प्राथमिक शिक्षण हे समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचले आहे. त्याचप्रमाणे गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आवश्यकता या अभियानामुळे पूर्ण होत आहे. माध्यमिक शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा घडवून आणण्यासाठी 'राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान' राबविण्यात येत आहे.या दोन्ही योजनांची यशस्विता लक्षात घेऊन उच्च शिक्षण व्यवस्थेला अधिक व्यापक आणि विस्तृत करण्यासाठी उच्च शिक्षणावर विशेष लक्ष केंद्रित करणारा 'राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियान' (RUSA) २०१३ पासून राबविण्यात येत आहे.

देशाच्या एकूण लोकसंख्येत युवकांची संख्या ही मोठ्या प्रमाणावर आहे. विशेषत: १८ ते २३ या वयोगटातील युवकांची संख्या लक्षणीय आहे. परंतु या सर्वांनाच उच्च शिक्षण घेता येत नाही. परिणामी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाचा विकास होताना दिसत नाही. देशात उच्च शिक्षणातील एकूण नोंदणीचे प्रमाण केवळ १९.४ टक्के एवढेच आहे. हे प्रमाण निश्चितच भुषणावह नाही. एवऐच नव्हे तर मागास सामाजिक समूहांचे उच्च शिक्षणातील नोंदणीचे प्रमाण सरासरीपेक्षाही कमी आहे. अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांनी उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. लिंगभावाच्या आधाराने उच्च शिक्षणातील प्रमाण लक्षात घेतले तर मोठ्या प्रमाणावर असमानता दिसून येते. देशातील पुरुषांचे उच्च शिक्षणातील नोंदणीचे प्रमाण हे २०.९ टक्के इतके आहे तर महिलांचे प्रमाण केवळ १६.५ टक्के इतकेच आहे. अशा प्रकारच्या सामाजिक विषमतेचा विचार करुन रुसाची योजना करण्यात आली आहे.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) या उच्च शिक्षणाच्या शिखर संस्थेतर्फे देशातील विद्यापीठे आणि महाविद्यालये यांना अनुदान दिले जाते. परंतु हे अनुदान केवळ १२B आणि २(f) अंतर्गत नोंदणी केलेल्या विद्यापीठे अथवा महाविद्यालयांना दिले जात होते. त्यामुळे देशातील हजारो शैक्षणिक संस्था या विकासापासून वंचित राहत होत्या. रुसामुळे देशातील ३०६४ राज्य विद्यापीठे आणि जवळपास ८५०० महाविद्यालये यांना आर्थिक लाभ मिळत आहे. ग्रंथालये, प्रयोगशाळा, तसेच अध्यापकांच्या नियुक्त्या करण्यासाठी अनुदान देण्यात येत आहे.

पूर्वी केवळ केंद्र शासन पुरस्कृत उच्च शिक्षण संस्थांनाच मोठ्या प्रमाणावर अनुदान मिळत होते. परंतु रुसाअंतर्गत केंद्र पुरस्कृत संस्था, राज्य पुरस्कृत संस्था, अभिमत विद्यापीठे आणि खासगी संस्था अशा सर्व प्रकारच्या संस्थांना अनुदान मिळते. देशभरातील उच्च शिक्षण

सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद

देणाऱ्या संस्थांना रुसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. परिणामी उच्च शिक्षणाची कक्षा ही अधिकाधिक रुंदावणार असून उच्च शिक्षणातील एकूण नोंदणीचे प्रमाण वाढणार आहे.

रुसाचा प्रमुख उद्देश हा उपलब्धता (Access), समानता (Equity) आणि उत्कृष्टता (Excellence) या तत्त्वांना अनुसरुन ठरविण्यात आला आहे. केंद्राप्रमाणे राज्यातील संस्थांनी उच्च शिक्षणाची संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी उचलली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. उच्च शिक्षण जास्तीत जास्त युवकांना सामावून घेणारे असले पाहिजे. त्याचप्रमाणे समाजातील सर्व स्तरांतील घटकांना उच्च शिक्षण घेण्याची समान संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. जात, धर्म, लिंग, आर्थिक स्तर या आधारावर कोणीही उच्च शिक्षणापासून वंचित राहता कामा नये असा याचा अर्थ आहे. थोडक्यात समाजातील तळागळातील वंचित घटकांना उच्च शिक्षण घेण्याची समान संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे उच्च शिक्षणात उत्कृष्टता आणण्याचा कसोशीने प्रयत्न करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण अथवा शिक्षणातील उत्कृष्टता यामुळेच मनुष्यबळ निर्माण होईल. गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणामुळ समाजात विविध पदांवर, विविध क्षेत्रांत गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाची गरज भागवता येईल.

रूसा उच्च शिक्षण संस्थांच्या समान विकासासाठी कटिबद्ध आहे. उच्च शिक्षणातील मर्यादांना ओळखून त्यावर मात कशी करता येईल याचा विचार देखील येथे करण्यात आला आहे. उच्च शिक्षणातील सकल प्रवेश नोंदणीचे प्रमाणावर १९.४ टक्क्यांवरुन ३२ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. हे उद्दिष्ट बाराव्या योजनेच्या अंतापर्यंत अर्थात २०१७ पर्यंत गाठण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तसे झाल्यास देशातील फार मोठा युवावर्ग उच्च शिक्षण प्रक्रियेत सामावला जाईल यात शंका नाही.

पूर्वीच्या धोरणांमध्ये बदल करुन राज्यातील शिक्षण संस्थांनाही विकास करण्याची समान संधी रुसाद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. या संस्थांचे गुणात्मक मूल्यमापन करण्याची योजना यामध्ये आहे. राज्यातील शिक्षण संस्थांना संख्यात्मक विकास करण्यास साहाय्य करण्याबरोबरच नियोजन आणि नियमन करणारी व्यवस्था निर्माण करण्यात येत आहे. राज्यस्तरावरील अशा नियमन व्यवस्थेमुळे शिक्षण व्यवस्थेत विकेंद्रीकरणाची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. राज्य पुरस्कृत विद्यापीठांना अधिक स्वायत्तता देण्याची देखील तरतूद यामध्ये आहे. थोडक्यात राज्यातील शैक्षणिक संस्थांना स्वनियमन, विकेंद्रीकरण आणि स्वशासन याद्वारे सक्षम करण्याचा प्रयत्न आहे. उच्च शिक्षण संस्थामधील शैक्षणिक आणि परीक्षा पद्धतील सुधारणा करण्याची हमी देण्यात आली आहे. देशातील काही विद्यापीठांचे रूपांतर 'संशोधन विद्यापीठे' म्हणून करण्याचे देखील उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यामुळे अशी संशोधन विद्यापीठे ही जागतिक पातळीवरील उत्कृष्ट संशोधन संस्था ठरू शकतील.

रूसामध्ये चार महत्त्वपूर्ण गोष्टींचा समावेश हा एकूणच राज्यांमधील पर्यायाने देशातील उच्च शिक्षणाची भावी दिशा स्पष्ट करण्यासाठी पुरेशा आहेत.

**१. समावेशी धोरण ( Inclusive Policy ) : केंद्र सरकारच्या तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या** 'समावेशी धोरणाचे' प्रतिबिंब रूसामध्ये ठळकपणे पाहावयास मिळते. या धोरणानुसार वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामावून घेण्याचे तत्त्व मान्य करण्यात आले आहे. मात्र धोरणाचा भाग म्हणून उच्च शिक्षणातील समानता हे मूल्य विकसित करण्याचा आणि वृद्धिंगत करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि सामाजिक, शैक्षणिक मागास वर्गांना उच्च शिक्षणाचा पुरेशा संधी उपलब्ध करुन देण्याचे अभिवचन देण्यात आले आहे. संधींची समानता मिळवून देण्याचा प्रयत्न राहणार आहे. एवढेच नाही तर उच्च शिक्षणातहल महिलांचे प्रमाण वाढविणे, अल्पसंख्याक आणि विशेष योग्यता असलेल्या व्यक्तींचे समावेशन करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची निकड व्यक्त केली आहे. त्यासाठी विविध योजनांची आखणी करण्यात आली आहे. त्यासाठी विशेष सवलती, शिष्यवृत्ती घोषित करण्यात आल्या आहेत.

२. **प्रादेशिक असमानता कमी करणे :** उच्च शिक्षणातील प्रादेशिक असमानता दूर करण्याचे व्यापक धोरण रूसामध्ये आखण्यात आले आहे. मागास भौगोलिक क्षेत्रात उत्कृष्ट शैक्षणिक संस्थांचे जाळे निर्माण करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला आहे. आतापर्यंत मोठ्या शहरांमध्ये उच्च शिक्षण संस्था उभारण्याने धोरण बाजूला करुन मागास क्षेत्रातील विद्यार्थ्यांना न्याय देण्याचे धोरण यामागे दिसून येते. मागास भागातील तसेच दूरस्थ भागातील शैक्षणिक संस्थांना अधिक उत्तम करण्याची योजना यामध्ये अंतर्भूत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण संस्था या लहान शहरे, निम शहरे आणि ग्रामीण भागांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण देऊन त्यांना स्पर्धेसाठी सक्षम बनविणे हा त्यामागील उद्देश आहे.

**३. संशोधन आणि नावीन्यपूर्णतेला प्रोत्साहन :**

उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधनप्रधान असे वातावरण निर्माणक रुन नावीन्यपूर्णता जोपासण्याची हमी या अभियानामध्ये देण्यात आली आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. संशोधन आणि विकास या दोन संकल्पना अधिक दृढ करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे. विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी सतत नवोन्मेषणशीलतेचा ध्यास घ्यावा यासाठी योग्य त्या पायाभूत सुविधा आणि वातावरण निर्माण करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

**४. क्षमता विकास साधणे :**

उच्च शिक्षणात गुणवत्तेचे अध्यापक नियुक्त करण्याचे योजले आहे. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ प्राध्यापकांची नेमणूक करण्यासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे पुरेसे तज्ज्ञ अध्यापक नियुक्त करता येतील. त्याचप्रमाणे उच्च शिक्षण क्षेत्रातील मनुष्यबळाच्या मदतीने विविध स्तरांवरील रोजगारक्षम क्षमता विकास करण्याचे ध्येय ठरविण्यात आले आहे.

विद्यापीठांवरील परीक्षांची जबाबदारी कमी करुन त्यांना अध्यापन, संशोधन आणि संलग्नित महाविद्यालयांतील अध्यापकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रोत्साहित करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यामुळे निव्वळ परीक्षा मंडळे ही विद्यापीठांची प्रतिमा बदलून सकारात्मक, नावीन्यपूर्ण आणि मनुष्यबळ विकासाची कामगिरी करण्यास कटिबद्ध अशी प्रतिमा निर्माण होण्यास मदत होईल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे रोजगारक्षम आणि स्पर्धायोग्य पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. विद्यार्थी निर्माण करण्यासाठी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर विशेष भर देण्यात आला आहे. त्यासाठी अनुदान हे फलाभिमुख आणि परिणामकारकता यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. विविध प्रकारच्या समान संधींच्या योजना एकत्रितपणे राबविण्यात येणार आहेत, नियोजनशून्य विस्ताराऐवजी व्यवस्था केंद्रित विकासाला महत्त्व देण्यात आले आहे. तसेच उपरोक्त सांगितल्याप्रमाणे संशोधन आणि नावीन्यपूर्णता यावर विशेष भर देण्यात आला आहे.

**रुसा - अंमलबजावणीतील समस्या :**

व्यापक समाजहित लक्षात घेऊन रुसाची आखणी करण्यात आली असली तरी रुसाच्या अंमलबजावणीतील संभाव्य समस्यांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. रुसाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासकीय पातळीवर उपाय योजना कराव्या लागतील. त्याचबरोबर समाजातील विविध घटकांना विश्वासात घ्यावे लागेल. रुसाची चौकट ही केवळ व्यवस्थापनाभिमुख किंवा प्रशासकीय राहता कामा नये तर ती अधिकाधिक विद्यार्थीभिमुख व्हायला हवी. तसेच केवळ अनुदान वाटप करणारी योजना न राहता विकास योजना म्हणून यशस्वी व्हावी. म्हणून रुसाच्या अंमलबजावणीतील विविध समस्यांचा देखील विचार करायला हवा. त्यातही काही प्रमुख समस्या या पुढील प्रमाणे मांडता येतील.

१. रुसामध्ये विस्ताराला महत्त्व देण्यात आले आहे. देशातील युवा वर्गाला मोठ्या प्रमाणावर उच्च शिक्षणात सामावून घेण्याची योजना आहे. उच्च शिक्षणातील प्रवेश नोंदणीचे प्रमाण वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. परंतु येथील मूळ अडचण अथवा समस्या अशी आहे की, उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीचे प्रमाण खूप मोठे आहे. शहरी भागांपेक्षाही ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती मोठ्या प्रमाणावर आहे. विशेषत: कला आणि

वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीचे प्रमाण लक्षणीय आहे. उच्च शिक्षणातील या समस्येवर उपाय शोधण्याचे काम रुसांतर्गत करावे लागेल. भविष्यात रुसाचे नुतनीकरण करताना या समस्येचा विचार करावा लागेल अन्यथा रुसाच्या मूळ हेतूलाच धक्का बसेल.

२. रुसामध्ये तज्ज्ञ शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर नियुक्ती करण्याचे नियोजन आहे. परंतु एकूणच भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती पाहता उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्राध्यापकांची असंख्य पदे रिक्त आहेत. अगदी जागतिक पातळीवर देखील भारतातील या समस्येची दखल घेण्यात आली आहे. म्हणून जागतिक क्रमवारीत भारतातील उच्च शिक्षण संख्या टिकाव धरू शकत नाहीत. पुरेसे तज्ज्ञ प्राध्यापक असणे हा या क्रमवारीतील महत्त्वाचा निकष आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्थान, व्यवस्थापन संस्थान यामध्ये देखील प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. तर देशभरातील लहान शहरे आणि ग्रामीण भागातील महाविद्यालयांमध्ये शिक्षकांची असंख्य पदे रिक्त आहेत. रुसामुळे अनेक नव्या संस्था निर्माण होणार आहेत. त्याठिकाणी तज्ज्ञ प्राध्यापकांची गरज भासणार आहे. प्रशासनाची इच्छाशक्ती प्रबळ झाल्याखेरीज रिक्त जागा भरल्या जाणार नाहीत. या समस्येवर विशेष लक्ष द्यावे लागेल.

३. रुसाच्या नियमाप्रमाणे प्रत्येक राज्याने उच्च शिक्षणातील परीक्षांची जबाबदारी घेणारे एक परीक्षा मंडळ स्थापन करावे अशी अपेक्षा आहे. जेणेकरुन विद्यापीठे अध्यापन आणि संशोधन यावर अधिक लक्ष देऊ शकतील. परंतू अनेक राज्यांनी अद्याप अशा प्रकारे परीक्षा मंडळे स्थापन केलेली नाहीत. त्याप्रमाणे स्वायत्त संस्थांमध्ये रुपांतरित होण्यास फारसा प्रतिसादही मिळालेला नाही. विद्यापीठावरील संलग्न महाविद्यालयांची जबाबदारी देखील एक त्रासदायक बाब ठरली आहे. यावर देखील अतिशय धिम्या गतीने उपाय शोधण्याचे काम सुरू आहे.

४. राज्य पातळीवर सर्व विद्यापीठांवर नियंत्रण ठेवणारी आणि नियमन करणारी शिक्षण परिषद स्थापन करावी अशी शिफारस रुसामध्ये करण्यात आली आहे. परंतु अनेक राज्यांनी अद्याप अशा प्रकारची तज्ज्ञांचे शिक्षण परिषद स्थापन केलेली नाही. त्यामुळे प्रत्येक विद्यापीठ हे वेगवेगळी ध्येय धोरणे राबविताना दिसते आहे.

५. रुसाचा महत्त्वाचा भाग म्हणजे राज्य पातळीवरील संस्थांना थेट अनुदान वाटप करणे होय. परंतु रुसाचा मूळ उद्देशच अनेक ग्रामीण भागांतील संस्थांना अद्याप कळालेला नाही. त्यांचे प्रस्ताव मंजूर होतात त्यांना वेळेवर अनुदान मिळू शकत नाही. त्यामुळे रुसाची अंमलबजावणी हा मोठा अडथळा ठरत आहे.

याशिवाय प्रशासकीय उदासीनता, शासनाचे शिक्षण क्षेत्राकडे होणारे दुर्लक्ष, राजकारण्यांचे हितसंबंध, यामुळे देखील रुसाच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये अडथळे निर्माण होत आहेत. येत्या काही वर्षांत रुसा मध्ये नियोजनबद्ध सकारात्मक सुधारणा केल्यास रुसाच्या अंमलबजावणीतील अडथळे दूर करणे शक्य होईल.

**समारोप :**

थोडक्यात 'रूसा' हे भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेतील महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. थोड्या केंद्रीय संस्थांना मिळणारे अनुदान हे खालच्या स्तरापर्यंत पोहोचणार असून संधीची उपलब्धता, समानता आणि उत्कृष्टता असा त्रिवेणी संगम या अभियानामध्ये पाहायला मिळतो आहे. विशेषत: राज्य पातळीवरील उच्च शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. एकंदरीत विविध संस्थांचा विस्तार, विकास आणि नव्या संस्थांची स्थापना तेही दुर्लक्षित भागांत करण्यात येणार आहे. उच्च शिक्षणातील समावेशी धोरणामुळे वंचितांना समान संधी मिळणार आहे. त्यामुळे मनुष्यबळ विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून रूसाकडे पाहायला हवे. रूसाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास भारताच्या उच्च शिक्षणाचे स्वरूप मोठ्या प्रमाणावर बदलून ते जागतिक पातळीवर स्पर्धा करणारे मनुष्यबळ निर्माण करू शकेल. परिणामी राष्ट्राचा विकास घडवून आणण्यात मोलाची भूमिका बजावू शकेल.

**संदर्भ :**

१. MHRD (2013), New Delhi : Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan : National Higher Education Mission.

* * *

# भारतातील उच्च शिक्षण : वास्तव आणि परिणाम

डॉ. दादासाहेब उत्तमराव मोटे

भारतीय समाजातील शिक्षण व्यवस्थेला प्राचीन स्वरूपाची परंपरा आहे. प्राचीन काळामध्ये बिहारमधील तक्षशिला आणि नालंदा ही विद्यापीठे शिक्षणासाठी प्रसिद्ध असल्याचे आणि जगभरामधून विद्यार्थी तेथे शिक्षण घेण्यासाठी येत असल्याचे दाखले इतिहासामध्ये आढळतात. याचा अर्थ प्राचीन काळातील शिक्षण पद्धती ही समाजाला अनुकूल आणि पोषक स्वरूपाची होती.

सद्यस्थितीत भारतातील शिक्षण पद्धतीच्या संदर्भात विचार करावयाचा झाल्यास त्याची विभागणी आपणास स्वांतत्र्यपूर्व काळातील शिक्षण पद्धती आणि स्वांतत्र्योत्तर काळातील शिक्षण पद्धती अशा दोन कालखंडांत करता येईल. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचीच दुरवस्था होती. हंटर कमिशनमधील शिक्षणाच्या संदर्भातील सूचना लक्षात घेऊन महात्मा फुले यांनी "प्राथमिक शिक्षण वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत मोफत आणि सक्तीचे असले पाहिजे"[१] अशी मागणी केली होती. उच्च शिक्षणाच्या संदर्भात फारशा सुविधा उपलब्ध नव्हत्या. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांचे साम्राज्य, त्यांची धोरणे, एकछत्री अंमल निर्माण करण्यासाठी त्यांचे चाललेले प्रयत्न त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी त्यांच्या सोयीची शिक्षण पद्धती राबविली असे म्हंटले जाते. ब्रिटिशकालीन शिक्षण पद्धती ही 'कारकुनी' स्वरूपाची होती अशाही प्रकारचा उल्लेख केला जातो. याठिकाणी स्वांतत्र्यपूर्व काळातील शिक्षण पद्धतीचा अधिक ऊहापोह न करता स्वांतत्र्योत्तर कालखंडामध्ये शिक्षण पद्धतीमध्ये जे व्यापक मूलभूत स्वरूपात बदल घडवून आणण्याचे प्रयत्न झाले, त्याचे शिक्षण व्यवस्थेवर आणि एकूणच समाज व्यवस्थेवर काय परिणाम झाले, आजची शिक्षणाची स्थिती / अवस्था काय आहे, विशेषत: उच्च शिक्षणाची स्थिती काय आहे हे मांडण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन निबंधामधून केलेला आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात विविध पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून आवश्यक आर्थिक निधीची तरतूद करुन शिक्षण प्रक्रियेमधील बदलांना आपण प्रारंभ केला. 'शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे, व्यक्तीच्या जडणघडणीचे प्रमुख साधन' हे मूलभूत उद्दिष्ट मानून शिक्षण व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदलांना सुरुवात केली. केंद्र शासनाच्या पातळीवर पंचवार्षिक योजनांच्या अंतर्गत विविध आयोगांची निर्मिती / स्थापना हा त्याचाच परिपाक मानता येईल. डॉ. राधाकृष्णन आयोग, डॉ. मुदलियार आयोग, डॉ. भोर आयोग, १९६६ चा कोठारी आयोग अशा विविध आयोगाच्या माध्यमातून आलेल्या सूचना / शिफारशी आणि त्यांची अंमलबजावणी यामधून शिक्षण प्रक्रियेला कांही अंशी गती मिळालेली दिसून येते. डॉ. डी.एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय शिक्षण आयोगाने "शिक्षण हे राष्ट्राच्या विकासाचे प्रभावी माध्यम आहे अशी भूमिका घेऊन शिक्षणाच्या उद्दिष्ठांची, शैक्षणिक आकृतिबंधाची आणि कार्यपद्धतीची पुनर्मांडणी केली होती."[२] शिक्षण प्रक्रियेच्या संदर्भात त्या-त्या काळामध्ये स्थापन झालेले वरील आयोग, शिक्षण व्यवस्थेच्या संदर्भात भारतभर त्यांनी केलेली पाहणी, अहवालांमधून त्यांनी केलेल्या सूचना, त्या सर्वांचे शासकीय व्यवस्थेकडून पालन झाले, सर्व सूचनांचा / शिफारशींचा स्वीकार झाला अशातील भाग नाही. याहीपेक्षा थोड्या फार सूचना / शिफारशी सोडल्या तर बाकी शिफारशींना केराची टोपली

समाजशास्त्र विभागप्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंबड, जि. जालना.
ई-मेल : dada.mote77@gmail.com

दाखविली. असाच प्रकार घडून आल्याचे लक्षात येते. १९६६ च्या डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखालील आयोगाने लैंगिक शिक्षणाबद्दलची शिफारस अहवालात केली होती. इतकी महत्त्वाची सूचना असतानाही त्याकडे दुर्लक्ष झाले, त्याचे परिणाम अद्यापही आपण भोगत आहोत. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या तीन दशकांमध्ये शिक्षण व्यवस्थेकडे तितक्या गंभीरतेने आपण पाहिले / लक्ष दिले असे वाटत नाही.

शिक्षण व्यवस्थेच्या संदर्भात आपल्याकडे भारतीय समाजव्यवस्थेत हे असे चित्र असताना जागतिक पातळीवर विशेषत: युरोपीय राष्ट्रांमध्ये शैक्षणिक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल घडून येत होते. संगणक आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात ही राष्ट्रे वेगाने प्रगती करीत होती. जागतिक पातळीवरील ही स्थिती लक्षात घेऊन भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९८४ पासून राजकीय अर्थव्यवस्थेमध्ये विविध बदलांना सुरुवात केली. "संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाचे जागतिक पातळीवरील महत्त्व लक्षात घेऊन राजीव गांधी आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनी दूरदृष्टीने देशाच्या औद्योगिक आणि आर्थिक धोरणांत उदारीकरणाच्या दिशेने पावले टाकण्यास सुरुवात केली. त्यांच्या कालावधीमध्ये आर्थिक-औद्योगिक विकासासाठी अनेक द्विपक्षीय करार झाले, त्याचाच परिणाम म्हणून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी आपणांस मिळाली."[३] राजीव गांधी भारताचे पंतप्रधान झाल्यानंतर भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेच्या प्रक्रियेमध्ये बदलांना सुरुवात झालेली असली तरी त्यांचा विशेष भर तांत्रिक शिक्षणावर होता, त्यामुळे इतर विद्याशाखांमधील बदलांना म्हणावी तशी गती मिळाली नाही असेच मानावे लागते.

**जागतिकीकरणाची प्रक्रिया :**

१९९१ मध्ये भारत देश जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट झाल्यानंतर उच्च शिक्षणाच्या प्रक्रियेला गती मिळण्यास प्रारंभ झाला असला तरी जागतिकीकीरण-उदारीकरण आणि खासगीकरण या प्रक्रियांनी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये अनेक प्रश्न नव्याने निर्माण केले. जागतिकीकरणामध्ये समाविष्ट होण्यापूर्वी महाराष्ट्रासारख्या प्रगत, पुरोगामी विचारसरणीच्या घटक राज्याने १९८० पासूनच 'विनाअनुदान धोरण' शिक्षण क्षेत्रामध्ये स्वीकारुन शाळा-महाविद्यालयांना मान्यता / परवानगी देण्यास सुरुवात केली होती. महाराष्ट्रामध्ये अद्यापही हे धोरण अंमलबजावणीत असल्याचे चित्र दिसून येते आहे. "ज्ञान निर्मिती आणि ज्ञानाधिष्ठित समाज हे शिक्षणाचे मुख्य प्रयोजन मानून 'व्यक्तिमत्त्व विकास, राष्ट्रीय विकास आणि ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मिती' ही तीन प्रमुख उद्दिष्टे मानली गेली."[४] या तीनही उद्दिष्टांमधील परस्पर संबंध लक्षात घेऊन त्या दिशेने वाटचाल होणे अपेक्षित होते.

राजकीय अर्थव्यवस्थेमध्ये होणाऱ्या बदलांमधून देशामध्ये आधुनिकीकरणाचे वारे वाहण्यास सुरुवात झाली. माहिती-तंत्रज्ञान आणि बहुराष्ट्रीय कंपन्या या दोन घटकांनी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला चालना दिली. जागतिकीकरणाने खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीला अधिक प्राधान्य दिल्याने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदे तोट्यात येत गेले. सरकारनेही सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकीमधून अंग काढून घेण्यास सुरुवात केली, याचा परिणाम म्हणून खासगीकरणाला चालना मिळाली. शासकीय व्यवस्थेने जागतिकीकरण-उदारीकरण या प्रक्रियांना जी गती दिली, धोरणांमध्ये त्यांना समाविष्ट केले त्याचा परिणाम भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेवरही झालेला दिसून येतो. खासगीकरणाच्या प्रक्रियेमधून विनाअनुदान तत्त्वाच्या धोरणानुसार अस्तित्वात आलेल्या वा शासनाने मान्यता दिलेल्या सर्वच विद्याशाखांतील उच्च शिक्षण संस्था, त्यांची फी आकारणी, सोयी-सुविधा, पायाभूत सुविधा यासारख्या विविध बाबी लक्षात घेतल्या तर भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेवरील हे परिणाम अतिशय दूरगामी आणि लक्षणीय स्वरूपाचे आहेत. शिवाय सरकारने सार्वजनिक क्षेत्रातून अंग काढून घेतल्याचे हे लक्षण आहे.

**उच्च शिक्षण क्षेत्राची सद्य:स्थिती आणि परिणाम:**

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात भारतीय पातळीवर

सध्या केंद्रीय विद्यापीठे, राज्य शासनाच्या अखत्यारीतील विद्यापीठे आणि अभिमत विद्यापीठे अशी त्रिस्तरीय उच्च शिक्षणाची रचना आहे. याव्यतीरिक्त ज्या संस्था राष्ट्रीयीकृत आहेत त्यांचे अस्तित्व वेगळे आहे. ज्यामध्ये आयआयटी (भारतीय तंत्रज्ञान संस्था), आयआयएम (भारतीय व्यवस्थापन संस्था), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स-बंगळुरू या आणि अन्य संस्थांचा समावेश होतो. "इ.स. २०१० पर्यंत भारतातील एकूण विद्यापीठांची संख्या जी ४१० इतकी होती ती आता ५०० पर्यंत पोंहचली असण्याची शक्यता आहे. विशेषत: अभिमत विद्यापीठांची जी संख्या वाढत चाललेली आहे त्यामधून हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता नाकारता यत नाही."[५] असे डॉ. द.ना.धनागरे यांनी नमूद केले होते. अंकिता मिश्रा (२०१३) यांनी त्यांच्या शोधनिबंधामध्ये नमूद केल्याप्रमाणे, "भारतात ६०० विद्यापीठे आहेत, ३३००० महाविद्यालये आहेत आणि २० मिलियन विद्यार्थी त्यांमधून शिक्षण घेत आहेत."[६] याचा अर्थ विद्यापीठांच्या संख्येमध्ये वाढ झालेली आहे. भारतातील कांही मोजक्या उच्च शिक्षण संस्था सोडल्या तर सर्व विद्यापीठांवर युजीसीचे (विद्यापीठ अनुदान आयोग) नियंत्रण आहे. युजीसीच्या नियंत्रणाखाली जी विविध विद्यापीठे कार्यरत आहेत त्यांनाही युजीसीकडून समान स्वरूपाची वागणूक मिळत नाही. राष्ट्रीयीकृत संस्था, केंद्रीय विद्यापीठे आणि राज्य शासनाच्या अखत्यारीमध्ये येणारी विद्यापीठे या तीनही पातळीवर विद्यार्थी-प्राध्यापक यांना मिळणाऱ्या सोयी-सवलती, सुविधा, आर्थिक लाभ, सेवानिवृत्तीची वयोमर्यादा, विद्यार्थी संख्येची अट, पायाभूत सुविधांसाठी दिले जाणारे आर्थिक साहाय्य/अनुदान आणि तत्सम बाबी याबाबतीत प्रचंड विरोधाभास आहे. जागतिकीकरण आणि खासगीकरणाच्या प्रक्रियेने ही तफावत वाढत चाललेली दिसून येते.

भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेच्या संदर्भात विविध मतमतांतरे असू शकतात, सकारात्मक-नकारात्मक मते / वादविवाद असू शकतात. परंतु त्यांची वास्तविकता ही लक्षांत घेतली पाहिजे. 'भारतातील शिक्षण : समस्या आणि त्यावरील उपाययोजना' या ग्रंथामध्ये डॉ.देसाई यांनी "पायाभूत सुविधांची कमतरता, जागतिक पातळीवर भारतातील उच्च शैक्षणिक संस्थांची घसरती श्रेणी, शैक्षणिक संस्था / विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांमध्ये समानता नसणे आणि शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा कायम राखण्याचा अभाव असणे, ज्ञानाधिष्ठित शिक्षणाचा अभाव असणे, उद्योगधंद्यांसाठी लागणारे शिक्षण आणि प्रत्यक्षात दिले जाणारे शिक्षण यात तफावत असणे, अधिक खर्चिक स्वरूपाची शिक्षण व्यवस्था आणि शासनाकडून अपुरा निधी मिळणे"[७] अशा विविध स्वरूपाच्या समस्यांची मांडणी केलेली आहे. ही मांडणी नकारात्मक स्वरूपाची वाटत असली तरी त्यातील सत्यताही लक्षात घेतली पाहिजे. कारण ती आपण प्रत्यक्षामध्ये अनुभवत आहोत. या समस्यांवर उपाययोजना असल्या तरी त्याची आखणी आणि अंमलबजावणी या संदर्भात प्रश्नचं निर्माण होतात. डीएनए च्या अहवालानुसार, "भारतामध्ये ९० मिलियन लोक वर्कफोर्समध्ये आहेत पण त्यातील बहुसंख्य अकुशल आहेत."[८] याचाच अर्थ उच्च शिक्षणामधून कुशल स्वरूपाचा वर्कफोर्स निर्माण होणे अपेक्षित आहे.

जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण या प्रक्रियांचे भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रावर जे परिणाम होत आहेत, वास्तव समोर येते आहे आणि त्यामधून शिक्षणाची जी सद्यस्थिती दिसत आहे, त्याबद्दलची काही निरीक्षणे मी खालील स्वरूपात नोंदवत आहे.

१. राजकीय व्यवस्थेतील नव्या आर्थिक धोरणांचा परिपाक म्हणजे व्यवसायाभिमुख उच्च शिक्षणावर आता अधिक भर देण्यात येऊ लागला आहे. "औद्योगिक आणि तांत्रिक विकासासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता यादृष्टीने तांत्रिक शिक्षणावर अधिक भर देण्याचे धोरण अवलंबल्याने खासगीकरणातून तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचे पेव फुटले. राजकारणी आणि नोकरशहा यांच्या संगनमताने खेड्यापाड्यांमध्ये तांत्रिक शिक्षणाची महाविद्यालये उभी राहिली. व्यावसायिक शिक्षणाच्या नांवाखाली पारंपरिक विद्याशांखाचे महत्त्व कमी होत गेले. पारंपरिक विद्याशाखांमध्ये शिक्षण घेऊन कोणत्याही प्रकारचे कौशल्य आत्मसात होत नाही असा डांगोरा पिटण्यामधून

बेगडीपणाने, जाहिरातीमधून तांत्रिक शिक्षणाकडे विद्यार्थी कसे आकर्षित होतील यासाठी प्रयत्न केले गेल्याचे दिसून येईल."[९] व्यावसायिक-तांत्रिक शिक्षणासाठी विनाअनुदान तत्त्वावर ज्या शिक्षणसंस्थांना परवानगी दिली गेली, त्यासंदर्भात नियमांचे पालन झाले काय? असाही प्रश्न उपस्थित होतो आहे. सद्यास्थितीमध्ये महाराष्ट्रमध्ये अशाही काही व्यावसायिक / तांत्रिक शिक्षण संस्था आहेत जेथे पायाभूत सुविधांची कमतरता आहे. सुसज्ज ग्रंथालय नसणे, विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पुरेसा स्टाफ उपलब्ध नसणे, त्यांना सेवा सवलतींचा लाभ न मिळणे असे किती तरी प्रश्न आहेत. पारंपरिक विद्याशाखांची महाविद्यालये तर कुठेही पावसाळ्यातील छत्रीसारखी उगवलेली दिसून येतात. इमारतीचा अभाव, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा अभाव, वर्ग खोल्यांचा अभाव, विद्यार्थ्यांचे प्रवेश पटावर, येत मात्र कोणीच नाही अशी अवस्था दिसते. अशा या वास्तविकतेमधून उच्च शिक्षणाची वर उल्लेखित केलेली उद्दिष्टे कितपत साध्य होतील याबद्दल शंका वाटते.

२. भारतीय पातळीवर उच्च शिक्षणामध्ये खासगी शिक्षणाचे वारे वाहण्यामधून तांत्रिक, पारंपरिक विद्याशाखा शिक्षणाची महाविद्यालये काढण्याची राजकारण्यांची आणि शिक्षण सम्राटांची एक फौजच निर्माण झाली. शासकीय धोरणानुसार विना अनुदान तत्त्वावर अशी महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी देण्यामधून एकीकडे संस्था चालकांचा वरचष्मा सातत्याने वाढत राहिला आणि दुसरीकडे शासनाने शिक्षण क्षेत्रामधून स्वत:चे अंग हळूहळू काढून घेण्यास सुरुवात केली. विनाअनुदान तत्त्वावर महाविद्यालये सुरु होण्यामधून संस्था चालकांचा मनमानी / अनागोंदी कारभार सुरू झाला.

३. 'ज्ञाननिर्मिती-ज्ञानप्राप्ती आणि ज्ञानप्रसार' हा एक शिक्षणाचा प्रमुख उद्देश मानून कारखाने, उद्योगधंद्यांसाठी कुशल / प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे हे ध्येय असले तरी खासगीकरणामधून उच्च शिक्षणाचे खासगीकरण त्यापेक्षा अधिक व्यापारीकरण झाल्याचे चित्र सर्वत्र दिसून येते. पारंपरिक विद्याशाखांपेक्षा तांत्रिक विद्याशाखा काढण्यावर अधिक भर दिला गेला आहे. खासगी शिक्षण संस्थांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण, शैक्षणिक दर्जाला अग्रक्रम, पायाभूत सुविधांची उपलब्धता, भव्य इमारत, सुसज्ज ग्रंथालय, क्रीडांगण, अनुभवी अध्यापक वर्ग यांच्या नावाखाली संस्था चालकांनी प्रचंड प्रमाणात माया जमविण्यास सुरुवात केली. शिक्षण क्षेत्रामध्ये संस्था चालकांची नफेखोरी सुरू झाल्यामुळे शैक्षणिक दर्जा, गुणवत्तेला हरताळ फासला गेला. ईशान्य भारतातील 'सीएमजे' (CMJ) विद्यापीठ हे त्याचे ताजे उदाहरण म्हणून देता येईल.

४. उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये खासगीकरणामधून विना अनुदान धोरणामुळे शिक्षण संस्था चालकांवर शासनाचे / सरकारचे कोणतेही नियंत्रण राहिले नाही. बहुतांशी पारंपरिक आणि तांत्रिक शिक्षण संस्था या राजकारणी लोकांच्या, राजकारणी आणि नोकरशहा यांचे हितसंबंध एकमेकांमध्ये गुंतलेले त्यामुळे शिक्षण अत्यंत महागडे झाल्याचे चित्र दिसत आहे. अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, बीबीए, बीसीए, एमसीए, वैद्यकीय विद्याशाखेच्या अंतर्गत येणाऱ्या विविध विद्याशाखा, डी.एड्., बी.एड्.सारख्या पदव्या आणि इतर व्यावसायिक व तांत्रिक शाखांमधील वेगवेगळे अभ्यासक्रम यांचे प्रवेश शुल्क लक्षात घेतले तर महागड्या शिक्षणाची कल्पना येऊ शकते. अभियांत्रिकी शाखेची दरवर्षीची प्रवेश फीस लक्षात घेतली तर पदवी प्राप्तीपर्यंतचा एकूण खर्च रुपये १० ते १५ लाखाच्या आसपास जातो. त्यातून पुन्हा संस्था चालकांच्या राखीव कोट्यांमधून प्रवेश म्हंटले की हा खर्च आणखीनच वाढतो. अभियांत्रिकी क्षेत्राची आताची सद्य:स्थिती लक्षात घेतली तर आता अशी स्थिती निर्माण झाली आहे की, एकट्या महाराष्ट्रमध्ये दरवर्षी अभियांत्रिकीच्या ४० ते ४५ हजार जागा रिक्त राहात आहेत. ग्रामीण भागातील अभियांत्रिकी महाविद्यालयांतील प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या शोधात गांवोगांव फिरतांना दिसून येत आहेत. डी.टी.एड्, बी.एड्. महाविद्यालये नावालाच शिल्लक राहिली आहेत. अभियांत्रिकीची पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या पदवीधरांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध नाहीत आणि एक वेळ अशी

येईल की, यातील बहुतांश कारखाने आपोआप बंद पडतील, त्यांना बंद करण्याची आवश्यकता भासणार नाही. अभियांत्रिकी शाखा लाखो अभियंत्यांची बेकारीची फौज निर्माण करते की काय? अशी भीती वाटते आहे.

५. राजकीय अर्थव्यवस्थेमधील बदलांना अनुसरुन शिक्षण व्यवस्थेमधील सर्वच विद्याशाखांमध्ये काळानुरूप परिवर्तन / बदल घडून येणे आवश्यक होते. मात्र एकीकडे तांत्रिक शिक्षणात प्रगती आणि दुसऱ्या बाजूला पारंपारिक विद्याशाखांमधील अधोगती हे चित्र समन्यायी वाटत नाही. शासकीय व्यवस्था, नोकरशाही यंत्रणा आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून आर्थिक निधी उलपब्ध करुन देतांना देखील राष्ट्रीयीकृत संस्था, केंद्रीय विद्यापीठांना भरघोस निधी मात्र राज्य शासनाच्या अखत्यारीतील पांरपरिक विद्यापीठांना कमी / अपुरा निधी त्यासाठ्ठी देखील अनेक हेलपाटे मारावे लागतात. ही वस्तुस्थिती आता लपून राहिलेली नाही. आर्थिक निधीची कमतरता असेल तर अशी पारंपरिक विद्यापीठे कशी उभी राहणार हा कायम अनुत्तरित प्रश्न आहे.

६. १९८० च्या दशकात महाराष्ट्र शासनाने विनाअनुदान धोरणाचे तत्त्व स्वीकारुन पारंपरिक विद्याशाखा आणि तांत्रिक विद्याशाखांच्या महाविद्यालयांना परवानगी दिली. विनाअनुदान धोरणाचे निकषही निश्चित केले. विना अनुदान तत्त्वांवर महाविद्यालय चालवावयाचे म्हंटले तरी त्यासाठी पायाभूत सुविधांची उपलब्धता, पात्रताधारक अध्यापक वर्ग, विद्यार्थी संख्या, विज्ञान विभागासाठी स्वतंत्र प्रयेगशाळा यांची नितांत आवश्यकता असते. महाविद्यालय सुरू करण्याच्या संदर्भात त्याचा प्राथमिक तपासणी अहवाल (एलआयसी रिपोर्ट) तयार करण्याची जबाबदारी विद्यापीठांची, नंतर तो अहवाल मान्यते / अमान्यतेसाठी शासनाकडे पाठविला जातो. मात्र राजकारणी, नोकरशहा आणि इतर अन्य हितसंबंधीयांच्या मदतीने ही प्रक्रिया बऱ्याच महाविद्यालयांबाबत उलट पद्धतीने झाली. कोणत्याही प्रकारच्या सोयी-सुविधा, पायाभूत संरचना नसताना संस्थाचालक / राजकारण्यांनी मंत्रालयातूनच महाविद्यालयांची परवानगी आणली. त्यामुळे विद्यापीठे देखील हतबल झाली. मंत्रालयातून परवानगी आणली म्हंटल्यानंतर विद्यापीठांना स्थानिक चौकशी समिति (थ्थ्) पाठवणे अनिवार्य झाले. यातील बरीचशी महाविद्यालये पायाभूत सुविधा, पात्रताधारक अध्यापक वर्ग नसतानाही सुरू झाली. अशा महाविद्यालयांमध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांचे भवितव्य काय राहिले असेल ते संस्थाचालक आणि विद्यार्थ्यांनाच माहीत. खासगीकरण, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विनाअनुदान धोरणाने मात्र कितीतरी पिढ्या गारद केल्या हे निश्चितपणे म्हणता येईल. संस्थाचालक भरमसाठ फीस आकारुन, डोनेशन घेऊन स्वत:च्या तुंबड्या भरत आहेत. मात्र प्रवेशित विद्यार्थ्यांचे काय या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही.

७. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण या प्रक्रियांच्या नावाखाली शिक्षणासारख्या अत्यंत पवित्र क्षेत्रात उच्च शिक्षणाचे धोरण, नियमन, गुणात्मक मूल्यांकन, शैक्षणिक दर्जा इ. च्या नावाखाली राज्यव्यवस्था आणि शासकीय यंत्रणांचा अवाजवी हस्तक्षेप वाढला आहे. यामधून राजकारणी आणि नोकरशहांच्या हातात आवश्यकतेपेक्षा अधिक सत्तेचे केंद्रीकरण झालेले आहे. या केंद्रीकरणाचा परिणाम संस्थांमध्ये काम करणारे कर्मचारी, प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थ्यांवर होतो आहे. महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक पदासाठी उमेद्‌वाराच्या अंगी आवश्यक शैक्षणिक पात्रता असतानाही त्यासाठी संस्थाचालकांकडून पैशाची बोली लावली जाते, त्यातून त्यांची निवड करवून घेतली जाते. विद्यार्थ्यांकडून फीस, देणगीच्या नावाखाली पैसे उकळले जातात. ही आजची वस्तुस्थिती आहे, मात्र यावर कोणाचेच नियंत्रण नाही. शिक्षणासारख्या क्षेत्रातील ही परिस्थिती कशी नियंत्रणात आणता येईल यासाठी कोणी प्रयत्न केल्याचे ऐकिवात नाही. यामधून शैक्षणिक दर्जा कसा उंचावणार, शैक्षणिक गुणवत्ता कशी वाढणार हा खरा प्रश्न आहे.

१९८० च्या दशकात सुरू झालेले विनाअनुदान धोरण, १९९१ मध्ये जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सामील झालेलो आपण सर्व भारतीय, जागतिकीकरणाच्या रेट्यातून

खासगीकरण आणि उदारीकरणाचे स्वीकारलेले धोरण त्याचे आता कांही दृश्य परिणाम दिसू लागले आहेत. २०१५-२०१६ च्या वर्षामध्ये पारंपरिक विद्याशाखांची महाविद्यालये आणि तांत्रिक शिक्षणाची महाविद्यालये यांची अवस्था काहीशा प्रमाणात गंभीर झालेली आहे. पारंपरिक विद्याशाखांच्या बाबतीत पदवी आणि पदव्युत्तर पातळीवर विद्यार्थी संख्या हजेरी पटावर दिसत असली तरी उपस्थितीचे प्रमाण अतिशय नगण्य आहे/चिंता करण्यासारखे आहे. पदव्युत्तर पातळीवर सेट / नेट / गेट परीक्षांचा निकाल पाहिला तर डोके गरगरुन जाण्याची वेळ येते. मागील ५ वर्षांत आपण काय केले याचा सारासार विचार न करता परीक्षा पद्धतीला दोष देऊन विद्यार्थी मोकळे होतात हे आजचे वास्तव आहे.

व्यावसायिक / तांत्रिक विद्याशाखांच्या महाविद्यालयांचा विचार करता आज अशी परिस्थिती दिसून येते की, महाविद्यालयांमधून पदवीपर्यंतचे शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना सेवा क्षेत्रात नाकरीची संधी उपलब्ध होत नाही 'इंजिनियर तयार करण्याचे कारखाने' असा महाविद्यालयांचा उल्लेख केला जातो. आजच्या स्थितीमध्ये विद्यार्थ्यांअभावी यातील बरेच कारखाने (महाविद्यालये) बंद पडतात की काय अशी भीती वाटते आहे. अशी महाविद्यालये चालू ठेवण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक गावोगावी विद्यार्थी मिळविण्यासाठी फिरत आहेत. डोनेशन तर सोडाच पण आहे त्या फीसमध्ये आणि त्यातही फीस भरण्यासाठी सवलत देऊन / फीसचे हप्ते करुन विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडे आकर्षित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत हे आजचे चित्र आहे.

'ज्ञाननिर्मिती-ज्ञानप्राप्ती-ज्ञानप्रसार' या शिक्षणाच्या प्रमुख ध्येयापासून दूर जाण्यामधून तर उच्च शिक्षणाची आजची अशी अवस्था झाली नाही ना? उच्च शिक्षणाच्या आजच्या अवस्थेमधून आपण कांही बोध घेणार आहोत काय? उच्च शिक्षणाच्या ध्येयाप्रत पोहोंचण्यासाठी शासन, नोकरशाही यंत्रणा, संस्थाचालक, प्राध्यापक, विद्यार्थी वर्ग आणि शिक्षणाशी संबंधित सर्वच घटक प्रामाणिकपणे / सचोटीने काम करतील काय? यासारख्या विविध प्रश्नांची उत्तरे काळच निश्चितपणे देईल असे वाटते.

**संदर्भसूची :**


१. फडके य.दि. (संपादक), २८ नोव्हेंबर १९९१, 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. २३१-२३२

२. धनागरे द.ना., २००१, समृद्धीच्या काठावर तहानलेले विद्यापीठ, किर्लोस्कर मासिक, वर्ष ८१, अंक१६०, पृ.७

३. तत्रैव, पृ.१३

४. भारत सरकार-१९९५, 'प्रायव्हेट युनिव्हर्सिटीज बिल', भारत सरकार शिक्षण विभाग, नवी दिल्ली.

५. धनागरे द.ना., २०१०, 'उच्च शिक्षण - ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे', लोकङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, पृ. १३.

6. Ankita Mitra, July 29, 2013, 'Present Position of Higher Education In India' www.education commission, The Views Paper, Page -7

7. Desai A.P., 2013, 'Education in India : Problems and Their Solutions', www.education commission, The Views Page, Page 12.

8. www., July 13, 2009, 'Education System In India: It's Gunctions, Frawbacks & It's Contribution', The Views Page (Editorial), Page-2

9 . कांबळे एन.टी. (संपादित), २०१३, उच्च शिक्षणापुढील आव्हाने, चिन्मन प्रकाशन, पैठण गेट, औरंगाबाद, पृ. ११३


* * *

# उच्च शिक्षणाचे वर्तमान स्वरूप

डॉ. दीपक कृष्णराव पवार

**प्रस्तावना :**

भारतात ब्रिटिशांनी उच्च शिक्षणाची व्यवस्था उभारली. त्यापूर्वी पारंपरिक शैक्षणिक पध्दती होती परंतु पाश्चात्य विद्यापीठीय यंत्रणा मेकॉलेच्या अहवालानंतर स्थापन झाली. भारतात उच्च शिक्षणाची सुरुवात १८५७ मध्ये स्थापन झालेल्या कलकत्ता, मुंबई व मद्रास विद्यापीठांतून झाली. १८६० च्या कायद्यान्वये या विद्यापीठांना पदविका देण्याची परवानगी मिळाली. १८८४ च्या कायद्यान्वये ही विद्यापीठे सन्माननीय पदव्या देऊ लागली. १९०२ ला भारतीय विद्यापीठ आयोग नेमण्यात आला. व १९०४ मध्ये भारतीय विद्यापीठ अधिनियम पास झाला. या कायद्याने सुचविलेले बहुतेक बदल भारतीयांना आवडले नाहीत. १९१३ मध्ये भारत सरकारने नवीन विद्यापीठांची स्थापना केली. ५ विद्यापीठांची संख्या १२ वर गेली. १९१७ मध्ये कलकत्ता विद्यापीठ आयोगाने उच्च शिक्षणाबाबत बऱ्याच शिफारशी केल्या, त्यानुसार शासनाने अंमलबजावणी केली. त्यामुळे शासनाचे विद्यापीठांना मिळणारे अनुदान वाढले व विद्यार्थी संख्या देखील वाढली. परंतु त्याचा उपयोग औद्योगिक क्षेत्राला झाला नाही. १९२५ मध्ये इंटर युनिव्हर्सिटी बोर्ड स्थापन झाले. १९३७-४७ या कालखंडात पुन्हा ४ नवीन विद्यापीठे आणि अनेक महाविद्यालये स्थापन झाली. त्यामुळे कृषी, तांत्रिक, वैद्यकीय आणि स्थापत्य क्षेत्रातील विद्यार्थी संख्या वाढली. पण ती देशातील गरजेच्या मानाने अपुरी होती. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४८ मध्ये डॉ. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. हा स्वतंत्र भारतातील उच्च शिक्षणातील विकासाकरिता घेतलेला क्रांतिकारी निर्णय होता. या आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना झाली. यानंतर यामुळे नवी विद्यापीठे आणि नवी महाविद्यालये मोठ्या प्रमाणात उघडली गेली.

शिक्षण क्षेत्रात खासगीकरणाचा शिरकाव झाला. खासगी कायम विनाअनुदानित विद्यापीठे व महाविद्यालये स्थापन करायला परवानगी देता यावी यासाठी तत्कालीन पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वात "खासगी विद्यापीठ (स्थापना व नियमन) विधेयक" १९९५ ला संसदेसमोर आणले पण त्यासंबंधी अध्यादेश २००४ ला जारी करण्यात आले. हे धोरण नंतर आलेल्या सरकारने जोमाने उचलून धरले. तत्कालीन पंतप्रधान मा. अटलबिहारी बाजपेयी व मा. मनमोहन सिंग यांच्या काळात तर शिक्षणाच्या खासगीकरण व उदारीकरणाला मुक्त संचार करून दिला आहे. याचा दूरगामी परिणाम उच्च शिक्षणावर पडलेला आहे. भारतात गेल्या दोन दशकांत मोठ्या प्रमाणावर स्वयंअर्थसाहाय्यित किंवा कायम विनाअनुदानित विद्यापीठे व महाविद्यालये स्थापन झालेली आहेत. भारतात २००५-०६ या सत्रात खासगी विद्यापीठांची संख्या ७ होती. ती २०११-१२ ला १११ झाली. तसेच कायम विनाअनुदानित अभिमत विद्यापीठांची संख्या सुध्दा १२९ वर पोहोचलेली आहे. इतकेच नाही तर सरकारी नियंत्रणात असणाऱ्या विद्यापीठांत पण संलग्न असणाऱ्या कायम विनाअनुदानित खासगी महाविद्यालयांच्या संख्येत हजारोंची वाढ झालेली आहे.

आज भारतात उच्च शिक्षणाबाबत ज्या संस्था (विद्यापीठे व महाविद्यालये) आहेत त्या खालीलप्रमाणे:-

सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र-विभाग प्रमुख विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट ॲण्ड कॉमर्स, ३१०-ब, नवीन नंदनवन, नागपूर-०९ E Mail : profdipakpawar@rediffmail.com

| | |
|---|---|
| केंद्रिय विद्यापीठे (शासकीय) : | ४४ |
| राज्यस्तरीय विद्यापीठे (शासकीय) : | ३०६ |
| राज्यस्तरीय विद्यापीठे (खाजगी) : | ३५४ |
| अभिमत विद्यापीठे (शासकीय व खासगी) : | १२९ |
| शासनाच्या राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था : | ६७ |
| एकूण पदवी – अनुदानित संस्था : | ७०० |
| संलग्न महाविद्यालये (खासगी व शासकीय): | ३५,५३९ |

भारतातील उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात विद्यापीठे, महाविद्यालये आणि वेगवेगळ्या शाखांमध्ये विद्यार्थ्यांची संख्यात्मक वाढ झालेली आहे. भारतातील भाषिक, जातीय, भौगोलिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विभिन्नतेतील प्रतिकूलतेत शालेय शिक्षणाबरोबर उच्च शिक्षणाचे प्रमाण बऱ्यापैकी वाढले आहे. व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था व घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये भरमसाठ वाढ झालेली आहे. काही निवडक शहरांमध्ये शैक्षणिक हब तयार झालेले आहेत. पण जागतिक स्तरावर आणि बदलत्या काळाच्या गरजेनुसार पाहू जाता भारतातील शिक्षणाची संख्यात्मक व गुणात्मक स्थिती काय आहे? त्याचबरोबर सध्याच्या भारतीय सामाजिक परिस्थितीत भारतातील शिक्षण आणि शिक्षण व्यवस्था कुठे, कशी, कोणाकरिता आणि काय आहे? याचे विवेचन आजच्या स्थितीत खूप महत्त्वपूर्ण आहे.

उच्च शिक्षणातील आपले मुख्य उद्दिष्ट सर्वसमावेशकता आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेत या उद्दिष्टावर भर देण्यात आला आणि बाराव्या योजनेतही तो कायम ठेवण्यात आला आहे. गरजू आणि पात्र अशा सर्वांपर्यंत उच्च शिक्षणाच्या सुविधा पोहचविणे अभिप्रेत आहे. जेणेकरून त्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल आणि त्यांना विकासाचा लाभही घेता येईल. तेव्हा या निकषावर महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाचे चित्र बघता, उच्च शिक्षणातील एकूण पटनोंदणीची आकडेवारीचे प्रमाण जाती विषमतेकडे निर्देश करते. २०१२-१३ मध्ये उच्च जाती- २९ टक्के, अनुसूचित जाती – २२ टक्के, अन्य मागासवर्गीय (ओ.बी.सी.) १८ टक्के आणि अनुसूचित जमाती ९ टक्के असे आहे. उच्च शिक्षणात हिंदूंच्या तुलनेत मुस्लिम खूप मागे आहेत. पुरुषांपेक्षा स्त्रिया, श्रीमंतांपेक्षा गरीब खूप मागे आहेत.

१९९५-९६ ला सरकारी संस्था व खासगी अनुदानित संस्थांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ९२ टक्के तर विनाअनुदानित खासगी संस्थांमधील प्रमाण ८ टक्के होते. २००७-०८ ला सरकारी व अनुदानित खाजगी संस्था मधील हे प्रमाण ९२ टक्क्यांवरून ७६ टक्क्यांवर आले. विनाअनुदानितमध्ये शिकणाऱ्यांचे प्रमाण ८ वरून २२ टक्क्यांवर गेले आहे. २०१५-१६ ला खासगी विनाअनुदानित संस्थांमध्ये शिकणाऱ्यांमध्ये अधिक वाढ होऊन सरकारी व अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये शिकणाऱ्यांमध्ये खूप घट झालेली आहे. त्यामुळे वंचित घटक हा उच्च शिक्षण घेण्यापासून दूर फेकला जात आहे.

शिक्षण ही प्रत्येकाची सामाजिक गरज आहे. बहुतेक देश प्रत्येक नागरिकाची ही गरज सरकारी किंवा खाजगी संस्थांमार्फत पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. 'साधनसंपत्तीचे स्त्रोत आणि उत्पन्न या बाबतीत तफावत असू शकते. परंतु उच्च शिक्षण आणि कौशल्ये संपादन करण्याच्या संधी आणि सुविधांपासून कोणीही वंचित राहता कामा नये. विषमतेने ग्रस्त अशा देशांमध्ये "शिक्षण" हाच एक असा घटक आहे, की जो अधिक समानतेकडे नेण्यास साहाय्यभूत ठरतो; मानवी क्षमता विकसनाची संधी देतो. पण उच्च शिक्षणाच्या स्वयंम् अर्थ साहाय्यित खासगीकरणामुळे विषमतेने ग्रस्त अशा भारत देशांमध्ये 'शिक्षण' हाच एक असा घटक आहे, की जो अधिक विषमतेकडे नेण्यास साहाय्यभूत ठरतो आहे; अलीकडच्या शैक्षणिक धोरणांतून मानवी क्षमता विकसनाची संधी समाजातील वंचित व गरीब घटकांना देत नाही. त्यामुळे समाजातील जवळ जवळ ५० टक्के असलेल्या वंचित व गरीब घटकांतील प्रतिभा Talent देशाच्या प्रगतीत वापरता येत नाही, यामुळे देषाच्या बौद्धिक संपत्तीची मोठ्या प्रमाणात हानी होते. अशाच प्रकारची हानी भारतात शेकडो वर्षे झाली आहे, जातीव्यवस्थेने समाजातल्या मोठ्या घटकाला शिक्षण, विकासाची संधी आणि मानवी

हक्क नाकारले होते. त्यामुळे त्यांच्यातील मोठ्या प्रतिभेला मुकावे लागले. एकोणिसाव्या शतकापर्यंत पाश्चिमात्त्य राष्ट्रांत अनेक महत्त्वपूर्ण शोध लागलेत, त्यांची प्रगती झाली पण भारतात सर्व नैसर्गिक उपलब्धता असूनही देश मागासलेला राहिला. जो पर्यंत समान संधी आणि सुविधा मिळणार नाही तो पर्यंत भारत जागतिक महासत्ता होणार हे दिवास्वप्न नक्कीच राहणार आहे. यात कोणताही किंतू नाही.

अनुसूचित जाती, जमाती, अन्य मागासवर्गीय, महिला, आणि भटके-विमुक्त तसेच सर्व स्तरांतील गरीब यांना उच्च शिक्षणाच्या सुविधा न मिळाल्याने मानवी क्षमता विकासाच्या त्यांच्या संधी कमी होतात. परिणामतः आर्थिक-सामाजिक विकासातून मिळू शकणाऱ्या लाभांना ते मुकतात. अशा संधी वंचितांचा भारतात एक मोठा हिस्सा आहे. प्राप्त परिस्थितीत बुध्दिमत्तेच्या जोरावर मात करून उच्च शिक्षण घेऊन परिवर्तन घडून आणून पुढे जाणाऱ्याचे पंख कापले जाऊन त्याला पिढ्यान् पिढ्या संधीहीन ठेवण्याला हा पुन्हा उच्चवर्णिय षडयंत्र आहे. सरकारने या नवीन उच्च शिक्षणातील धोरणांचा फेरविचार केला पाहिजे.

डॉ. अमर्त्य सेन हे जागतिक कीर्तीचे ख्यातनाम अर्थतज्ज्ञ आणि नोबल विजेते आहेत. याबाबत काहीही दुमत असणे संभव नाही. तसेच ते गेल्या काही वर्षांपासून शिक्षणाबद्दल आणि मानवी विकासाबद्दल भाष्य करीत आहेत. गेल्या वर्षी नालंदा विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमात डॉ. सेन यांनी 'शैक्षणिक आणीबाणीचा मुद्दा मांडला. ते म्हणतात, जागतिक स्तरावरील भारताची तुलना करता भारतात शिक्षणाचा दर्जा चांगला नाही. भारतातील शिक्षणाची परिस्थिती बिकट होत चालली आहे. गेल्या दीड-दोन दशकांपासून भारतात माहिती तंत्रज्ञानाला (आय.टी.) मंत्र जपला जात आहे. आय.टी. क्षेत्रात भारतीय तरुणांनी लक्षणीय कामगिरी केली आहे. भारतातील उच्चशिक्षित इंजिनियर आणि आय.टी. असे समीकरणही रूढ झाले आहे. आपला शैक्षणिक दर्जा उंचावला आहे, हे सांगताना अनेकदा 'आयटी' यशाचेच उदाहरण दिले जाते. ते याबाबत पुढे जाऊन म्हणतात, या क्षेत्राकरिता लागणारी कौशल्ये वरच्या स्तरातील आहेत व आपल्याकडील प्रज्ञावंत तरुणांनी ती अवगत केली म्हणून त्यांना यश मिळत आहे. मात्र 'मध्यम आणि कनिष्ठ स्तरातील कौशल्याकडे दुर्लक्ष झाले आहे. भारतात तरुणांचा हा मोठा वर्ग आहे ज्यांच्याकडे मध्यम आणि कनिष्ठ स्तरातील कौशल्ये प्राप्त करण्याची क्षमता आहे. पण त्यांना ही कौशल्य ना कोणी देत आहे, ना कोणी त्यात निष्णात होत आहे. तंत्र व कौशल्य शिक्षणाच्या या दुरवस्थेचा परिणाम आपल्या विकासावरही होत आहे. आज भारत यामुळेच मानवी निर्देशांकात दक्षिण आशियाई देशांत शेवटून दुसरा आहे.

भारतातील शैक्षणिक संस्थांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात विषमता निर्माण झाली आहे. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि विचारवंत डॉ. द. ना. धनागरे 'विद्यापीठातील विकासाचा समतोल' या पुस्तकात त्यांनी उच्च शिक्षणातील नवी वर्णव्यवस्था मांडली आहे. आतापर्यंत चर्चेच्या परिघात न आलेल्या एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे त्यांनी लक्ष वेधले आहे व सूक्ष्म व डोळसपणे बघितल्यास याचा प्रत्यय आपल्यालाही येतो. भारतात उच्च शिक्षणासाठीच्या संस्था आणि विद्यापीठे यांच्यात एक वर्णाश्रम पध्दती आहे. आणि आतापर्यंतच्या सर्व शासनकर्त्यांतर्फे पध्दतशीर जोपासली गेली आहे. एकीकडे आय.आय.टी., केंद्रीय विद्यापीठे या ब्राम्हण आदी क्षत्रिय वर्णात मोडणाऱ्या उच्च वर्णीय शैक्षणिक संस्था आहेत. ही केंद्र सरकारची लाडकी बाळे आहेत. त्यांना पैशाची आणि सुविधांची कसलीच कमतरता नाही. त्यानंतर आहेत वैश्य वर्णातील खाजगी विद्यापीठे किंवा काही अभिमत विद्यापीठे त्यांना शिक्षणाचा बाजार मांडून आपल्या निर्वाहाची भरपेट सोय करायला कोणतीच आडकाठी नाही. त्यांना मदतीसाठी ना केंद्राची जरुरी आहे ना राज्य सरकारची. मग या व्यवस्थेच्या तळाशी, राज्यातील विद्यापीठे. ती अवलंबून आहे राज्य सरकारवर त्यांना मिळणारी वागणूक इतकी अपमानास्पद आणि उत्साह भंग करणारी आहे की, त्यावर भाष्य करताना

डॉ. धनागरे म्हणतात, 'म्हणजेच विद्यापीठाच्या नव्या वर्णव्यवस्थेत राज्यस्तरीय विद्यापीठांचे विशेषत: महाराष्ट्रातील विद्यापीठांचे स्थान शुद्रासमान वेठबिगारांसारखे आहे म्हटल्यास अतिशयोक्ती वाटू नये.'

जगामध्ये अमेरिका, चीनच्या पाठोपाठ सर्वात मोठी उच्च शिक्षणाची यंत्रणा भारतात कार्यरत आहे. मात्र या विस्तारलेल्या यंत्रणेचा भारतातील किती विद्यार्थ्यांना लाभ होतो, याचे उत्तर मात्र निराशाजनक आहे. भारतात १२वी उत्तीर्ण झालेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी फक्त १० टक्के विद्यार्थी हे पुढील उच्च शिक्षण घेऊ शकतात हे भीषण सामाजिक वास्तव आहे. दिल्लीतील Center For Research and Database in Development Policy या संस्थेमध्ये सक्रिय असलेले Development Economist अबुसालेह शरीफ व National Council of Applied Economics Research या संस्थेतील संशोधक अमित शर्मा या दोन संशोधकांनी भारतातील कोणत्या जाती, धर्म, पंथाच्या किती विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचा लाभ होतो याचा सखोल अभ्यास केला. त्या अनुषंगाने त्यांनी तयार केलेल्या व नुकत्याच प्रसिध्द झालेल्या अहवालात हा खालील निष्कर्ष काढण्यात आला आहे.

हिंदू समाजातील दलित, महिला, भटके-विमुक्त, आदिवासी त्याचप्रमाणे मुस्लिम व अन्य अल्पसंख्यांक वर्गांना स्वत:च्या विकासासाठी खूप कमी संधी उपलब्ध होत असतात. भारतातील जातिप्रधान समाज व्यवस्थेबरोबरच मोठ्या प्रमाणावर असलेली आर्थिक विषमता ही यासाठी कारणीभूत आहे. मात्र देशात जिथे जिथे सामाजिक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शिक्षणाच्या योग्य संधी उपलब्ध झाल्या आहेत, तिथे तिथे त्यांनी चमकदार कामगिरी करून दाखविली आहे. देषाच्या अन्य भागांतील सवर्ण हिंदूंपेक्षा दक्षिण भारतात काही ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या मुस्लिम, दलितांचे प्रमाण अधिक आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आजवरच्या काळात साक्षरतेचा सर्वाधिक प्रसार हा दक्षिण भारतात झाला आहे. त्यामुळे त्या राज्यांतील सर्वच सामाजिक घटकांमध्ये उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाणही अधिक आहे. उत्तर-मध्य भारतातील बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल ही राज्ये तसेच ईशान्य भारतातील राज्यांत १२वी उत्तीर्ण झालेल्या असंख्य मुलांना आर्थिक विपन्नावस्था व अन्य सामाजिक कारणांमुळे उच्च शिक्षण घेणे शक्य होत नाही. त्याउलट दक्षिण भारतातील राज्यांबरोबरच उत्तर भारतातील जम्मू काश्मीर, पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, चंदीगड, हरियाणा, दिल्ली या भागांमध्ये १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण तुलनेने अधिक आहे. १२वी नंतर कला, वाणिज्य, विज्ञान या विषयांतील पदवी तसेच पदव्युत्तर शिक्षण तसेच अभियांत्रिकी, वैद्यकीय व तंत्रज्ञान या विषयांतील पदवी व पदव्युत्तर शिक्षण, पीएच.डी. या सर्वांचा उच्च शिक्षणामध्ये समावेश होतो. पुरुषांपेक्षा स्त्रीवर्गाला उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध न होण्याचे प्रमाण खूपच जास्त आहे. देशामध्ये स्त्रिया उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांमध्ये मोठी जबाबदारीची पदे सांभाळतांना दिसत असल्या तरी ते प्रमाण शहरी भागांमध्ये जास्त आहे.

ग्रामीण भागांमध्ये शाळेत इयत्ता चौथी व सातवीनंतर होणाऱ्या विद्यार्थ्यांची गळती जास्त आहे. पुढे १० वी व १२ वी इयत्ता उत्तीर्ण होण्याच्या प्रक्रियेत याच गळतीत आणखी वाढ होते. मुलींना अग्रक्रमाने शिकवा अशी अभियाने राबविली जात असली तरी देशाच्या ग्रामीण भागात साक्षर स्त्रियांची संख्या पुरुषांच्या तुलनेत कमीच आहे, हे वास्तव कोणालाही पुसता येणार नाही. केंद्र सरकारच्या सांख्यिकी विभागाच्या अखत्यारीत असलेल्या नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन (एनएसएसओ) ने २००७-०८ या वर्षासाठी जे राष्ट्रीय सर्वेक्षण केले होते. त्याच्या आधारे वॉशिंग्टन येथील युएस-इंडिया पॉलिसी इन्स्टिट्यूट या संस्थेने एक अहवाल तयार केला होता. त्यातील निष्कर्षही भारतातील शैक्षणिक विषमतेवर झगझगीत प्रकाश पाडणारे आहेत. आदिवासी, दलित वर्गातील जी मुले १२ वी उत्तीर्ण होतात त्यापैकी फक्त १.८ टक्के विद्यार्थ्यांनाच उच्च शिक्षणाची संधी प्राप्त होते. मुस्लिमांमध्ये हेच प्रमाण २.१ टक्के इतके

आहे. देशातील ग्रामीण भागात १२ वी उत्तीर्ण झालेल्या एकूण मुलांपैकी फक्त २ टक्के मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळते, तर शहरी भागात हीच आकडेवारी १२ टक्के इतकी आहे. युएस-इंडिया पॉलिसी इन्स्टिट्यूटच्या अहवालातही दक्षिण भारतातल्या राज्यांतील उच्च शिक्षणाच्या विस्ताराबद्दल तसेच त्याचा लाभ समाजातील सर्व वर्गांना योग्य रीतीने मिळत असल्याबद्दल गौरवोद्गार काढण्यात आले आहेत. दक्षिण भारतातील राज्यांत हिंदू, अनुसूचित जाती-जमातींमध्ये तंत्रज्ञानविषयक उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलांचे प्रमाण २२ टक्के व मुस्लिम मुलांचे २५ टक्के इतके आहे. खास बाब म्हणजे हे प्रमाण देशाच्या इतर भागांतील अन्य मागासवर्गीय आणि सवर्ण वर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलांपेक्षा अधिक आहे.

केवळ शैक्षणिक संस्थांच्या क्रमवारीचा विचार न करता इतरही विद्यापीठे, शास्त्रे, शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालये यांच्यातील शैक्षणिक सुधारणा व गुणात्मक विकास करण्यावर केंद्र व राज्य सरकारने लक्ष द्यायला हवे. 'फार थोड्या लोकांना तुपपोळी आणि महत्तमांचा भूक बळी' असे व्हायला नको', निव्वळ जागतिक रँकिंगच्या मागे लागून आयआयटी व आयआयएम आणि काही मेडिकल सायन्सेसच्या संस्थांना (एम्स वगैरे) खूप सुदृढ बनवायचे आणि इतर संस्थांना कुपोषित होऊ द्यायचे यातून सर्वांगिण विकास किंवा कल्याण साधले जाणार नाही. नागपूरच्या व्ही.एन.आय.टी. च्या पदवीदान समारंभाच्या दुसऱ्या दिवशी इन्फोसिसचे सर्वेसर्वा नारायण मूर्ती यांचा नागपूर इंजिनिअर्स फोरमच्या वतीने आयोजित 'इंजिनिअर डे' च्या कार्यक्रमात 'जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले, त्याप्रसंगी त्यांनी जे मत नोंदविले ते महत्त्वपूर्ण वाटते. त्यांनी म्हटले की, जागतिक स्तरावरील संस्थांच्या मानांकनापुढे शैक्षणिक गुणवत्तेशी तडजोड करणे योग्य ठरणार नाही. सर्वप्रथम भारतीय शैक्षणिक संस्थांनी सामाजिक समस्यांवर समाधान शोधावे, त्यानंतरच जागतिक पातळीवर क्रमांक पटकावण्याचा विचार करावा ते पुढे जाऊन म्हणतात की गेल्या साठ वर्षांत भारतीयांनी असा कोणताही अविष्कार केला नाही, ज्यामुळे भारतीयांची जागतिक स्तरावर दखल घेतली जाईल.

**समारोप :**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी १९४८ मध्ये दिलेल्या पहिल्या शैक्षणिक योजना अहवालात उच्च शिक्षणाबाबत मत मांडले होते ते असे, 'उच्च शिक्षण हे प्रत्येकापर्यंत पोहचणारे असावे, तसेच सामान्यांच्या गरजा आणि अपेक्षांची पूर्तता करणारे हवे. उच्च शिक्षण हे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक बदलांचे सशक्त माध्यम व्हावे. तसेच या माध्यमाने राष्ट्रीय ध्येयपूर्ती देखील व्हावी. त्याकरिता शिक्षण हे उत्पादकता वाढविणारे, सामाजिक व राष्ट्रीय एकता व समता वाढणारे आणि आधुनिकतेची प्रक्रिया गतिमान करणारे आणि सामाजिक, नैतिक व आध्यात्मिक मूल्य यांचे बीजारोपण करणारे असावे. डॉ. राधाकृष्णन यांचे हे विधान तब्बल ६७ वर्षानंतरही कालसंगत आहे. उच्च शिक्षणाचा समाजाला व राष्ट्राला लाभ पोहचवायाचा असेल तर उच्च शिक्षणाचे एकत्रित नियोजन करुन त्याचे संचालन केले पाहिजे. आजही जगाच्या तुलनेत भारताचे उच्च शिक्षणातील नोंदणीचे प्रमाण खूप कमी म्हणजे १८ टक्के इतके आहे. जागतिक सरासरी विद्यार्थी नोंदणी दर २९ टक्के इतका आहे त्यामुळे भारतातील उच्च शिक्षणाचा विस्तार लोकसंख्येच्या तुलनेत झाला नाही. त्याचबरोबर उच्च शिक्षण सर्वसमाक झालेले नाही. जगातील इतर राष्ट्रांनी केलेली प्रगती ही तेथील उच्च शिक्षणाच्या सर्वसमावेशकतेवर आधारित आहे. परंतु उच्च शिक्षणाच्या खाजगी कायम विनाअनुदानित तत्त्वामुळे ते सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण होण्यात मोठा अडथळा आहे. सध्यातरी केंद्र व राज्य शासनाचे धोरण हे खासगी संस्थांनाच झुकते माप देणारे आहे.

**संदर्भ :**

१. आगलावे डॉ. प्रदीप: आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१२

२. आगलावे डॉ. प्रदीप: समाजशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००२.

३. बियाणी प्रा. डॉ. प्रमोद: 'लॉर्ड मेकॉले ते रामकृष्ण मोरे मार्गे दिलीप वळसे पाटील: एक प्रवास, मासिक- योजना, २००२.
४ धनागरे डॉ. द. ना.: उच्च शिक्षण, ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे, लोकवाङ्मयगृह, मुंबई,२०१०.५. डोळे डॉ. ना. य.: उदारीकरण. नवे आर्थिक धोरण, विद्या प्रकाशन, नागपूर. १९९७
६. दुभाषी डॉ. पद्माकर: जागतिकीकरण, उदारीकरण आणि अर्थकारण, श्री विद्या प्रकाशन, पुणे. २००६
७.संपादक-कांबळे नारायण: आरक्षण, सत्य व विपर्यास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००८. बलांडे व्यंकट शिंदे संजय
८. संपादक- कीर धनंजय: महात्मा फुले समग्र वाङ्मय, प्रकाशक- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती, मालशे डॉ. स.ग. मंडळ, मुंबई. फडके डॉ. य.दि.
वर्तमानपत्रे :
१. इंदापवार मंगेश: रँकपेक्षा, हवी गुणवत्ता!, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, विशेष, रविवार, २० सप्टे.२०१५.
२. इंदापवार मंगेश: उच्च शिक्षणाचे व्यापारीकरण, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, विशेष, रविवार, १३ सप्टे.२०१५.
३. उच्च शिक्षणातील भेदाभेद (अग्रलेख), दैनिक दिव्य मराठी, ६ जानेवारी २०१४.
४. उच्च शिक्षणाची दशा, दिशा जातेय कुठे- दैनिक महाराष्ट्र टाईम्स, विशेष, शनिवार, १९ सप्टे.२०१५.
५. नगरकर प्रदीप: शिक्षणाची शोकांतिका, स्तंभ, दैनिक ऐक्य, २४ सप्टे. २०१३
६. साठये डॉ. केशव: शैक्षणिक सुधारणाच नेतील प्रगतीपथाकडे, दैनिक सकाळ, गुरुवार, ०७ मार्च १३
७. काळकर डॉ. पराग: हवेत नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम, सकाळ/ESakal.com २३ नोव्हे. २०१०.

* * *

## आवाहन...

मराठी समाजशास्त्र पत्रिकेच्या प्रकाशनासाठी ज्यांना देणगी द्यायची असेल, त्यांनी 'सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद' या नावाने डिमांड ड्राफ्ट / चेक अथवा रोखीने डॉ. स्मिता अवचार, अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा - समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे जमा करावे.

संपादक

म.स.प

# भारतातील उच्च शिक्षणाची वर्तमान स्थिती

डॉ. राहुल भगत

**प्रस्तावना :**

भारतातील उच्च शिक्षणाची वर्तमान स्थिती जाणून घेण्यासाठी मानव विकास संसाधन मंत्रालयाव्दारा नुकतेच देश पातळीवर उच्च शिक्षणाच्या संदर्भात शिक्षण विषयक अखिल भारतीय सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वेक्षणासाठी नॅशनल इन्फर्मेटिक्स सेंटर (एनआईसी) च्या मदतीने एक पोर्टल (http://aishe.gov.in) तयार करण्यात आले होते. या पोर्टलवर देशातील सर्व शैक्षणिक संस्थांनी आपली नोंदणी करून आपल्या शेक्षणिक संस्थेची माहिती त्यावर अपलोड करावयाची होती. २०१४-१५ पासून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुचना आणि सांख्यिकी विभागाने विद्यापीठ किंवा महाविद्यालयाकडून माहिती प्राप्त करणे बंद केले आणि आता केवळ (http://aishe.gov.in) या पोर्टलच्या माध्यमातूनच देशातील उच्च शिक्षण संस्थांची माहिती संकलनाचे कार्य कागदविरहित पध्दतीने सुरू केले आहे.

**विद्यापीठ व महाविद्यालयांची संख्या:-**

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले तेंव्हा देशात केवळ २० विद्यापीठे, ५०० महाविद्यालये आणि त्यात केवळ २.१ लाख विद्यार्थी होते. आज मात्र देशातील विद्यापीठांची संख्या ४० टक्क्यांनी, महाविद्यालयांची संख्या ८२ टक्क्यांनी व विद्यार्थ्यांची संख्या १२७ टक्क्यांनी वाढली आहे. मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या २०१५ च्या वार्षिक अहवालानुसार मार्च २०१५ पर्यंत देशात विद्यापीठांची संख्या ७११ व महाविद्यालयांची संख्या ४०७६० इतकी आहे. राज्यनिहाय विद्यापीठांची संख्या लक्षात घेतली तर असे निदर्शनास येते की राजस्थान राज्यात सर्वात जास्त म्हणजे ६८ विद्यापीठ आहेत. त्याखालोखाल उत्तर प्रदेश-६४ आणि तामिलनाडूत ५२ विद्यापीठे आहेत. याचाच अर्थ देशातील विविध राज्यांत विद्यापीठांचे असमान वितरण झालेले आढळून येते. २०१४-१५ च्या अहवालानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुचीमध्ये १८ राज्य विद्यापीठे व ३० राज्य खासगी विद्यापीठांचा समावेश करण्यात आला आहे आणि ६ विद्यापीठांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिनियमांतील कलम १२ (ख) च्या अंतर्गत केंद्रीय साहाय्य प्राप्तीसाठी पात्र घोषित करण्यात आले आहे. २०१४-१५ मध्ये विविध राज्यांतील एकूण ११४७ नवीन महाविद्यालये स्थापन करण्यात आली. ज्यामुळे २०१३-१४ मधील महाविद्यालयांची संख्या ३९६१३ वरून वाढून २०१४-१५ मध्ये ४०७६० इतकी झाली आहे.

**विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी नोंदणी:-**

आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या शेवटी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिनियम, १९५६ च्या कलम २ (च) च्या अंतर्गत मान्यताप्राप्त महाविद्यालयांची एकूण संख्या ९९४० इतकी होती. यामधील आतापर्यंत कलम २ (च) च्या अंतर्गत मान्यताप्राप्त महाविद्यालयांची सर्वाधिक संख्या उत्तर प्रदेश (२०००), त्यानंतर महाराष्ट्र (१२६६), कर्नाटक (८४८) आणि गुजरात (५२१) इतकी आहे. शैक्षणिक सत्र २०१४-२०१५ मध्ये सर्व अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांचे एकूण नामांकन २६५.८५ लाख होते. ज्यामध्ये १२४.७६ लाख विद्यार्थिनी होत्या. विद्यार्थिनींचे नामांकनाचे हे प्रमाण ४६.९३ टक्के इतके होते. उत्तर प्रदेशमध्ये विद्यार्थ्यांचे नामांकन सर्वात जास्त

समाजशास्त्र विभागप्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर,

(४३.९७ लाख) होते. त्यानंतर महाराष्ट्र (२८.६० लाख), तमिलनाडू (२४.०१ लाख) आणि राजस्थान मध्ये (१६.२४ लाख) इतके होते. देशातील विविध विद्यापीठांत विद्यार्थ्यांचे नामांकन विविध स्तरांवर पुढीलप्रमाणे होते. स्नातकपूर्व (८८.२६ टक्के), स्नातकोत्तर (११.०९ टक्के), संशोधन (०.६७ टक्के), डिप्लोमा/प्रमाणपत्र (१.५७ टक्के). सर्व स्नातकपूर्व विद्यार्थ्यांमधून जवळपास ८८.३७ टक्के आणि संपूर्ण स्नातकोत्तर विद्यार्थ्यांपैकी ७१.०९ टक्के विद्यार्थी संलग्नित महाविद्यालयामध्ये होते आणि बाकी विद्यार्थी विद्यापीठांच्या विभागात व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांत होते. २०१४-१५ च्या शैक्षणिक सत्रातील एकूण २६५.८५ लाख विद्यार्थ्यांमधून ३७.४१ टक्के विद्यार्थी कला शाखेत, १७.५९ टक्के विद्यार्थी विज्ञान व १६.३९ टक्के विद्यार्थी वाणिज्य व प्रबंधन शाखेत होते. अशा प्रकारे केवळ तीन शाखांतच ७१ टक्के विद्यार्थ्यांचे नामांकन होते, तर बाकीचे २९.०० टक्के विद्यार्थ्यांचे नामांकन व्यावसायिक शाखेत होते. विद्यार्थ्यांचे शाखानिहाय असमान वितरण असे दर्शविते की देशातील उच्च शिक्षणात एका धोरणात्मक परिवर्तनाची नितांत आवश्यकता आहे.

**विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षकांची संख्या:-**

देशातील विद्यापीठे आणि महाविद्यालयातील शिक्षकांची संख्या २०१३-१४ मध्ये १०.४९ लाख होती ती २०१४-१५ मध्ये १२.६१ लाख इतकी झाली आहे. या १२.६१ लाख शिक्षकांपैकी ८४.६६ टक्के शिक्षक महाविद्यालयात आणि बाकीचे १५.३४ टक्के शिक्षक विद्यापीठांत होते. वर्ष २०१४-२०१५ मध्ये २२८४९ पीएच्. डी. पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये सर्वात जास्त कला शाखेत ७४८० पीएच. डी. पदव्या देण्यात आल्या. त्यानंतर विज्ञान शाखेत ७०१८ पीएच्. डी. पदव्या प्रदान करण्यात आल्या. या दोन्ही शाखेतील पीएच्. डी. पदव्यांचे एकूण प्रमाण ६३.४५ टक्के इतके होते.

**विद्यापीठ व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे स्त्री-पुरूष प्रमाण:-**

वर्ष २०१४-२०१५ मधील संपूर्ण शैक्षणिक स्तरात नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये १०० विद्यार्थ्यांच्या मागे ८८ विद्यार्थिनी होत्या. म्हणजेच या सत्रात विद्यार्थिनींचे नोंदणीचे प्रमाण विद्यार्थ्यांच्या प्रमाणाच्या तुलनेत केवळ ८८ टक्के इतके होते. उच्च शिक्षणासाठी विद्यार्थिनींचे राज्यनिहाय नोंदणीचे प्रमाण लक्षात घेता असे निदर्शनास येते की लक्षद्वीप राज्यात विद्यार्थिनींचे नोंदणी प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ७१.१७ टक्के इतके होते. त्यानंतर गोवा राज्यात ६०.०६ टक्के इतके होते. या शैक्षणिक वर्षात उत्तर प्रदेशमध्ये २१.७३ लाख विद्यार्थिनी, महाराष्ट्रात १३.०१ लाख व तामिलनाडूमध्ये १२.३२ लाख विद्यार्थिनींनी उच्च शिक्षणासाठी नोंदणी केली होती. उच्च शिक्षणात विद्यार्थिनींचे नामांकनाचे प्रमाण कला शाखेत सर्वाधिक ४१.७० टक्के, त्यानंतर विज्ञान शाखेत १८.६० टक्के, वाणिज्य शाखेत १५.७३ टक्के होते. एकूण विद्यार्थिनींच्या पैकी ७६.०३ टक्के विद्यार्थिनींची नोंदणी कला, विज्ञान व वाणिज्य या शाखेत होती तर बाकी २३.९७ टक्के विद्यार्थिनी व्यावसायिक शाखेत नोंदणीकृत होत्या. व्यावसायिक शाखेत विद्यार्थिनींचे सर्वात जास्त प्रमाण अभियांत्रिकी व प्रौद्योगिकी शाखेत ९.८८ टक्के इतके होते.

थोडक्यात, वर्ष १९५०-५१ पासून वर्ष २०१४-१५ पर्यंत उच्च शिक्षण क्षेत्रात पदव्या प्रदान करणारे विद्यापीठ व शैक्षणिक संस्थांत वाढ २४.७ पट राहिली, महाविद्यालयांच्या संख्येत ५८ पट, विद्यार्थ्यांच्या नोंदणीमध्ये ६७ पट, तर शिक्षकांच्या संख्येत ५२ पट वाढ नोंदली गेली आहे.

**विद्यापीठांचा विकासासाठी आर्थिक साहाय्य:-**

केंद्रीय, राज्य आणि अभिमत विद्यापीठांच्या क्षमता वाढविण्यासाठी, विविध विद्यापीठात समानता आणण्यासाठी, विद्यापीठांच्या गुणवत्तेत सुधारणा

करण्यासाठी, त्यांचे प्रशासन सुदृढ करण्यासाठी, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधेत वाढ करण्यासाठी व विद्यापीठांच्या एकूणच सर्वांगीण विकासासाठी विविध अनुदान योजनांच्या माध्यमातून आर्थिक साहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे. थोड्याफार प्रमाणात विद्यापीठांतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वेतनासाठी अनुदान दिले जाते. प्रयोगशाळा, ग्रंथालय, इमारती इत्यादींच्या देखभालीसाठी काही अनिवार्य खर्च जसे टेलीफोन, विद्युत बिल, डाक इत्यादी साठी सुध्दा अनुदान दिले जाते. केंद्रीय विद्यापीठे व अभिमत विद्यापीठांना योजनातंर्गत व गैरयोजनातंर्गत अनुदान दिले जात आहे.

वर्ष २०१४-१५ मध्ये केन्द्रीय विद्यापीठांची संख्या ४६ होती. यामधी ६ विद्यापीठे १) केन्द्रीय कृषि विद्यापीठ, इम्फाल, मणिपूर (२) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिली (३) इंडियन मॅरीटाइम युनिव्हर्सिटी, चेन्नई (४) सॉउथ एशियन युनिव्हर्सिटी, नवी दिल्ली (५) नालन्दा विद्यापीठ, बिहार, आणि (६) राजीव गांधी राष्ट्रीय उड्डयन विद्यापीठ, उत्तर प्रदेश यांना विद्यापीठ अनुदान आयोगद्वारा वित्तपोषित केले जात नाही. वर्ष २०१४-२०१५ मध्ये फक्त ३९ केन्द्रीय विद्यापीठांना योजनातंर्गत व गैर-योजनातंर्गत अनुदान दिले गेले. वर्ष २०१४-१५ मध्ये ३९ केन्द्रीय विद्यापीठांना १८३५.६७ करोड़ रुपयांचे सामान्य विकास अनुदान उपलब्ध करून दिले गेले. या वर्षात २४ केन्द्रीय विद्यापीठांना तसेच एका आयुर्वेद महाविद्यालयाला ३५२७.४५ करोड़ रुपयांचे अनुदान उपलब्ध करून देण्यात आले. अनुसूचित जाती व अनुसूचित जनजातींच्या विद्यार्थिनींच्या वसतीगृहासाठी अलिगढ़ मुस्लिम विद्यापीठ, जामिया मिलिया इस्लामिया, मौलाना आझाद राष्ट्रीय उर्दू विद्यापीठ, डॉ. बी. आर. अम्बेडकर विद्यापीठ, जामिया हमदर्द (सम विद्यापीठ) या विद्यापीठांना १०१९.३९ करोड़ रुपयांचे अनुदान उपलब्ध करून दिले आहे. मौलाना अबुल कलाम आझाद अध्यासनच्या स्थापनेसाठी २०.०० लाख रुपये तसेच डॉ. आंबेडकर अध्यासनाच्या स्थापनेसाठी बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाला २५.०० लाख रुपये अनुदान देण्यात आले. इतर मागासवर्गीयांच्या आरक्षण धोरणाच्या क्रियान्वयनासाठी केन्द्रीय विद्यापीठाला ४०६०.९४ लाख रुपयांचे अनुदान दिले गेले. संरचनात्मक विकासासाठी ७ केन्द्रीय विद्यापीठांना २१७८८.५० लाख रुपयांचे एक रकमी अतिरिक्त अनुदान उपलब्ध करून देण्यात आले. सच्चर समितीच्या शिफारशी लागू करण्यासाठी २५.०० करोड़ रुपये उपलब्ध करून देण्यात आले.

विद्यापीठ अनुदान आयोगाने १९ केन्द्रीय विद्यापीठांत शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या निर्मितीला मान्यता दिली. तसेच बाराव्या योजनेत या विद्यापीठांना ११० करोड़ रुपये मंजूर करण्यात आले होते. त्यामध्ये वर्ष २०१३-१४ मध्ये ३५.०० करोड़ रुपये देण्यात आले होते. विद्यापीठ अनुदान आयोगाने तेजपूर विद्यापीठ, राजीव गांधी विद्यापीठ, सिक्किम विद्यापीठ, इंदिरा गांधी नेशनल ट्रायबल युनिवर्सिटी, झारखण्ड केन्द्रीय विद्यापीठ, गुरू घासीदास विद्यापीठ, कर्नाटक केन्द्रीय विद्यापीठ, केरल केन्द्रीय विद्यापीठ आणि विश्व भारती या केंद्रीय विद्यापीठांना लुप्तप्राय भाषा केन्द्राच्या स्थापनेसाठी मान्यता प्रदान केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग प्रत्येक विद्यापीठात आंतरिक आश्वासन प्रकोष्ठ (आईक्यूएसी) च्या स्थापनेसाठी आणि त्याला सुदृढ करण्यासाठी ५.०० लाख रुपयांची आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देणार आहे.

**महाविद्यालयांच्या विकासासाठी आर्थिक साहाय्यः-**

महाविद्यालयांत उपलब्ध असलेल्या सध्याच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगासाठी, पदवीपूर्व अभ्यासक्रमाला कौशल्यधारित बनविण्यासाठी अनुदान आयोग विशेष लक्ष देत आहे. शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या मागास भागात महाविद्यालयांची स्थापना करणे ही सुध्दा आयोगाची एक प्राथमिकता आहे. ३१ मार्च, २०१५ पर्यंत देशात एकूण

४०७६० महाविद्यालये होती. यापैकी ३१ मार्च, २०१५ पर्यंत विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या कलम २ (च) च्या अंतर्गत फक्त ९९४० महाविद्यालयांना म्हणजेच २४ टक्के महाविद्यालयांना मान्यता आहे. एकूण ९९४० महाविद्यालयामधून फक्त ८२०१ महाविद्यालये ही विद्यापीठ अनुदान आयोग कायद्यातील कलम १२ (ख) च्या अंतर्गत अनुदान प्राप्त करण्यास पात्र आहेत.

**गुणवत्ता आणि उत्कृष्टता:-**

महाविद्यालयात प्रामुख्याने शैक्षणिक गुणवत्ता व संशोधनवृत्ती निर्माण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने 'उत्कृष्टतेची संभाव्यता असलेले महाविद्यालय' (सीपीई) नावाची एक योजना सुरू केली आहे. वर्तमान काळात १७२ महाविद्यालयांना सीपीई दर्जा प्राप्त आहे. तसेच १४ महाविद्यालयांना उत्कृष्टतेचे महाविद्यालय (सीई) दर्जा प्राप्त आहे. वर्ष २०१४-१५ मध्ये या योजनेतंर्गत महाविद्यालयांना ५१,९३,५०,००० रुपये अनुदान म्हणून देण्यात आले. आयोगाने वर्ष २००१ मध्ये विभिन्न 'आंतर-विषयक क्षेत्रांमध्ये अध्ययन तसेच संशोधनासाठी नव्या केंद्रांची स्थापना' ही योजना सुरू केली आहे. वर्तमानात गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसरमध्ये श्री गुरु ग्रंथ साहिब राष्ट्रीय अध्ययन हे एक केन्द्र सुरू आहे. वर्ष २०१३-१४ मध्ये या केन्द्राला ४.०० करोड़ रुपये मंजूर करण्यात आले होते. तथापि बाराव्या पंचवार्षिक योजनेत ही योजना बंद करण्यात आली आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी तसेच संशोधनाची उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी विशेष साहाय्य कार्यक्रमातंर्गत जीवविज्ञान, अभियांत्रिकी, प्रौद्योगिकी, मानव्यशास्त्रे तसेच सामाजिक विज्ञानसहित विज्ञानाच्या विद्यापीठ विभागांना आर्थिक साहाय्य प्रदान केले जात आहे. वर्ष २०१४-२०१५ मध्ये एसएपी सहाय्य प्राप्त विद्यापीठांची संख्या मागच्या वर्षातील ९१९ च्या तुलनेत ८६३ इतकी होती. वर्ष २०१४-२०१५ मध्ये विविध योजनांव्दारा विभागांना ३१.२६ करोड़ रूपये आर्थिक साहाय्य प्रदान केले गेले.

**संशोधन संवर्धन:-**

विद्यापीठ अनुदान आयोगाव्दारा शिक्षकांसाठी विविध संशोधन योजना सुरू करण्यात आल्या आहेत. या योजनांचा मुख्य उद्देश, विविध शाखात विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षकांच्या संशोधन कार्यक्रमांना आर्थिक साहाय्य प्रदान करून उच्च शिक्षणातील संशोधनातील उत्कृष्टतेला प्रोत्साहित करणे हा आहे. वर्ष २०१४-१५ मध्ये औषधी व आयुर्विज्ञान सह विज्ञान आणि अभियांत्रिकीमध्ये ६०३ मेजर रिसर्च प्रोजेक्ट तसेच मानव्यशास्त्रे, सामाजिक विज्ञान आणि भाषा या मध्ये ४१४ मेजर रिसर्च प्रोजेक्ट ची शिफारस करण्यात आली. यासाठी क्रमशः ३१.३१ करोड़ रुपये व १६.३९ करोड़ रुपयांचे अनुदान देण्यात आले. अनुसूचित जाती व जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी पोष्ट डॉक्टरल फेलोशिप ची योजना सुरू केली आहे. २०१४-१५ मध्ये या योजनेतंर्गत अनुसूचित जाती व जमातींच्या १०० निवडक विद्यार्थ्यांना ११.६३ करोड़ रुपये अनुदान देण्यात आले. मानव्यविद्या, भाषा व सामाजिक शास्त्र शाखेतील महिलांसाठी डॉ. एस. राधाकृष्णन पोस्ट डाक्टरेल फेलोशिप योजना योजना भारतातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांत उच्च अध्ययन व संशोधन करण्याची संधी उपलब्ध करून देत आहे. विज्ञान शाखेतील विषयांसाठी डॉ. डी. एस. कोठारी यांच्या नावे एक नवी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत आजपर्यंत १५८८ विद्यार्थ्यांना ही फेलोशिप देण्यात आली असून यावर २०१४-१५ मध्ये २६.९३ करोड़ रुपये खर्च करण्यात आले आहेत. थोडक्यात, विद्यापीठे व महाविद्यालयांतील संशोधनाचा दर्जा वाढविण्यासाठी अनुदान आयोगाच्या असंख्य योजना आहेत. या योजनांची सविस्तर माहिती आयोगाच्या वेबसाईटवर मिळते.

**लिंग आणि सामाजिक समानता:-**

देशातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांत महिला

अध्ययन केंद्रांचा विकास आणि क्षमता निर्माण करण्यासाठी तसेच उच्च शिक्षण क्षेत्रात महिला प्रबंधक योजनांचा उद्देश विद्यापीठ प्रणालीमध्ये सांविधिक विभागाच्या रूपात स्थापन करून विद्यापीठांत महिला अध्ययन केन्द्रांना सुदृढ करणे व उच्च शिक्षणात महिलांचा सहभाग वाढविणे हा आहे. ३१ मार्च २०१५ पर्यंत देशातील विविध विद्यापीठात १५३ महिला अध्ययन केन्द्रे स्थापित केली गेली आहेत. या केंद्रांसाठी वर्ष २०१४-१५ मध्ये ९.५४ करोड़ रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. विद्यापीठातील अनुसूचित जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश, शिक्षक व शिक्षकेत्तर पदावरील भरतीसाठी आरक्षण धोरणाची योग्य अंमलबजावणी व्हावी यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग विद्यापीठात अनुसूचित जाती-जमाती सेल स्थापन करण्यासाठी आर्थिक मदत देत आहे. तसेच विद्यापीठे आणि महाविद्यांलयात आरक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी अनुसूचित जाती-जमाती संबंधी स्थायी समितीचे गठन करण्यात आले आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्याक इत्यादी समूहाच्या गरजु विद्यार्थ्यांसाठी नेट-सेट परीक्षा मार्गदर्शन केंद्र, सिव्हिल सेवा मार्गदर्शन केंद्रांची निर्मिती सुध्दा विद्यापीठ अनुदान आयोगाने केली आहे. या केंद्रांच्या व्दारे या मागास समूहातील विद्यार्थ्यांना एका अपेक्षित स्तरापर्यंत आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेत अशा केंद्रांसाठी आयोगाने १३७ विद्यापीठांना २१९५.६७ लाख रुपयांचे अनुदान दिले आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयांना समाजातील वंचित घटकांच्या आवश्यकता आणि अडचणी संदर्भात अधिक संवेदनशील बनविण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठ आणि महाविद्यालयांत 'इक्वल अपॉर्च्युनिटी सेल' ची स्थापना केली आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेत यासाठी ११६ विद्यापीठांना ६०,७५ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे.

थोडक्यात, उपरोक्त विविध अनुदान योजनांच्या माध्यमातून विद्यापीठ अनुदान आयोग देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करीत आहे. तथापि आज अस्तित्वात असलेल्या विद्यापीठ व महाविद्यालयांची संख्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत कमीच आहे. ही बाब लक्षात घेऊन नवीन विद्यापीठे व महाविद्यालये निर्माण करण्याची आवश्यकता आज जाणवू लागली आहे व त्यासाठी प्रयत्न सुध्दा होत आहेत. नवीन विद्यापीठे व महाविद्यालयांच्या स्थापनेमुळे उच्च शिक्षणासाठीच्या प्रवेश क्षमतेत निश्चितच वाढ होईल हे जरी खरे असले तरी ही व्यवस्था आणखी विस्तारित करणे आवश्यक आहे.

संदर्भः-

१. विद्यापीठ अनुदान आयोगाचा वार्षिक अहवाल २०१४-१५, प्रकाशक, सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, बहादुर शाह ज़फ़र मार्ग, नई दिल्ली-११० ००२

2. http://www.ugc.ac.in/

3. http://www.ugc.ac.in/pdfnews/2465555_Annual-Report-2014-15.pdf

4. http://mhrd.gov.in/

* * *

# भारतातील उच्च शिक्षणातील समस्या

डॉ. अशोक बोरकर

**प्रस्तावना :**

भारतीय समाज जाती स्तरीकृत व ज्यात हिंदू समाज व्यवस्थेप्रमाणे फक्त ब्राह्मणांनाच शिक्षण घेण्याचा व शिक्षण देण्याचा अधिकार होता. ब्राह्मण जेव्हा शिक्षण देण्याच्या व्यवसायातून स्वत:स वेगळा करतो किंवा फक्त आपल्या समूहापर्यंत किंवा उच्च वर्गापुरतेच सीमित ठेवतो तेव्हा शिक्षणाची दारे सामान्यांसाठी बंद होतात. स्मृती व धर्मग्रंथांनी कोणते व किती शिक्षण कुणास द्यावे याचीदेखील नियमावली दिली आहे. परिणामी शिक्षणाची दारे व शिक्षणाच सामान्यांसाठी बंद झाले. संस्कृत शिक्षण तर ब्राह्मणांव्यतिरिक्त इतर अनेकांसाठी नव्हतेच.

मोगल कालखंडात भारतीय शिक्षण व्यवस्थेत जास्त बदल होत नाही. आजच्या शिक्षा व्यवस्थेची सुरवात फ्रेंच, पोर्तुगीज व इंग्रज भारतात आल्यानंतरच होते. भारतीयांना समजण्यासाठी ते पाठ वाचन व इंडॉलाजी यास प्राध्यान्य देतात. यासाठी भारतीयांची मदत त्यांना गरजेचे वाटते. प्रशासकीय सेवा, कायदे व्यवस्था व न्याय व्यवस्थेच्या स्थिरतेसाठी कायदा शाखेचे अध्ययन त्याची लोकप्रियता आदी कामांसाठी भारतात उच्च शिक्षणाची सोय १८५७ मध्ये मुंबई व कलकत्ता विद्यापीठांची स्थापना करुन ब्रिटिश प्रशासन करते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी (१९४७ पर्यंत) भारतात एकूण अठरा विद्यापीठांची स्थापना होते. इंग्रजीत शिक्षण घेतलेला, इंग्रज प्रशासनासाठी सोयीचा ठरेल, त्यांनी स्थापन केलेल्या न्याय व कायदे पद्धतीला साहाय्यक ठरेल आणि भारतीय व्यवस्थेचे ज्ञान शासकांना देईल एवढ्या मर्यादित हेतूतून या शिक्षणाची सुरवात झाली होती.

भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा तेथे अठरा विद्यापीठे होती आणि १९५१ मध्ये उच्च शिक्षणासाठी नोंदणीकृत विद्यार्थी जवळपास चार लक्ष होते. ज्यात स्त्रियांचा वाटा ४३ हजार (जवळपास १० टक्के) होता. वर्ष २०१०-११ मध्ये १६९ लक्ष विद्यार्थ्यांची नोंद होती. ज्यात ७० लक्ष स्त्रिया होत्या. याचाच अर्थ भारतात या साठ वर्षांच्या कालखंडात भरीव वाढ झाली. एकूण विद्यापीठांची संख्या ६२८ पर्यंत गेली. तर कॉलेजेसची संख्या जवळपास ७०० वरुन ३३ हजारांवर पाहोचली. (पाहा Higher Education in India At A Glance आणि UGC Annual Report 2012-13) उच्च शिक्षणास एकूण शिक्षणाचा भाग समजण्यात येते व ज्यावर काही अपवाद वगळता GDP च्याचार टक्क्यांपेक्षा कमी खर्च करण्यात आला आणि त्यातलाही ८५ ते ९० टक्के पैसा शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च होतो. उच्च शिक्षणास यातून वेगळे करुन पाहिल्यास त्यासाठी GDP च्या १.२५ टक्क्यांपर्यंतच खर्च करण्यात येतो. विकसित देशांमध्ये शिक्षणावरचा खर्च GDP च्या ५ ते ७ टक्के व उच्च शिक्षणासाठी २ ते ४ टक्क्यांपर्यंत आहे. संशोधन आणि विकासासाठी लागणारे कार्यक्षम व मुबलक मनुष्यबळ निर्माण करण्यात भारताला आलेल्या अपयशात त्यावर होणाऱ्या एकूण खर्चांचा विचार अग्रस्थानी करण्यात येतो.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात शिक्षणाचा विस्तार झाला. हे आपणास वर स्पष्ट झाले आहे. पण त्यात गुणवत्ता किती? गुणवत्तेचा प्रश्न उच्च शिक्षणासाठी कसा हाताळला गेला? की इंग्रजांच्या शिक्षण व्यवस्थेची री ओढली गेली? शिक्षणाचे भारतीयकरण म्हणजे काय? हे सर्व संबंधित प्रश्न आहेत.

भारतातील कोणत्याही विद्यापीठाची क्रमवारी जागतिक विद्यापीठांच्या पहिल्या शंभर पसंती क्राम येत नाही. भारतातील विद्यापीठांचा दर्जा सुधारावा, शिक्षणाचा दर्जा सुधारावा, चांगले गुणवंत विचारवंत व प्रशासक

समाजशास्त्र विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

निर्माण व्हावेत यासाठी पंडित नेहरूंनी केंद्रीय विद्यापीठाची संकल्पना मांडली. याच्या परिणामी आतापर्यंत (वर नोंदविल्याप्रमाणे) ४४ केंद्रीय विद्यापीठांची स्थापना झाली. उच्च शिक्षणावर होणाऱ्या योजना अंतर्गत खर्चापैकी ३८ टक्के रक्कम वर्ष २०१२-१३ मध्ये UGC ने केंद्रीय विद्यापीठांना दिले, तर ३०१ राज्य विद्यापीठांना १९ टक्के व ३३ हजार महाविद्यालयांना मात्र ६ टक्के रक्कम दिली. वास्तव केंद्रीय विद्यापीठांचे अकादमिक ऑडिट आवश्यक ठरते. कारण जो उच्च स्तर त्यांच्याकडून अपेक्षित आहे तो त्यांनी गाठला की नाही? या प्रश्नांचे उत्तर या केंद्रीय विद्यापीठांनी व UGC ने द्यायला हवे.

केंद्रीय विद्यापीठांमध्ये ते जे.एन.यु. दिल्ली किंवा हैदराबाद विद्यापीठ असेल जागतिक क्रमवारीत पहिल्या शंभरात नाहीत? हा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर या विद्यापीठाच्या किंवा भारतीय विद्यापीठांच्या शिक्षण व्यवस्थेत काही प्रमाणात आहेच. पण त्याहीपेक्षा भारतीयांच्या मानसिकतेत, उंचावलेल्या अपेक्षांमध्ये आणि पायाभूत सुविधांमध्ये आहे. भारतातील प्राध्यापक, शिक्षक व आजी-माजी विद्यार्थी ज्या संस्थेतून त्याने शिक्षण घेतले, घेत आहेत किंवा दिले, देत आहे त्या संस्थांना चांगल्या समजत नाही व तशी नोंद विद्यापीठांच्या होणाऱ्या सर्व्हेत करीत नाही. यामध्ये आपली संस्था चांगली आहे व त्यात सुधारणा करुन तिचा स्तर उंचावला जाऊ शकतो हे त्यांना मान्य नसते. या उलट शैक्षणिक सहलींचे (Ecucational Tourism) आयोजन करणारे विद्यापीठ किंवा संस्था अनेकांच्या ऐकिवात असतात व त्यांच्या शिक्षण स्तरापेक्षा त्यांनी दाखवलेल्या पायाभूत सेवा आम्हास जास्त आकर्षित करतात. शिक्षकांनी विदेशांत जाऊन एखादी परिषद, परिसंवाद किंवा शॉर्ट टर्म कोर्स केल्यास तो भारतात इतरांपेक्षा जास्त विद्वान व योग्य ठरतो, असे शिक्षक आपण सर्वत्र पाहतोच. हीच स्थिती विद्यार्थ्यांची आहे. मध्यमवर्ग मुलांच्या उज्जव भवितव्यासाठी त्यांना चांगल्या दर्जेदार शिक्षण संस्थेमध्ये पाठवू इच्छितो व या संस्था विदेशांत असतील तर त्या दर्जेदार आहेतच असे आपण हमखास समजतो. याचा अर्थ भारतीय विद्यापीठे व संस्था चांगल्या आहेत, त्यांच्यात पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत असे देखील म्हणता येत नाही. लेखाच्या सुरवातीला ज्या तीन मुलींच्या आत्महत्येचे उदाहरण आले आहे ते विज्ञान व तंत्रज्ञान संस्थांच्या स्थितीस स्पष्ट करणारे प्रातिनिधिक उदाहरण असून या शिक्षणाने आपल्या आयुष्याशी खिलवाड होते अशी भावना किंवा आत्मबोध ज्या विद्यार्थ्यांना होतो त्या तिघी होत्या.यातून आयुष्याचा पुढचा अंधकार असह्य झाल्याने त्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

यासबंधी वर नोंदवलेल्या संदर्भाप्रमाणे वैद्यकीय विद्यार्थ्यांना होस्टेल नसून त्यांना पेशंटसोबत वॉर्डात रहावे लागत असेल, त्यांना पुरवलेले अन्न अपुरे व खाण्या योग्य नसेल, त्यांच्याजवळ प्रात्याक्षिकांची सोय नसेल, ज्याची अनुमतीच नाही असे कोर्स सुरु असतील, न-झेपावणारा खर्च करुन देखील शिक्षणाच्या पायाभूत सुविधा व सामान्य दर्जा या संस्थांमधून प्राप्त होत नाही. अशा हजारों खासगी संस्थांमधून विद्यार्थी भारतात B.Ed., B.PED., अभियांत्रिकी, वैद्यकीय, कायदेविषयक आणि प्रबंधनाचे शिक्षण घेत आहेत. जवळजवळ सर्व खासगी संस्था या प्रोफेशनल शिक्षण देण्याचे काम करतात. कारण विद्यार्थी हमखास मिळतात व त्यांच्याकडून पैसा मिळतो. ज्याने शिक्षणाच्या खासगीकरणातून निर्माण झालेल्या खासगी शिक्षण संस्थांचा शिक्षणाचा व्यापार चालतो. या कारणांनीच भारतातील बहुतांश खासगी संस्था जागतिक क्रमवारीत स्थान ठेवत नाहीत. तसेच वर नोंदवलेल्या विषयांमध्ये जेवढी प्रोफेशनल्सची मागणी आहे त्यापेक्षा त्यांचा पुरवठा खूप जास्त आहे. निव्वळ पदवी घेतलेले विद्यार्थी, ज्यांनी गाईड वाचून किंवा अन्य सोप्या मार्गांनी परीक्षा उत्तीर्ण केल्यात, ज्यामुळे मुळातच स्किलची निर्मिती न होता तशा निर्मितीचा फुगा निर्माण होतो. या स्थितीस अपवाद फक्त वैद्यकशास्त्र आहे. कारण पेशंटला आजारात डॉक्टरकडे जायचेच असते व काही सामान्य ज्ञानातून एखादी व्यक्ती वैद्यकीय व्यवसाय सहज करू शकते. इतर शास्त्रांत स्थिती वेगळी आहे. स्वतंत्र व्यवसायाची योग्यता नसते, तसेच व्यवसायांची उपलब्धता बरीच कमी असल्याने प्रचंड स्पर्धा असते व प्रत्येकाजवळ पदवी असते. अशा स्थितीत पडेल त्या

वेतनावर काम करतांना हे विद्यार्थी आपणास दिसतात.

शासकीय संस्थांची संख्या कमी आहे. तसेच शासकीय शिक्षण संस्थांमध्ये गुणवत्ता नसते असा समज समाजात सर्वत्र मध्यम व उच्चवर्गात पसरला असल्याने नकारात्मक दृष्टिने पाहिले जाते. त्यातही सीमित जागा व त्यावर राखीव जागा किंवा आरक्षण असल्याने जातीविषयींच्या समाजातील भेदभावपूर्ण दृष्टिकोन त्यातही दिसतो. त्यामुळे आरक्षणामुळे शासकीय शिक्षण संस्थांची गुणवत्ता (Merit) ढासळली व त्या आपल्या योग्य राहिल्या नाहीत असे चित्र शिक्षणातील आरक्षण व गुणवत्तेबद्दल नकारात्मक मत ठेवणाऱ्याचे मत आहे.

१९७०-८० च्या कालखंडात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राने जगभरात मोठी भरारी घेतली. एक नवे तंत्रज्ञान क्षेत्र यामुळे निर्माण झाले. भारतीयांनी यात प्रचंड मजल मारली. सिलिकॉन व्हॅलीतील अनेक कंपन्या पूर्वाश्रमीच्या भारतीयांच्या आहेत. या क्षेत्रातील मायक्रोसॉफ्ट, आय.बी.एम., गुगल, फेसबुक, अॅपल आदी अनेक नामवंत कंपन्यांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण पदांवर पूर्वाश्रमीचे भारतीय आहेत आणि त्यामध्ये मात्र मेरिट आहे. आता माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासोबतच रोबोटिक्स, नॅनोटेक व बायोटेक ही नवी ज्ञान दालने खुली झाली आहेत व त्यांच्यात भारतीय दिसत नाहीत कारण इथल्या उच्च शिक्षण संस्थांनी गुणवत्तेची पायमल्ली करुन आरक्षणाचे धोरण स्वीकारले आहे. हा युक्तिवाद जवळजवळ अनुसूचित जाती व जमातींचे लोक वगळता सर्वच स्तरांतून दिला जातो. ज्यात सर्वच सामाजिक स्तरातील स्त्रिया व इतर मागासवर्गीयांचा देखील समावेश आहे. स्वतः आरक्षणाचा वाटा मागणाऱ्या इतर मागासवर्गीय तसेच अनुसूचित जाती, जमाती वगळता जेव्हा सर्वच स्तरांतील स्त्रिया आरक्षणामुळे गुणवत्ता ढासळली असे मत ठेवतात तेव्हा एकतर त्यांना त्यांच्या कर्तृत्वावर (Ability) विश्वास नाही किंवा दुसरे म्हणजे त्यांना अनुसूचित जाती अर्थात दलितांच्या होणाऱ्या थोड्या फार विकासाला पाहावत नाही आणि यात भारतातील जाती व्यवस्था व जातीय मानसिकता महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते.

सोशल इनक्लूझन (Inclusion) चे तत्त्व मान्य केल्यानंतर वर्ष २००० नंतर भारतात IIT, IIM, AIMS सारख्या तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र आणि व्यवस्थापन शास्त्रांशी संबंधित दर्जेदार (!) संस्थामध्ये आरक्षणाचे धोरण शिक्षक भरती व विद्यार्थ्यांचा प्रवेशासाठी राबवण्यात आले. मनुष्यबळ विकासमंत्री (HRD) श्री. अर्जुनसिंगांची कारकीर्द इनक्लुझन पॉलिसीविरुद्ध समाजाचे जातिवादी एक्सक्लूझन (Exclusion-बहिर्वृत्तता) धोरण याच्या संघर्षातून गाजली आणि शेवटी शासनाने नमते घेऊन या संस्थेमधील विद्यार्थी संख्येस आरक्षणासाठी विभाजित न करता आरक्षणासाठी आावश्यक अतिरिक्त विद्यार्थी क्षमता निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले. अर्थात या कालखंडापर्यंत व अजूनही आरक्षणातील (अतिरिक्त) विद्यार्थी संख्या सोडल्यास गुणवान विद्यार्थी व शिक्षक या संस्थेमध्ये शिक्षण घेत देत आहेत तेव्हा शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता का व कशी खालावली? नव्या येऊ घातलेल्या ज्ञान शाखांमध्ये प्रभुत्व गाजवण्यासाठी भारताचे मेरिट का कमी पडत आहे? हे मेरिट आता आलेच तर कुठून येईल? हे काही प्रश्न यातून पुढे येतात.

भारतीय मानसिकतेप्रमाणे खरेतर हा पेपर पुढे वाचण्यासाठी योग्य राहत नाही, कारण आता मुळातच जातीच्या विवेचनातून या प्रश्नांची उत्तरे येणार आहेत. अश्विनी देशपांडे यांच्या हल्लीच प्रकाशित झालेल्या अध्ययनात अनसूचित जाती अर्थात दलितांविषयींच्या उच्चजातीय हिंदूचा दृष्टिकोन किती भेदभावपूर्ण व नकारात्मक आहे हे दिसते. त्यांच्या नोंदीप्रमाणे चॅरिटी अर्थात दान देतांना जर दान देणाऱ्यास हे माहीत झाले की हे दान दलितांना जाणार आहे तर ते दान देत नाहीत. यात दान हे पवित्र कर्म म्हणून भारतीय समाजातील सर्वच धर्मात मान्यता आहे. ते ते अत्यंत गरजूंना मिळाल्यास त्याएवढे पुण्य नाही. पण ते दलितांना (शत्रूंना) मिळू नये अशी हिंदूची भावना यातून व्यक्त होते. अशा स्थितीत आरक्षण, समान दर्जा, समानता या कल्पनाच त्यांच्यासाठी असहय्य होत असतील! शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता खालावली या नोंदीमध्ये काम करणारी ही एक महत्त्वपूर्ण सामाजिक मानसिकता दुसरे, १९७० च्या सुमारास भारतीयांनी जे IT क्षेत्रात पदार्पण केले व

आज त्यांनी जगात या क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला त्यामागचे कारण या कालखंडात IT संबंधित क्षेत्रात जे विद्यार्थी आले ते प्रामुख्याने उच्च शिक्षण घेणाऱ्या/ घेतलेल्या कुटुंबांतल्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या पिढीतले होते. शिक्षण देणारे व शिक्षण घेणारे हे दोघेही परंपरागत जातीवर्ण व्यवस्थेने ज्यांना शिक्षण देण्याचा व घेण्याचा अधिकार दिला होता, त्यातूनच होते तसेच त्यातला काही भाग प्रभावी (Dominant) जातीतून होता. ज्यांना शिक्षणाचे महत्त्व समजले होते व ज्यांनी शिक्षणातील आणि व्यवसायातील गतिशीलतेस मानसिकरीत्या स्वीकारले होते, यात अत्यंत अल्प प्रमाणात इतर समूहांच्या/जातीच्या व्यक्तींचा अंतरर्भाव होता. स्पर्धात्मकता कमी होती, सामाजिक संस्थागत कौटुंबिक साहाय्य प्राप्त होते, ज्यातून IT क्षेत्रावर वर्चस्व गाजवणारा भारतीयांचा वर्ग निर्माण झाला.

एकविसाव्या शतकात जागतिकीकरण, प्रसार माध्यमांच्या विस्ताराने प्रभावी जातीप्रमाणेच इतर मागासवर्गीय व अनुसूचित जाती-जमातीतले लोक या स्पर्धेत आले, ज्यामुळे शिक्षण क्षेत्रावर एकाधिकार असणाऱ्या समूहास तसेच प्रभू जातींच्या वर्चस्वास तडा गेला. कारण त्यांची १९७०-८०-९० या दशकातील पिढी अनिवासी भारतीय झाली आहे. या अनिवासींना आपले प्रभुत्व भारतातून गमावल्याची खंत होत नसेल का? भारतीय उच्च शिक्षण संस्थांची गुणवत्ता आरक्षणामुळे नव्हे तर परंपरागत जाती/वर्गानी त्यावरचे प्रभुत्व गमावल्यामुळे संपते.

भारतात प्राथमिक शिक्षणाची दुर्दशा हे शिक्षण भारतात सुरू झाल्यापासूनच होती. पण शिक्षणाची नवी दालने निर्माण झाल्यावर शिक्षणावर एकाधिकार ठेवणाऱ्यांनी तसेच ज्यांना त्यावेळी शिक्षणाची संधी प्राप्त झाली व ज्यांच्याशी जास्त भेदभाव काही कारणांस्तव झाला नाही त्यांनी सर्वप्रथम या संधीचा फायदा घेतला, ज्यामुळे ते त्या काळात इंग्रज प्रशासनाचा भाग झाले. शिक्षक व विद्यार्थी हे समान-समांतर समूहांतून असल्याने त्यांच्यात जास्त अंतर नव्हते. ज्यामुळे एक दुसऱ्याबद्दल आस्था-आपुलकी-आत्मीयता व पुढे नेण्याची इच्छा होती. ही स्थिती भारतात आरक्षण स्थिती प्रत्यक्षात भारतात लागू (इ.स. १९९०-२०००) होत होती. विशेषाधिकार प्राप्त समूह शिक्षक व विद्यार्थी म्हणून त्यानंतर अत्यंत कमी होतो, कारण एकतर तो NRI झाला किंवा सेवानिवृत्त झाला. भारतातील जे इतर जाती समूहांच्या लोकांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे स्थान घेतले. त्यांच्यात शिक्षणाचे मूल्य आकलन आपल्या व समूह आणि समाजाच्या गतिशीलतेसाठी स्थिरावले नाही. त्यामुळे शिक्षण देणे व घेणे या दोन्ही बाबी जवळ जवळ मूल्यहीन झाल्या व प्रमाणपत्र/पदवी प्राप्त करणे यालाच महत्त्व प्राप्त झाले. भारतीय शिक्षण व्यवस्था परंपराधिष्ठित समाज रचनेच्या बाहेर जाऊन शिक्षणाचे सामाजिक अभ्युदयातील मूल्य स्थापित करण्यात अपयशी ठरली आणि याच कारणाने शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता खालावली.

नव्या येऊ घातलेल्या ज्ञानशाखांत जर भारतीयांना प्रभुत्व गाजवायचे असेल (अनिवासी भारतीयांना नव्हे) तर प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षण अशा संपूर्ण शिक्षण क्षेत्राची पुनः मांडणी करुन शिक्षणाच्या मूल्यांची व शैक्षणिक धोरणाची निश्चिती करावी लागेल. याच संदर्भात २०१३ ते २०१५ या कालखंडात उच्च शिक्षण क्षेत्रात चर्चेस असलेला नवीन शैक्षणिक धोरणाचा मसुदा खारिज केला गेला. हिच बाब महाराष्ट्र राज्य सरकारने केंद्राप्रमाणे राज्यांत शैक्षणिक धोरणाचा पुन्हा आराखडा निर्माण करण्याच्या नावाखाली केली. निश्चित धोरणाचा अभाव व धोरण असल्यास त्यातील अंमलबजावणीत दिरंगाई किंवा हितसंबंधांची जोपासणूक या कारणांनी शैक्षणिक क्षेत्र एका मोठ्या भ्रष्टाचाराच्या चक्रात सापडले आहे आणि त्यामागचे मूळ कारण अजूनही जाती संस्थेस असलेले महत्त्व आहे.

पायाभूत सुविधा - जेव्हा वंचित वर्ग/समूह - स्त्रिया, दलित, आदिवासी व अन्य मागासवर्ग शिक्षणाकडे वळतो तेव्हा शिक्षणाचे आकर्षण राहावे, त्यांना तिथे टिकवून ठेवता यावे आदीसाठी काही मूलभूत सेवा असायलाच हव्यात. जसे मुलींसाठी टॉयलेट व कॉमनरुम नसेल तर त्याच्या गळतीचे प्रमाण जास्त होते व त्या शिक्षणाकडे पुन्हा वळत नाहीत. वंचित वर्गास आपला

अभ्युदय शिक्षणातून होईल हे वाटल्याशिवाय शिक्षण त्यांच्यासाठी निरर्थक ठरते. शासकीय प्रयत्न, राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचे प्रयत्न, वंचिततेच्या स्थितीची जाणीव करुन देणारी चळवळ व सातत्यपूर्ण पाठपुरावा या सर्व बाबी वंचित वर्गात शिक्षणाच्या प्रचारासाठी आवश्यक आहेत. अशी दखल अमर्त्य सेन (पृ. १४-१५) घेतात. कमुनिस्टांच्या राजवटीत ही बाब केरळमध्ये घडली व स्त्री शिक्षण आणि एकूणच प्राथमिक शिक्षणात हे राज्य ९५ टक्क्यांच्यावर साक्षरता ठेवून सर्वप्रथम आहे. महाराष्ट्रात आंबेडकरी चळवळीने या चळवळीशी संबंधित समूहात जे आत्मभान निर्माण केले त्यातून त्यांच्याशी संबंधित शिक्षणाचा दर्जा उंचावल्याचे स्पष्ट होते. केरळ राज्याने प्राथमिक शिक्षणात जे सामूहिक प्रयत्नांतून साध्य केले त्यास ते उच्च शिक्षणात परिवर्तीत करु शकले नाहीत कारण एकतर ते उच्च शिक्षणांचे महत्त्व वंचित समूहापर्यंत पोहचवू शकले नाहीत व दुसरे त्यांच्यात आत्मभान निर्माण करणे हा कम्युनिस्ट चळवळीचा विषय नव्हता कारण त्यामूळे जातींना महत्त्व आले असते व कम्युनिस्ट चळवळ स्वत: संकल्पग्रस्त झाली असती. कम्युनिस्ट चळवळ भारतात आपले स्थान जनसमूहात घट्ट करु शकल्या नाहीत. कारण हा समाज जातीगत आहे, वर्गगत नाही आणि जातींना कम्युनिस्टांनी आपल्या पक्ष संघटनेत व विचारसरणीत स्थान दिले नाही.

**समारोप :**

वंचित, अप्रतिष्ठित, मागास व व्यवस्थेने ज्यांचा शिक्षणासाठी अस्वीकार केला त्या वर्गाच्या प्राथमिक व त्यानंतरच्या शिक्षणात ज्या तीन महत्त्वपूर्ण अडचणी वर नोंदवल्या त्यांवर मात करुन काही विद्यार्थी स्व-इच्छेने किंवा पालकांच्या साहाय्याने कसेबसे पदवी शिक्षणाकडे येतात आणि म्हणूनच भारतात पदवी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मात्र ६.५ टक्के आहे. हे शिक्षण घेताना त्यानंतर चांगली नोकरी मिळविणे, पैसा कमावणे व सुखी होणे याच बाबी महत्त्वाच्या असतात. मुळात आपण काही वेगळे, महत्त्वाचे काम करू शकतो किंवा केले पाहिजे हे त्यांच्या एकूणच विचारांना स्पर्श करीत नाही. भारतीय उच्च शिक्षणातून मूलभूत संशोधन व संशोधन पर लेखनाची जी कमतरता दिसते त्यामागे तशी इच्छा नसणे हे महत्त्वाचे कारण आहे.

रोहित वेमुला या विद्यार्थ्याने आत्महत्या केली व या लेखाच्या सुरवातीस या घटनेची नोंद घेतली आहे. रोहित हा रिसर्च स्कॉलर होता ज्याला ज्युनियर रिसर्च फेलोशिप (JRF) प्राप्त झाली होती. हा विद्यार्थी, विद्यार्थी चळवळीशी संबंधित होता. पहिले तो अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) चा नंतर कम्युनिस्ट व त्यानंतर आंबेडकर स्टुडंटस असोसिएशन (ASA) चा सक्रिय कार्यकर्ता होता. ABVP ते ASA हा त्याचा प्रवास त्याच्या जातीमुळे व त्यांच्यात निर्माण झालेल्या आत्मभावामुळे झाला होता.

**संदर्भ :**

1. Deshpande, Ashwini & Dean Spears, 2014 *Who is the identifiable victim? caste and charitable giving among Indian Elites*, working paper 236, Centre of Development Economics, Delhi School of Economics, Delhi.

2. Janardhanan, Arun 2016 *3 Girls commit suicide in Tamil Nadu, blaming College, high fees* in The India Express (Daily) P. 1, January 25.

3. Lakshman & Henry 2016 *The American Dream and the enigma of departure* in The Hindu (Daily), Hyderabad Edition, P. 11, January 23.

4. Sen, Amartya & Dreze, Jean 2010 *India Development : Select Regional Perspective*, Oxford University Press, New Delhi.

5. UGC Annual Report 2012-13.

6. UGC 2012 *Higher Education : India at a Glance*, Brochare. UGC, New Delhi.

* * *

# लिंगभाव आणि उच्च शिक्षणातील आव्हाने

**प्रा. डॉ. धनंजय सोनटक्के**

**प्रस्तावना :**

उच्च शिक्षण कशाला म्हणायचे, अमुक एक अभ्यासक्रम उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बसतो की नाही ते कसे ठरवायच, हा वादाचा विषय होऊ शकतो. इंटरनॅशनल स्टँडर्ड क्लासिफिकेशन ऑफ एज्युकेशन या पुस्तकात म्हटले आहे की, जवळ-जवळ ११ वर्षे उत्तम पायाभूत शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थी जे विशेष शिक्षण घेतो, त्याला उच्च शिक्षण म्हणतात. या पुस्तकात उच्च शिक्षणाच्या तीन पातळ्या दर्शविल्या आहेत. काही विशिष्ट व्यवसायांना अनुलक्षून अभ्यासक्रम उदा. परिचारक व्यवसाय किंवा शिक्षक होण्यासाठीची अर्हता देणारा अभ्यासक्रम, हे पहिल्या पातळीवर येतात. त्याच्या वरच्या पातळीवर अभ्यासक्रमांतून ज्यामुळे पदवी मिळते असे अभ्यासक्रम येतात. तिसरी पातळी ही पदव्युत्तर व संशोधनपर अभ्यासक्रमाची होय (भावे, २००९). उच्च शिक्षण मुख्यत: महाविद्यालय, विद्यापीठे व व्यावसायिक संस्थांमधून दिले जाते. उच्च शिक्षण हे कोणत्याही देशातील आर्थिक, आणि सामाजिक-सांस्कृतिक प्रगती व मानव विकासाला साध्य करण्यासाठी कळीचा मुद्दा आहे. परंतु त्याकरिता महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते देशातील प्रत्येक नागरिकाला जात, धर्म, लिंग यापलीकडे जाऊन उपलब्ध होणे आवश्यक आहे. उच्च शिक्षण जर समाजातील काहीच घटकांपुरते मर्यादित असेल तर मानवी विकासातील सहा महत्त्वाचे निर्देशांक, समता, निरंतर विकास, सृजनात्मकता, सक्षमीकरण, सहकार व सुरक्षा हे साध्य करता येणे शक्य होणार नाही. म्हणूनच उच्च शिक्षणातील समान उपलब्धता व संधी ही सामाजिक विकासातील मूलभूत आवश्यकता आहे.

आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकारांसंबंधीच्या संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय करारातील (१९६६) कलम १३ असे म्हणते की, "उच्च शिक्षण हे सर्वांना त्यांच्या क्षमतेच्या आधारावर, योग्य त्या साधनांद्वारे, विशेषत: विनामूल्य शिक्षणाच्या नितीनुसार उपलब्ध करुन द्यावे." (बोंदरे, २०१३) भारतीय संविधानाच्या तरतुदीनुसार ही शिक्षण हा मूलभूत अधिकार असल्याचे मान्य केले आहे. असे असले तरी आज उच्च शिक्षणातील मुलींचे प्रमाण अल्प असल्याचे दिसून येते. याची कारणमीमांसा केल्यास असे दिसते की, सामाजिक कारणांच्या जोडीलाच उच्च शिक्षण हे लिंगभाव संवेदनशील (Gender Sensitive) नसणे हे देखील आहे.

भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेतील लिंगभाव विषमतेची मीमांसा करतांना असे दिसते की, शिक्षण व स्त्री यांच्यातील ऐतिहासिक संबंधांचा आढावा घेतला असता स्त्रियांच्या संदर्भातील शिक्षणाची परिस्थिती काळानुसार बदलत गेली असल्याचे दिसते. समाज व्यवस्थेच्या स्त्रीसत्ता ते वैदिक काळापासून आलेली पितृसत्ता या संक्रमणाच्या कालखंडात स्त्रियांना असलेले ज्ञान निर्मितीचे अधिकार नाकारण्यात आले. वासाहतिक कालखंडात स्त्रियांवरील ही ज्ञानबंदी शिथिल झाली व काही प्रमाणात शिक्षणाची कवाडे त्यांच्यासाठी काही प्रमाणात खुली झाली, परंतु वासाहतिक कालखंडातील शिक्षणाचा उद्देश आदर्श गृहिणी व माता निर्मितीचा राहिला. भारतीय समाज हा जातवर्गीय व पितृसत्ताक असल्याने लिंगभाव आणि स्त्री शिक्षणाचा परस्पर संबंध अभ्यासणे आवश्यक आहे.

**उच्च शिक्षणातील स्त्रियांची सहभागिता :**

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला स्त्रियांना शिक्षण उपलब्ध झाले असले तरीही त्यांची चौकट परंपरागतच

समाजशास्त्र विभागप्रमुख, प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा dhananjay_dks@rediffmail.com

होती. १९१६ मध्ये महाराष्ट्रात पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापनपा धोंडो केशव कर्वे यांच्या पुढाकाराने झाली. या विद्यापीठाची स्थापना हा जरी एक महत्त्वाचा टप्पा असला तरी या विद्यापीठाचा अभ्यासक्रम मात्र रुढ विचारसरणीवर आधारित होता. गृहविज्ञान पदवी, परिचारिका पदवी असे स्त्रियांना सेवा आणि सुश्रूतेमध्ये ढकलणारे व त्यांची पारंपरिक सेविकेची भूमिका दृढ करणारे अभ्यासक्रम या विद्यापीठात सुरू केले गेले. (तत्रैव)

**उच्च शिक्षणातील स्त्रियांचे प्रमाण :**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात विद्यापीठे, महाविद्यालयांच्या संख्येत वाढ झाली आहे. त्याचबरोबर विद्यार्थी नोंदणीचे प्रमाणही वाढलेले आहे. परंतु स्त्रियांचे प्रमाण विद्यार्थ्यांमध्ये कमी असल्याचे दिसते.

**उच्च शिक्षणातील विद्यार्थिनीच्या संख्येतील वृद्धी दर्शविणारा तक्ता**

**(१९५०-५१ ते २००५-०६)**

(आकडेवारी हजारामध्ये)

| वर्ष | पुरुष | स्त्री | एकूण नोंदणी | स्त्रियांची विद्यार्थी म्हणून टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | १५७ | १७ | १७४ | १०.०० |
| १९५५-५६ | २५२ | ४३ | २९५ | १४.६० |
| १९६०-६१ | ४६८ | ८९ | ५५७ | १६.०० |
| १९६५-६६ | ८४९ | २१८ | १०६७ | २०.४० |
| १९७०-७१ | १५६३ | ३९१ | १९५४ | २०.०० |
| १९७५-७६ | २१३१ | ५९५ | २४२६ | २४.५० |
| १९८०-८१ | २००३ | ७४९ | २७५२ | २७.२० |
| १९८५-८६ | २५१२ | १०५९ | ३५३१ | २९.६० |
| १९९०-९१ | २९८६ | १४३९ | ४४२५ | ३२.५० |
| १९९५-९६ | ४२३५ | २१९१ | ६४२६ | ३४.१० |
| २०००-०१ | ४९८८ | ३०१२ | ८००१ | ३७.६० |
| २२०५-०६ | ६५६२ | ४४६६ | ११०२८ | ४०.५० |

**(Source :** Enrolment of Women in Education (Selected Educational Statistics 2005-06 ; UGC Annual Reports, Various Years) Cited by Nath Shanjendu.)

उच्च शिक्षणातील महिलांचे प्रमाण वाढ असल्याचे दिसून येत असले तरी लिंगभाव विषमता (Gender Inequality) दिसून येते. ही लिंगभाव तफावत (Gender Disparity) मुळातच स्त्रियांकडून असलेल्या पारंपरिक भूमिकेच्या अपेक्षेतून निर्माण झाली आहे. सुशिक्षित कुटुंबामधूनही या पारंपरिक भूमिकेचीच अपेक्षा ठेवली जात असल्याचे दिसते. परिणामत: उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण विवाह इच्छुक व नुकमाच विवाह झालेल्या मुलींमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

Times News Network यांनी २०११ मध्ये प्रकाशित केलेल्या शिक्षणातील गळ्यलेल्या (Droup-outs) विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणात असे दिसून आले की, २६ टक्के मुलींनी गळतीचे कारण घरातील आर्थिक अडचणी असल्याचे नमूद केले. एकूण ९ टक्के मुली या विवाह करुन घर कुटुंब थाटण्याच्या मानसिकतेमुळे गळाल्याचे दिसून आले.

भारतीय समाज व्यवस्थेत विवाह ही स्त्रियांच्या जीवनातील महत्त्वाची घटना मानली जाते. त्यापुढे कार्य, शिक्षण तसेच करिअर या गोष्टी दुय्यम मानल्या जातात. (बोंद्रे २०१३) उच्च शिक्षणातील मुलींचे प्रमाण शहरी व ग्रामीण भागानुसार

अलीकडे कुरुप ए. (२०१२) यांनी भारतातील उच्च शिक्षणातील प्रवाह या आपल्या अध्ययनात असे नमूद केले की, उच्च शिक्षणातील सर्व शाखांमध्ये स्त्रियांच्या नोंदणीचे प्रमाण वाढलेले असले तरी ते प्रमाण देशातील संशोधन क्षेत्रातील कारकीर्दीमध्ये परिवर्तीत होताना दिसत नाही. विज्ञान शाखांतील पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण जवळ-जवळ एकतृतीयांश असले तरी त्यातील जवळ-जवळ १५-२० टक्के महिलाच भारतातील संशोधन संस्था व विद्यापीठांमध्ये पूर्ण वेळ कारकीर्द घडवीत असल्याचे दिसून येते.[१] चिंतेची बाब म्हणजे विज्ञान शाखेमध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया मोठ्या प्रमाणात कनिष्ठ किंवा कमी दर्जा असलेल्या शैक्षणिक पदांवर कार्य करीत असल्याचे दिसून येते.

स्त्रीवादी समाजशास्त्रीय दृष्टिकोनाने, स्त्रियांच्या शैक्षणिक अनुभवांबाबतीतील अनेक बाजू अधोरेखित केल्या आहेत, त्यात त्यांचा अल्प सहभाग, अल्प शैक्षणिक उपलब्धी (Achievement), आणि अल्प प्रतिनिधित्व, लिंगानुरूप भूमिकेचे सामाजिकीकरण व साचेबद्ध बायकी भूमिकांची घडण व त्याचा एकंदरीत मुलींच्या शिक्षणावर झालेला परिणाम इत्यादींचा समावेश होतो. (दिवाण, २०११)

उच्च शिक्षणातील विद्याशाखांची विभागणी सामान्य विषय ज्यात कला, मानवीयशास्त्रे, सामाजिकशास्त्रे यांचा समावेश केला जातो, नैसर्गिक शास्त्रे (मूलभूत विज्ञान, व्यावसायिक शाखा जसे अभियांत्रिकी, वैद्यकीय, शिक्षणशास्त्र कृषी, कायद्याचा अभ्यास इत्यादीप्रमाणे केली जाते. त्याचबरोबर त्याची वर्गवारी 'पुरुषी' व 'बायकी' अशा प्रकारांतही केली जाते. कला, मानव्यशास्त्रे, सामाजिकशास्त्रे व शिक्षणशास्त्र इत्यादी शास्त्रांना 'बायकी' (Feminine) संबोधले जाते तर वाणिज्य, कायदा, अभियांत्रिकी हे विषय 'पुरुषी' मानले जातात. भारतामध्ये इतर दक्षिण आशियाई देशांप्रमाणे वैद्यकीय शाखा ही पुरुषी मानली जात नाही, कारण 'स्त्री रोग्यांना' स्त्री डॉक्टरांकडूनच तपासणी करुन घेण्याची प्रथा येथे दिसून येते. यासाठी स्त्रियांना वैद्यकीय प्रशिक्षणाची गरज निर्माण झाली व त्यांना व क्षेत्रात प्रवेश घेणे शक्य झाले. (चनाना, १९८८)

स्त्रियांना विद्याशाखा निवडीचे स्वातंत्र्य व त्या विद्याशाखेतील ज्ञान प्राप्तीची क्षमता यातील संबंध हा कदापिही स्त्रियांच्या शैक्षणिक गुणवत्ता प्राप्तीशी नसतो असे दिसून येते. भारतामध्ये मुले व मुली यांच्या शैक्षणिक उपलब्धीची तुलना केल्यास असे दिसते की, शालेय शिक्षणातील उपलब्धीमध्ये मुली पुढे आहेत. प्रत्येक वर्षी वर्तमानपत्रांतील बोर्डाच्या निकालांबाबतच्या बातम्यांवरुनही हे सिद्ध होते. परंतु त्यानंतर जेव्हा उच्च शिक्षणातील प्रवेशाचा प्रश्न येतो तेव्हा त्यांना त्यांच्या आवडीनुसार विषय क्षेत्र निवडता येतेच असे नाही. बऱ्याच मुलींना कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावरच विज्ञानासारख्या विषयात प्रवेश घेण्यापासून परावृत्त केले जाते किंवा खासगी गुणवत्ता प्राप्त शाळांमधून प्रवेश घेण्यापासूनही परावृत्त केले जाते. शालेय शिक्षणानंतर ही मुलींच्या उच्च शिक्षणावरुन कुटुंबाकडूनही फारसा खर्च केला जात नाही. जसे ट्युशन क्लासेस, प्रवेश परीक्षांचे वर्ग इत्यादी.

गरीब पालकांची स्थिती किंवा समस्या यापेक्षा वेगळ्या आहेत. त्यांना बऱ्याचदा शिक्षणाचे महत्त्व कळत असते, पण त्यांच्या पेक्षा मुलींचनी शिक्षण घेऊन लवकरात लवकर थोडी फार का हाईना मिळकत करावी असे असते, जे व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवीमधून शक्य होऊ शकते. सामान्य शिक्षण, जरी कमी खर्चिक असले तरी त्यातून लगेच रोजगार प्राप्ती होण्याची शक्यता कदाचित नसते व व्यावसायिक शिक्षण महाग असल्यामुळे परवडू शकत नाही. त्यामुळे त्यांच्यामध्ये एकंदरीतच 'शिक्षणाबद्दल' अनास्था निर्माण होऊन त्या उच्च शिक्षणाच्या प्रक्रियेतून दुरावतात. ही अनास्था दूर करण्यासाठी पदवी अभ्यासक्रमांच्या जोडीलाच

'कौशल्यावर आधारित' अभ्यासक्रमांची जोड देण्यात यावी असा प्रवाह पुढे आला, पण ही कौशल्ये देखील कोणती असावीत याचा विचार केल्यास पुन्हा ती पारंपरिक विचारसरणीचीच असल्याचे दिसते.

**समारोप :**

जगामध्ये शिक्षणाचा विचार हा सत्ताधाऱ्यांच्या गरजांनुसार होत आलेला आहे. भारतही त्याला अपवाद नाही. भारतामध्ये 'बहुजन हिताय-बहुजन सुखाय' ही भूमिका घेण्यापूर्वी शिक्षण ही एका विशिष्ट वर्ण-वर्गापुरती मर्यादित गोष्ट होती. स्त्रियांचाही त्यामधला सहभाग जवळपास नगण्यच होता. स्त्री शिक्षणाचा प्रश्न हा स्त्री प्रश्नाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. म्हणून भारतातील स्त्री प्रश्नांची गुंतागुंत ही स्त्रियांच्या शिक्षणाच्या प्रश्नांमध्येसुद्धा अधोरेखित होते. महात्मा फुले यांनी स्त्री-पुरुष नात्यांतील विषमतेवर घाव घालणारे मूलभूत उपस्थित करतांना, स्त्रिया साक्षर झाल्या की, त्यांना अभिव्यक्त होता येईल आणि हा अभिव्यक्तीचा प्रवास स्त्रियांना समतेच्या जाणीवेकडे घेऊन जाईल अशी स्पष्ट भूमिका घेतली.

यासर्व बाबींचा एकत्रित विचार केल्यास असे दिसते की, उच्च शिक्षण प्राप्त करणे हे मागास वर्गाला, स्त्रियांना कठीण झाले आहे. या अडथळ्यांवर उपाय म्हणून शासनाकडून काही योजना केल्या गेल्या आहेत जसे राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA), एकच मुलगी असलेल्या कुटुंबातील मुलींकरिता उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण घेण्याकरिता इंदिरा गांधी शिष्यवृत्ती योजना, महाविद्यालयामध्ये मुलींच्या वसतिगृहाची सोय, महाविद्यालया व विद्यापीठांमधून स्त्री अभ्यास केंद्रांची निर्मिती, स्त्रियाकरिता उच्च शिक्षणातील संशोधनासाठी शिष्यवृत्ती (Post-Doctoral Fellowship), अल्पसंख्याक विद्यार्थिनींसाठी योजना, अनुसूचित जाती-जमाती तसेच अपंग विद्यार्थ्यांसाठीच्या योजना इत्यादी. या योजना बाराव्या आयोगातील शिक्षणासंदर्भात विस्तार, समानता व गुणवत्ता वृद्धी (Expansion, Equality and Excellence) या उद्दिष्टांशी अनुरूप आहे.

**संदर्भ :**


१. भावे, श्री. मा. (२००९), उच्च शिक्षणाची वाटचाल आणि आव्हाने, सामाजिक परिवर्तन : चिकित्सा आणि भवितव्य, संपा. जावडेकर शरद व अन्य, सुगावा प्रकाशन, पुणे

२. जाधव, निर्मला (२००९) शिक्षण : समान संधी व लिंगभाव संवेदनक्षम अभ्यासक्रम, स्त्रियांचे सामाजिक सक्षमीकरण. संपा. देहाडराय स्वाती, तांबे अनघा, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे

३. सगुणा, जुलै-ऑगस्ट २०१३

४. Bondre, Kalyani (2013) Gender Inequality in Higher Education in India : The Sustainability Paradox

५. Chanana, K. (1988) 'Social Change or Social Reform : The Education of Women in Pre independence India. In Socialization, Education and Women : Explorations in Gender Identity, Edited by K. Chanana (2000)

६. Dewan, Anjali (2011) Globalization, Higher Education and Gender : An Appraisal of the Process of Reaching Out to Indian Women, in Sarkar Sumita, Srivastava Manjari (Ed.) Globalization and Gender. Ravat Publication, New Delhi

७. Nath, Shanjendu (2014) Higher Education and Women Participation in India, Journal of Business management and Social Science Research, Vol. 3, No. 2 February


* * *

# उच्च शिक्षणात महिलांचे वाढते प्रमाण

डॉ. नलिनी बोरकर

**प्रस्तावना :**

आज प्रत्येकच क्षेत्रात महिला भरारी घेत आहेत. शिक्षण क्षेत्रसुध्दा त्याला अपवाद नाही. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मुलींना मोफत मिळावे अशी तरतूद शासनाने केलेली आहे. मात्र उच्च शिक्षण घेण्यासाठी महिलांना संघर्ष करावा लागतो. स्त्री म्हणून जन्माला आल्यामुळे आणि भारतीय समाजातील पुरूषी मानसिकतेचा फटका स्त्रियांच्या उच्च शिक्षणाच्या प्रतवारीला बसतो. आधुनिक काळात उच्च शिक्षण महागडे झाले आहे. मुलींना डॉक्टर, इंजिनिअर, मॅनेजमेंट इत्यादी व्यावसायिक शिक्षण घ्यावयाचे असेल तर पालकांची आर्थिक परिस्थिती सुदृढ हवी असे समीकरणच बनले आहे. तरीही सर्व आघाड्यांवर मुलींची आगेकुच सुरू आहे. उच्च शिक्षणासाठी लागणाऱ्या पात्रता परीक्षेचे निकाल पाहिले तर मुलींनी त्यात मुलांच्या तुलनेत अधिक यश संपादन केल्याचे दिसते. प्रस्तुत संशोधन निबंधात हेच शोधण्याचा प्रयत्न केला आहे की आज उच्च शिक्षणात मुलींची टक्केवारी किती आहे? उच्च शिक्षणातील कोणकोणत्या शाखेत मुलींचे प्रमाण काय आहे? उच्च शिक्षणात मुली कला, वाणिज्य या सारख्या सामान्य शाखा निवडतात की मेडिकल, इंजिनिअरिंग या सारख्या व्यावसायिक शाखा निवडतात? इत्यादींचा शोध घेण्याचा हा प्रयत्न आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोत म्हणून मानव संसाधन विकास मंत्रालयाने वर्ष २०१४-१५ चा प्रकाशित केलेला उच्च शिक्षणाच्या संदर्भातील वार्षिक अहवाल संदर्भ म्हणून विचारात घेतला आहे.

स्वतंत्रताप्राप्तीनंतर ते आतापर्यंत उच्च शिक्षणात महिलांची टक्केवारी सातत्याने वाढते आहे. भारताला स्वातंत्र मिळाले तेंव्हा उच्च शिक्षणात महिलांची हिस्सेदारी केवळ १० टक्क्यांपेक्षाही कमी होती. आज वर्ष २०१४-२०१५ मध्ये ही हिस्सेदारी ४६.९३ टक्क्यांनी वाढली आहे. मागच्या २ दशकांमध्ये विकासाचा दर विशेषरूपाने तीव्र राहिला आहे. खालील सारणी क्र. १ मधील आकड्यांवरून हे स्पष्ट होते की, प्रति १०० पुरुषांच्या तुलनेत उच्च शिक्षणात नोंदणी करणाऱ्या महिलांच्या संख्येमध्ये वर्ष १९५०-५१ च्या तुलनेत वर्ष २०१४-१५ मध्ये ०५ पटीनी अधिक वाढ झाली आहे.

सारणी क्र. १

**प्रति १०० पुरुष विद्यार्थ्यांमध्ये महिला विद्यार्थ्यांची संख्या**

| वर्ष | उच्च शिक्षणात एकूण महिलांचे नामांकन ( प्रति हजार ) | उच्च शिक्षणात प्रति १०० पुरूषांच्या मागे महिलांची संख्या |
|---|---|---|
| १९५० - ५१ | ४० | १४ |
| २०१४ - १५ | १२४७६ | ८८ |

**उच्च शिक्षणात राज्यनिहाय व शाखानिहाय महिलांचे प्रमाण:-**

मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या अहवालानुसार वर्ष २०१४-१५ मध्ये उच्च शिक्षणात महिलांची टक्केवारी राज्यनिहाय पाहिली असता असे निदर्शनास येते की, लक्षद्वीप राज्यात उच्च शिक्षणात महिलांचे प्रमाण

समाजशास्त्र विभाग, कला, वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेटोल पंप जवाहरनगर, भंडारा

सर्वात जास्त म्हणजे ७१.१७ टक्के आहे. त्यानंतर गोवा राज्यात ६०.०६ टक्के उच्च शिक्षणात महिलांचे प्रमाण आहे. भारतात अशी एकूण २३ राज्य आहेत ज्यामध्ये राष्ट्रीय सरासरी ४६.९३ टक्क्यांपेक्षा जास्त महिलांचे प्रमाण आहे. इतर राज्यांत उच्च शिक्षणात महिलांची नोंदणी राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. ज्यामध्ये राजस्थान मध्ये सर्वात कमी म्हणजे ३९.० टक्के महिलांची उच्च शिक्षणात नोंदणी झालेली आहे. उच्च शिक्षणातील महिलांच्या नामांकनासाठी उत्तर प्रदेश सर्वात आघाडीवर आहे. उत्तर प्रदेशात वर्ष २०१४-१५ मध्ये २१.७३ लाख विद्यार्थिनींनी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. त्या खालोखाल महाराष्ट्रात १३.०१ लाख विद्यार्थिनींनी व तामिलनाडूमध्ये १२.३२ लाख विद्यार्थिनींनी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेला होता.

**महिलांचा उच्च शिक्षणात शाखानिहाय प्रवेशः-**

वर्ष २०१४-१५ मध्ये उच्च शिक्षणात महिलांचा शाखानिहाय प्रवश खालील प्रमाणे होता.

सारणी क्र. २

**वर्ष २०१४-१५ मध्ये शाखानिहाय उच्च शिक्षणात महिलांची नोंदणी**

| अ. क्र. | शाखा | उच्च शिक्षणात महिलांचे नामांकन | उच्च शिक्षणातील एकूण नामांकनामध्ये महिलांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | कला शाखा | ५२०२६१२ | ४१.७० |
| २. | विज्ञान | २३२०८९४ | १८.६० |
| ३. | वाणिज्य व प्रबंधन | १९६२३८४ | १५.७३ |
| ४. | शिक्षण शाखा | ७६५०२८ | ६.१३ |
| ५. | अभियांत्रिकी व प्रोद्योगिकी | १२३२००६ | ९.८८ |
| ६. | आयुर्विज्ञान | ६३७७०१ | ५.११ |
| ७. | कृषी | ५५४१४ | ०.४४ |
| ८. | पशु-चिकित्साविज्ञान | ९९८० | ०.०८ |
| ९. | विधि शाखा | १४८०२४ | १.१९ |
| १०. | इतर | १४१६२६ | १.१४ |
| | एकूण | १२४७५६६९ | १००.०० |

उपरोक्त सारणीमध्ये दर्शविलेल्या कला शाखेत मानव्यविद्या, सामाजिक शास्त्र व भाषा विषय समाविष्ट आहेत. विज्ञान शाखेत गृहविज्ञान, संगणक विज्ञान व संगणक पदविका इत्यादी समाविष्ट आहेत. शिक्षण शाखेत शिक्षण शास्त्र, शिक्षण आचार्य, विद्या वरिधि व वाचस्पती समाविष्ट आहेत. अभियांत्रिकी आणि प्रौद्योगिकी शाखेत कृषि अभियांत्रिकी आणि प्रौद्योगिकी, डेयरी प्रौद्योगिकी व वास्तुकला इत्यादी समाविष्ट आहेत. आयुर्विज्ञान शाखेत आयुर्वेद, दंत चिकित्सा, होम्योपॅथी, परिचर्या, भेषजी, जन स्वास्थ्य, सामाजिक निवारक औषधी, युनानी, तिबिया, भौतिक चिकित्सा, प्राकृतिक चिकित्सा इत्यादी समाविष्ट आहेत. कृषि शाखेत - बागवानी, रेशम उत्पादन व वनिकी इत्यादी समाविष्ट आहेत. पशु-चिकित्साविज्ञान शाखेत - मत्स्य पालन, डेयरी विज्ञान, पशुविज्ञान समाविष्ट आहेत. तर अन्य शाखेत - ग्रंथालय व माहितीशास्त्र, संगीत, प्रदर्शन, दृश्यकला, पत्रकारिता व जनसंचार, शारीरिक शिक्षण, समाजकार्य

इत्यादी समाविष्ट आहेत.

उपरोक्त सारणी असे दर्शविते की, कला शाखेत महिलांची नोंदणी सर्वाधिक म्हणजे ४१.७० टक्के आहे. तर विज्ञान शाखेत १८.६० टक्के महिलांचे प्रमाण आढळते. वाणिज्य व प्रबंधन शाखेत १५.७३ टक्के आणि शिक्षण शाखेत ६.१३ टक्के एवढे प्रमाण आढळते. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शाखेत ९.८८ तर आयुर्विज्ञान शाखेत ५.११ टक्के आढळते. कृषी शाखेत फक्त ०.४४ टक्के तर पशुचिकित्सा विज्ञान शाखेत हे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे ०.०८ टक्के इतकेच आहे. विधी शाखेत १.१९ टक्के आणि इतर शाखा जसे- ग्रंथालय व माहितीशास्त्र, संगीत, दृश्य कला, पत्रकारिता, जनसंवाद, शारीरिक शिक्षण, समाजकार्य इत्यादीमध्ये महिलांचे प्रमाण फक्त १.१४ टक्के इतकेच आहे.

थोडक्यात, उच्च शिक्षणातील कला शाखेत महिलांची नोंदणी उच्च शिक्षणातील एकूण नोंदणीच्या ४१.७० टक्के इतकी आहे. त्यानंतर विज्ञान शाखेत १८.६० टक्के, वाणिज्य व प्रबन्धन शाखेत १५.७३ टक्के आहे. याचाच अर्थ उच्च शिक्षणातील अव्यावसायिक शाखेत महिलांची नोंदणी सर्वात जास्त म्हणजे ७६.०३ टक्के इतकी आहे. तर उच्च शिक्षणाच्या व्यावसायिक शाखेत महिला नामांकन फक्त २३.९७ टक्के इतके आहे.

**महिला महाविद्यालयांची संख्या:-**

खाली दर्शविलेल्या सारणी क्र. ३ मध्ये असे स्पष्टपणे दिसून येते की, ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटपर्यंत देशात ४२६६ महिला महाविद्यालय होती. त्या तुलनेत १२ व्या पंचवार्षिक योजनेत २४० महाविद्यालयांची नव्याने स्थापना करण्यात आली. ३१ मार्च २०१४ च्या स्थितीमध्ये देशात महिलांसाठी ४५०६ महिला महाविद्यालये अस्तित्वात आहेत.

सारणी क्र. ३

**वर्ष १९९७-९८ पासून ते २०१४-१५**

**पर्यंत देशातील महिला महाविद्यालयांची संख्या**

| क्र. | वर्ष | महिला महाविद्यालये |
|---|---|---|
| १. | १९९७-९८ | १२६० |
| २. | १९९८-९९ | १३५९ |
| ३. | १९९९-२००० | १५०३ |
| ४. | २०००-२००१ | १५७८ |
| ५. | २००१-२००२ | १७५६ |
| ६. | २००२-२००३ | १८२४ |
| ७. | २००३-२००४ | १८७१ |
| ८. | २००४-२००५ | १९७७ |
| ९. | २००५-२००६ | २०७१ |
| १०. | २००६-२००७ | २२०८ |
| ११. | २००७-२००८ | २३६० |
| १२. | २००८-२००९ | २५६५ |
| १३. | २००९-२०१० | ३६१२ |
| १४. | २०१०-२०११ | ३९८२ |
| १५. | २०११-२०१२ | ४२६६ |
| १६. | २०१२-२०१३ | ४३८६ |
| १७. | २०१३-२०१४ | ४५०६ |
| १८. | २०१४-२०१५ | उपलब्ध नाही |

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, मागील १७ वर्षांच्या काळात देशातील महिला महाविद्यालयांची संख्या सातत्याने वाढत आहे. तथापि लोकसंख्येतील महिलांचे प्रमाण लक्षात घेतले तर त्या तुलनेत आज असलेल्या महिला महाविद्यालयांची संख्या कमीच आहे. परंतू थोड्या प्रमाणात का होईना देशातील महिला महाविद्यालयांची संख्या वाढत आहे ही समाधानाची बाब आहे.

**निष्कर्ष:-**

प्रस्तुत शोध निबंधाचे काही निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. स्वतंत्रताप्राप्ती नंतर देशातील महिलांचे उच्च शिक्षणात प्रमाण वाढत आहे. आज हे प्रमाण ४६.९३ टक्के इतके आहे.

२. १०० पुरुषांच्या मागे उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या महिलांचे शेकडा प्रमाण ८८ इतके आहे.

३. लक्षद्वीपमध्ये उच्च शिक्षणातील महिलांचे प्रमाण देशात सर्वाधिक आहे तर राजस्थान या राज्यात उच्च शिक्षणातील महिलांचे प्रमाण देशात सर्वात कमी आहे.

४. उच्च शिक्षणातील मुलींच्या एकूण प्रवेशाच्या आधारे वर्ष २०१४-१५ मध्ये उत्तर प्रदेशात सर्वाधिक मुलींनी प्रवेश घेतला आहे.

५. उच्च शिक्षणात प्रवेश घेणाऱ्या महिलांचे प्रमाण कला शाखेत सर्वाधिक तर पशुचिकित्सा विज्ञान शाखेत सर्वात कमी आहे.

६. देशातील महिलांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी महिला महाविद्यालयांची संख्या सातत्याने वाढत आहे. आज देशात एकूण ४५०६ महिला महाविद्यालये आहेत.

७. भारतात महिलांच्या एकूण लोकसंख्येत तरुणींची संख्या अधिक आहे. त्यांच्या क्षमतांचा पुरेपूर वापर करून घेण्यासाठी त्यांना उच्च शिक्षण देणे गरजेचे आहे. उच्च दर्जाच्या शिक्षणामुळे खरा ज्ञाननिष्ठ समाज निर्माण होईल व परिणामी जागतिक आर्थिक स्तरावर भारताची स्पर्धात्मकता वाढीला लागेल.

८. उच्च शिक्षणातील महिलांच्या वाढत्या प्रमाणामुळे समाजाची प्रगती योग्य दिशेने होत आहे. मुलगा-मुलगी हा भेदभाव कमी होत आहे. तसेच महिलांच्या उच्च शिक्षणामुळेच त्या आज पुरूषांच्या बरोबरीने मोठ्या पदांवर काम करीत आहेत.

संदर्भ:-

१. विद्यापीठ अनुदान आयोगाचा वार्षिक अहवाल २०१४-१५, प्रकाशक, सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, बहादुर शाह ज़फ़र मार्ग, नई दिल्ली-११० ००२

* * *

# उच्च शिक्षणात दलित महिलांची भूमिका

डॉ. ए. आर. वागडव

**प्रस्तावना :**

भारतात दलितांची संख्या जवळपास २५० मिलियन इतकी असून मागील काही वर्षात त्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत काहीशी सुधारणा झालेली आहे. मात्र तरीही आज ७५ टक्के दलित दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत आहेत. दलित महिलांची स्थिती दयनीय असुन त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. जागतिक लोकसंख्येशी तुलना करता दलित स्त्रियांची संख्या २ टक्के आहे. तर भारतातील एकूण स्त्रियांच्या लोकसंख्येच्या १६.३ टक्के आहे.

भारतातील समाजसुधारकांचे प्रयत्न व स्वातंत्र्योत्तर काळातील आपल्यावरील अनेक बंधने तिने झुगारुन दिली आहेत. दलित स्त्री इतर हिंदू स्त्रियांच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहे. आपल्या न्याय व समतेच्या अधिकारासंदर्भात आजची दलित स्त्री अधिक जागृत व स्वतंत्र असून स्वातंत्र्यानंतर त्यांच्या स्थितीत सुधारणा झाली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात केवळ दलित महिलाच नव्हे तर इतर सामान्य महिलांनाही शिक्षणाचा अधिकार नव्हता. केवळ 'चूल आणि मूल' एवढ्यापुरतेच तिचे कार्यक्षेत्र मर्यादित करण्यात आले होते. त्यामुळेच स्वातंत्र्योत्तर काळातील महिला साक्षरता दर १० टक्क्यांपेक्षाही कमी म्हणजेच ८.८६ टक्के इतकाच होता. तो २००१ पर्यंत ५४.१६ इतका आहे. तरीही भारतात ३० करोडपेक्षा अधिक व्यक्ती निरक्षर असून त्यात महिलांचे प्रमाण अधिक आहे. शासनाद्वारे महिलांमधील शिक्षणांचे प्रमाण वाढविण्याचे दृष्टीने प्रयत्न होत आहेत.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात भारतीय स्त्री त्याचबरोबर दलित महिलाही शैक्षणिक दृष्ट्या मागस होत्या. त्यांच्यात निरक्षरतेचे प्रमाण अधिक होते. आजही ४२ टक्के मुलींना प्राथमिक स्तरावरच शिक्षण सोडावे लागते. तर शाळेत जाणाऱ्या वयातील ३ करोड मुली शिक्षणापासून वंचित आहेत. त्यात दलित महिलांचीही शैक्षणिक स्थिती दयनीय असून त्यासाठी पुढील काही कारणे जबाबदार आहेत.

१. लोकांच्या पारंपरिक मनोवृत्तीत अजूनही परितर्वन न झाल्यामुळे ते मुलींना शाळेत पाठवीत नाहीत.

२. घरातील जबाबदाऱ्यांच्या भार मुलींवर अधिक असतो.

३. खेड्यांत शाळा, महाविद्यालये, दळणवळणाची साधने यासारख्या भौतिक सोयी सुविधांचा अभाव आहे.

४. अधिक शिक्षण घेतलेल्या मुलींना वर पक्षाला अधिक हुंडा द्यावा लागतो.

५. संरक्षणाच्या नावाखाली महिलांना शिक्षणापासून वंचित करण्यात येते.

६. आई-वडील कामावर गेल्यानंतर लहान बहीण-भावाला सांभाळण्याची जबाबदारी मुलींवर असते.

७. कुटुंबाच्या अर्थार्जनात मदत करण्यासाठी मुली शाळेत न जाता आपल्या आई-वडिलांबरोबर अनेक असंघटित क्षेत्रात कामावर जातात. त्यामुळेही त्यांना शिक्षण घेता येत नाही.

८. बाल वयातच विवाह झाल्यामुळे त्यांना अर्धवट शिक्षण सोडावे लागते.

९. विवाहानंतर स्त्रियांच्या शिक्षणावर बंधने लादली जातात.

१०. शिक्षणाच्या क्षेत्रात लिंगभाव पाळला जातो.

११. काही भागांत आजही उच्च जातींतील शिक्षकांकडून दलित विद्यार्थ्यांना भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते.

१२. शिवाय निम्न शैक्षणिक स्तर असल्यामुळे आपल्यासाठी असणाऱ्या अनेक कल्याणकारी योजनांची

समाजशास्त्र विभाग प्रमुख, विवेकानंद कला, स.द. वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

माहिती / कल्पना महिलांना नसते.

यासारख्या प्रमुख कारणांमुळे दलित महिलांचा शैक्षणिक स्तर निम्न राहिला आहे. आज दलित साक्षरता दर ३१.४८ टक्के असुन दलित मुलींचा साक्षरता दर १०.९३ टक्के इतका आहे. सामान्य महिलांच्या साक्षरता दराशी तुलना करता तो अतिशय निम्न आहे. शासन दलितांच्या शैक्षणिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी अनेक योजना राबवीत आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्चाची तरतुदही केली जाते. मात्र अशा कल्याणयकारी योजनांचा प्रसार चांगल्या प्रकारे न झाल्यामुळे चांगल्या योजनांची दखलही घेतली जात नाही. स्थानिक पातळीवर अशा योजनांची माहिती पोहोचविणे आवश्यक आहे.

आज दलित विद्यार्थ्यांसाठी शासनाने स्पर्धात्मक परिक्षांचे मार्गदर्शन करणारे केंद्र सुरू केले. त्याचा फायदा बऱ्याच दलित विद्यार्थिनींना होतो आहे. त्याचप्रमाणे अनेक पूर्व परिक्षांसाठी मार्गदर्शन केंद्रेही सुरू करण्यात आले आहेत. ज्यामुळे स्त्रियांना विविध व्यावसायिक क्षेत्रे, वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्र, रेल्वे भरती प्रक्रिया, बँक भरती प्रक्रिया यासाठी हे वर्ग उपयुक्त ठरत आहेत.

**उच्च शिक्षण व दलित महिला :**

विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत एस.सी. आणि एस.टी. विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयीन स्तरावर अनुक्रमे २५ टक्क व ७.५ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. त्याचा मोठ्या प्रमाणात दलित महिलांना फायदा होताना दिसत आहे. शिवाय नोकरी व विविध अभ्यास विषयांना प्रवेश घेते वेळी ५ टक्के गुणांची सवलतही त्यांना दिलेली आहे. उच्च शिक्षणात आर्थिक साहाय्य म्हणून अनेक शिष्यवृत्त्या त्यांना देण्यात येतात. शिवाय संशोधन क्षेत्रातील एम. फिल. व पीएच.डी. च्या एस.सी. व एस.टी. विद्यार्थ्यांना 'राजीव गांधी शिष्यवृत्ती' ही देण्यात येते. त्याचप्रमाणे विद्यापीठ स्तरावर अनेक कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठी एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांसाठी एक विशेष विभाग सुरू करण्यात आला आहे.

भारत सरकारच्या सर्वेक्षणानुसार दलित स्त्रियांचा साक्षरता दर ३५.९१ टक्के इतका असून माध्यमिक स्तरापासुनच या स्त्रियांमध्ये गळतीचे प्रमाण अधिक आहे. आज केवळ २ ते ५ टक्के इतक्याच स्त्रिया विद्यापीठीय शिक्षणापर्यंत पोहोचतात आणि त्याच स्त्रिया (विशेषतः धर्मांतरित बौद्ध व ख्रिश्चन स्त्रिया) आपल्या मुलांच्या शिक्षणाविषयी जागृत असल्याचे दिसतात. त्या व्यतिरिक्त हिंदू दलित स्त्रियांमध्ये शिक्षणाविषयी फारशी जागृती दिसत नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनीही मान्य केले आहे की, उच्च शिक्षणात जरी दलितांची प्रगती झाली असली तरी अनेक सोयी-सुविधा व विविध सवलती असूनही आय.आय.टी. व आय.आय.एम. यासारख्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये त्यांचे प्रमाण नगण्य आहे. उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या दलित विद्यार्थ्यांचे प्रमाण केवळ १० टक्के असून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांमध्ये ते प्रमाण केवळ ५ टक्के आहे.

शिक्षण हे महिला सक्षमीकरणाचे महत्त्वपूर्ण साधन मानले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीमधील आत्मसम्मान जागृत होऊन त्यास प्रगतीची संधी प्रापत होते. त्यामुळे शिक्षणाला महिला सक्षमीकरणात महत्त्वाचे स्थान आहे. त्या दृष्टीने त्यांना शैक्षणिक क्षेत्रात विशेष सवलती प्रदान करुन त्यांना विकासाची संधी प्रदान करण्यात आलेल्या आहेत. मात्र प्राथमिक, माध्यमिक स्तरावरील शिक्षणात जरी दलित स्त्रियांचे प्रमाण वाएल असले तरी उच्च शिक्षणात मात्र ते कमीच आहे.

**निष्कर्ष :**

१. दलित समाज आर्थिक दृष्टीने मागासलेला असून अजूनही ७५ टक्के दलित दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत.

२. स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजसुधारकांचे प्रयत्न व स्वातंत्र्योत्तर काळातील घटनात्मक तरतुदी यामुळे दलित स्त्रिया आपल्या हक्काविषयी जागृत झाल्या असुन त्यांनी अनेक सामाजिक बंधने झुगारुन दिली आहेत.

३. दलित स्त्रिया इतर महिलांच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या अधिक स्वतंत्र आहेत. कुटुंबाच्या अर्थार्जनातही त्या सहभाग नोंदवत आहेत.

४. आजही स्त्रिया शैक्षणिकदृष्ट्या पुरुषांच्या तुलनेत मागास आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार ४५.८४ टक्के स्त्रियां निरक्षर असून त्यात दलित महिलांचे प्रमाण अधिक आहे.

५. अनेक सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक कारणांमुळे दलित महिला साक्षरता दर कमी राहिला असून आजही ६० टक्के पेक्षा अधिक दलित स्त्रिया निरक्षर आहेत.

६. दलितांसाठी असणाऱ्या अनेक शासकीय योजनांचा योग्य प्रकारे प्रचार न झाल्यामळे अनेक योजना दलितांपर्यंत गेलेल्या नाहीत.

७. दलितांना प्रशासकीय सेवेत प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असून विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केंद्र शासनाने सुरू केले आहेत. मात्र त्याचा लाभ सर्वच दलित महिलांना घेता येत नाही.

८. उच्च शिक्षणातही दलित महिलांचे प्रमाण पाहिजे त्या प्रमाणात नाही. शासन त्यासाठी प्रयत्नशील असुन ते प्रमाण वाढविण्यासाठी उच्च शिक्षणात आरक्षण, विविध शिष्यवृत्त्या व प्रवेशासाठी ५ टक्के गुणांची सवलतही देण्यात येत आहे.

९. दलित स्त्रियांमध्ये शिक्षणातील गळतीचे प्रमाण अधिक असून केवळ २ ते ५ टक्के दलित स्त्रियाच विद्यापीठीय शिक्षणापर्यंत पोहोचतात.

१०. आय.आय.टी. व आय.आय.एम. सारख्या उच्चशिक्षण संस्थांमध्येही दलित महिलांचे प्रमाण नगण्य आहे.

**शिफारशी :**

१. दलित स्त्रियांना विविध सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक कारणामुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागते. त्यामुळे त्यांच्यात शिक्षणाविषयी जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

२. आर्थिक परिस्थिती दुर्बल असल्यामुळे अनेक दलित विद्यार्थीनींना प्राथमिक व माध्यमिक स्तरावरच शिक्षण सोडावे लागते. तर काही शाळेत न जाता कुटुंबाच्या अर्थाजनात हातभार लावतात. त्यामुळे माध्यमिक स्तरावरही दलित विद्यार्थिनीसाठी 'कमवा आणि शिका' यासारखी योजना सुरू करावी.

३. शासकीय योजनांच्या चांगल्या प्रकारच्या अभावी अनेक शासकीय योजनांची माहिती दलितांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे विविध शासकीय योजनांच्या प्रचारार्थ दलित वस्त्यांमध्ये कॅम्प व शिबिर घेतले जावे.

**संदर्भ :**


१. भारतातील महिला विकासाची वाटचाल, ज. श. आपटे, पुष्पा रोडे

२. स्त्री सत्तेची पहाट, विजय चोरमारे

३. भारतीय महिलाएँ शोषण, उत्पीडन एवं अधिकार, कमलेश कुमार गुप्ता

४. महिला सशक्तीकरण, कमलेश कुमार गुप्ता

५. Women in India (An Exhaustive Study) Edited by Arunima Bharuah

६. http://www.ambedkar.org/worldwide-dalits/ dalit_women_in_india.htm

७. http://webnews, my webdunia.com


* * *

# भारतातील उच्च शिक्षणातील अध्यापनाचे स्वरूप

प्रा. जयेंद्र पेंडसे

**प्रस्तावना:**

महाविद्यालये आणि पदव्युत्तर स्तरावरील उच्च शिक्षणातील अध्यापनाचे स्वरूप कसे असावे, कोणती उद्दिष्टे साध्य केली जावीत, त्यात प्राधान्याने कोणत्या अध्यापन शैलीचा व पध्दतींचा समावेश असावा, त्यात प्राध्यापकांची भूमिका काय असावी, त्यातून काय साध्य व्हावे, विद्यार्थ्यांमध्ये कोणती गुणवत्ता व कोणत्या क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत, या बाबतीत उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात भरपूर चर्चा होणे अत्यंत गरजेचे झालेले आहे. मात्र या विषयावर चर्चा होण्याऐवजी बहुतेकदा ही सारी चर्चा उच्च शिक्षणसंस्थातील संशोधन प्रकल्प संशोधनपर लेखन आणि शासनाचे उच्च शिक्षणासंबंधीचे धोरण, निधीची उपलब्धता किंवा किती निधी कोणत्या गोष्टींसाठी खर्च करावा या मुद्यांभोवती केंद्रित झालेले दिसते.

**उच्च शिक्षणातील अध्यापनाच्या विविध पध्दती:**

उच्च दर्जाचे संशोधक घडविण्याची प्रक्रिया उच्च शिक्षणातून होण्यासाठी विषयातील मूलभूत संकल्पना त्या संकल्पना संबंधित जुने व नवे सिध्दांत, त्यातील वैचारिक साधर्म्य आणि वैधर्म्य, त्यांची सामर्थ्य स्थळे व मर्यादा, त्या संकल्पना व सिध्दांतांचा प्रत्यक्ष जीवन व्यवहाराशी असलेला संबंध यासंबंधीचे विद्यार्थ्याला उत्तम आकलन  असणे आवश्यक आहे. आजच्या संदर्भात त्या संकल्पना व सिध्दांत सतत तपासून बघण्याची चिकित्सक दृष्टीही विद्यार्थ्यात विकसित व्हायला हवी. याशिवाय ज्या माहितीच्या आधारे सिध्दांताचे आकलन व अध्ययन करायचे आहे. त्या माहितीचे व्यवस्थितपणे संकलन, व्यवस्थापन व विश्लेषण करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणे गरजेचे आहे.

माहितीतील मुद्यांचा परस्पर संबंध शोधणे, अन्य विषयातील संबंधित माहितीचा उपयोग करणे ही क्षमताही असायला हवी. सोबतच घटनांचे विश्लेषण करण्यासाठी, सर्व संबंधित मुद्यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी आवश्यक ती चिकाटी, सातत्य, उत्सुकता, तटस्थता, सहिष्णुता व ज्ञानग्रहण करण्याची तीव्र इच्छाही गरजेची आहे. या सर्व क्षमता संशोधकांमध्ये असणे उत्तम दर्जाच्या संशोधनासाठी आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये या क्षमता घडविणे हे उच्च शिक्षणातील अध्यापनाचे मुख्य उद्दिष्ट असणे गरजेचे आहे. हे कार्य उत्तमपणे घडले तरच संशोधनाचे कार्य करण्याची क्षमता असलेले विद्यार्थी मोठ्या संख्येत उपलब्ध होतील असे विद्यार्थी घडविण्यासाठी अध्यापनाचा दर्जाही तेवढाच दर्जेदार असणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर आजच्या उच्च शिक्षणातील स्थितीचा विचार केला तर अत्यंत चिंताजनक परिस्थिती असल्याचे दिसून येते. काही दर्जेदार केंद्रीय विद्यापीठे व स्वायत्त शिक्षणसंस्था व काही महाविद्यालये वगळता उच्च शिक्षण संस्थातील स्थिती गंभीर आहे असे म्हणावे लागेल.

* नियमितपणे दर्जेदार अध्यापन होणे ही प्रथम गरज मानली तर दिसणारे चित्र भयावह आहे. भरपूर पगार मिळत असतानाही विविध कारणांनी वर्ग न घेणाऱ्या प्राध्यापकांची संख्या लक्षणीय आहे. जास्त पगाराची

सहायक प्राध्यापक आणि समाजशास्त्र विभागप्रमुख, सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर मो.क्र.९७६७३७४१३०

अपेक्षा करणारे आपल्या वर्गात शिकवणे सोडून बाहेरगावी भरपूर मानधन घेत भाषणबाजी करीत फिरणारे अनेक प्राध्यापक आहेत. नियमितपणे वर्ग घेणे हे विद्यार्थ्यांचे विषयाचे आकलन उत्तम होण्यासाठी, विषयातील रुची वाढविण्यासाठी जसे गरजेचे आहे तसेच अध्ययन व अध्यापनातील सातत्यासाठीही आवश्यक आहे. असे सातत्य असणे ही उत्तम अध्ययनाची प्रथम पायरी आहे. वर्ग न घेण्याने किंवा क्वचित कधी तरी घेण्याने आणि मुख्यत्वे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी उपलब्ध न होण्याने अध्ययन व अध्यापनाची संपूर्ण प्रक्रियाच खंडित होते. याचे दूरगामी परिणाम होतात. विद्यार्थ्यांना नियमितपणे वर्गात उपस्थित राहण्याची सवय लागत नाही. एखाद्या कठीण विषयाला व्यवस्थित समजण्यासाठी आवश्यक असलेले सातत्य न राहिल्याने विषयाचे नीट आकलन होत नाही. सातत्याने अध्ययन ही जर संशोधनातील सर्वात आवश्यक बाब मानली तर सातत्याने मार्गदर्शन सुध्दा तेवढीच आवश्यक गोष्ट ठरते. आजच्या उच्च शिक्षणात या सर्वात महत्त्वाच्या बाबींकडे सर्वात जास्त दुर्लक्ष होतांना दिसते. पदवी स्तरावर काही प्रमाणात आणि पदव्युत्तर स्तरावर मोठ्या प्रमाणात आढळणारे हे वास्तव आहे.

* शालेय आणि उच्च माध्यमिक स्तरावर अध्यापन करण्यासाठी अध्यापनशास्त्राचा अभ्यास करणे, अध्यापनाचे शास्त्र समजून घेणे ही मुख्य आवश्यकता असते. पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर मात्र अध्यापनाचे शास्त्र शिकले असण्याची आवश्यकताच नसते. अध्यापन म्हणजे काय, ते कसे करायचे, ते करताना कोणती पथ्ये पाळायची? कोणती अध्यापन पध्दत केव्हा उपयोगात आणायची? व्याख्यान द्यायचे म्हणजे काय करायचे, व्याख्यानाचा आशय कसा मांडायचा, उदाहरणे कशी द्यायची? विद्यार्थ्यांशी संवाद कसा साधायचा? विद्यार्थ्यांना ज्ञान ग्रहण करण्यासाठी प्रवृत्त कसे करायचे? प्रश्न कसे विचारायचे, विषयाची मांडणी कशी करायची, तंत्रज्ञानाचा अध्यापनात प्रभावीपणे उपयोग कसा आणि का करायचा याचे एक समृध्द असे शास्त्र गेल्या शतकात विकसित झालेले आहे. शैक्षणिक मानसशास्त्र नावाची एक स्वतंत्र ज्ञानशाखा आता विकसित झालेली आहे. अध्यापनासंबंधित उपरोक्त सर्व बाबींची तोंडओळख नसणारे असंख्य प्राध्यापक आज अध्यापन करीत आहेत. त्यातल्या अनेकांना अध्यापन कसे करायचे याची प्राथमिक जाणही नसते. अध्यापनाच्या अत्यंत समृध्द अशा विविध शैलींची, पध्दतींची कोणतीही माहिती नसल्याने बहुतांश प्राध्यापक केवळ व्याख्यान शैलीचाच आधार घेताना दिसतात. व्याख्यान कसे द्यावे याचाही अनेकांना परिचय नसतो. त्यामुळे असंबंध्द मुद्दे, अनावश्यक माहिती, जुनी उदाहरणे, अत्यंत कंटाळवाण्या पध्दतीने सांगणे म्हणजेच व्याख्यान असे अनेकदा व्याख्यानाचे स्वरूप होतांना दिसते.

* जगातल्या नामवंत विद्यापीठातील अध्यापनात व्याख्यान पध्दतऐवजी संवादावर आधारित अध्यापन पध्दतीवर सर्वात जास्त भर दिला जातो. विद्यार्थ्यांना विचार करायला प्रवृत्त करणारी विद्यार्थ्यांची गटचर्चा, प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचे स्वयंअध्ययन करुन विषयावर केलेले सादरीकरण, संपूर्ण वर्गाचा व सर्व विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग असेल असे परिसंवाद, समूह चर्चा, नामवंतांबरोबरची चर्चा अशा पध्दतीने अध्यापन अध्यापन करण्यावर या विद्यापीठात भर देण्यात येतो. सर्वच विद्यार्थ्यांना अशा पध्दतीमुळे अध्ययन प्रक्रियेत सहभागी व्हावेच लागते. सर्वांना विचार, अभ्यास करावाच लागतो. अध्ययन प्रक्रियेत सक्रिय सहभागामुळे विषय समजणे, आपल्याला काय समजले नाही हे लक्षात येणे व चर्चेमुळे विषयाचे विविध पैलू लक्षात येणे सहज शक्य होते.

* जास्तीत जास्त ज्ञानेंद्रियांचा उपयोग केल्यास

जास्तीत जास्त ज्ञान प्राप्ती होते हा मानसशास्त्रातील सिध्दांत आहे. आपल्या प्रचलित अध्यापन पध्दतीत विद्यार्थ्यांच्या फक्त कानांचाच उपयोग करण्यावर भर असतो. ज्यावेळी विद्यार्थी चर्चेत सहभागी होतो त्यावेळी त्याला त्याची सर्व ज्ञानेंद्रिये कार्यरत ठेवावीच लागतात व या प्रक्रियेत ती सर्वात जास्त कार्यरत होतात. त्यामुळे विषयाचे उत्तम ज्ञान होते व ते दीर्घकाळ स्मरणात राहते. विद्यार्थी हा वयाने लहान असला तरीही त्याच्याही जवळ ज्ञान, अनुभव व विचार करण्याची क्षमता असतातच व त्यामुळेच त्याच्याशी संवाद साधल्यामुळे त्याच्या अनुभव विश्वाला, विचारांना, कल्पनांना व्यक्त होण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांचे हे अनुभव व ज्ञान प्राध्यापकाचे आकलनही समृध्द करायला उपयुक्त ठरतात. हा विचारही या अध्ययन पध्दतीत स्वीकारण्यात आलेला आहे. त्यामुळेच संवादावर भर देणारी अध्यापन पध्दती जगातील नामवंत विद्यापीठात अध्यापनाचे वैशिष्ट्य आहे.

* भारतात उच्चशिक्षण संस्थेत मात्र या पध्दतीचा अल्प उपयोग होतांना दिसतो. विद्यार्थ्यांशी वर्गात चर्चा करण्यावर भर देणारे प्राध्यापक कमी झाले आहे. याचे एक कारण म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्यात काही सुप्त क्षमता असतातच यावरच प्राध्यापकाचा विश्वास नसतो. याशिवाय प्राध्यापकाच्या व्यवसायात राहिल्याने आपल्या विद्वत्तेबद्दलचा गैरसमजही कारणीभूत असतो. आपण विद्वान असल्याने व इतर आपल्यापेक्षा सुमार क्षमतेचे आहेत असा ग्रह झाल्याने इतरांचे आणि त्यातही विद्यार्थ्यांचे काय ऐकायचे अशी एकूणच भूमिका असते. संवादात्मक पध्दतीचा स्वीकार न करण्याचे आणखी एक मुख्य कारण म्हणजे प्राध्यापकांमध्ये चर्चेसाठी आवश्यक अशी बौध्दिक क्षमता नसणे हे होय. चर्चेत कोणता मुद्दा केव्हा उपस्थित होईल याचा नेम नसतो व अशा ऐन वेळेवर उपस्थित झालेल्या मुद्यांचे उत्तर देण्यासाठी उत्तम स्मरणशक्ती विषयाचे उत्तम ज्ञान, प्रसंगावधान आणि जीवनाकडे बघण्याचा समृध्द दृष्टीकोन गरजेचा असतो. परिणामी स्वतंत्रपणे विचार करण्याची विद्यार्थ्यांमधील क्षमता विकसित होण्याऐवजी प्राध्यापकांनी दिलेल्या नोट्स घेऊन कारकून होण्याची क्षमता विकसित होत जाते ही आजची शोकांतिका आहे.

* अध्यापन करताना प्राध्यापकाची भूमिका तटस्थ विचारवंताची असली पाहिजे तरच तो अभ्यास विषय व्यवस्थितरीत्या शिकवू शकतो. विषयाचे विवेचन झाल्यावर संबंधित सर्व दृष्टिकोन विद्यार्थ्यांसमोर मांडल्यानंतरच मग आपले मत प्राध्यापकाने मांडले पाहिजे पण हे क्वचितच आढळते. याउलट प्राध्यापक हे आपल्या जातपात, धर्मसंप्रदाय व विचारसरणीच्या अहंकाराच्या संकुचित दृष्टिकोनातून विषयाचे प्रतिपादन करणे आणि विषयाची एकांगी प्रचारकी मांडणी करणे म्हणजेच अध्यापन असे समजतात. हा अध्यापनाचा प्रचारकी थाट वेळे प्रसंगी विद्यार्थ्यांच्या भावना भडकावण्यापर्यंत, त्यांच्या मनात इतर धर्म, जात, पंथ, राष्ट्र यातील समूहाबद्दल द्वेष निर्माण करण्यात परिणत होतो. विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाचा, दृष्टिकोनाचा, सर्व विचारधारांचा सहिष्णु, असंमजस भूमिकेतून विचार करण्याचीच सवय लावली जाते. असे अध्यापन अनेकदा अत्यंत प्रभावी ठरते.

* विद्यार्थ्यांची विचारशक्ती व चिकित्सक दृष्टिकोन विकसित करणे हे अध्यापनाचे एक प्रमुख उद्दिष्ट असते. त्याही दृष्टीने अध्यापन व्हायला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यास विचार करायला प्रोत्साहन मिळेल आणि ते स्वतंत्रपणे विचार करायला प्रवृत्त होतील असे वातावरण निर्माण व्हायला हवे. त्याची संपूर्ण जबाबदारी अध्यापकांवर असते. आपल्या विषयाचे अध्यापन करतांना विद्वानांमध्ये सुरू असलेल्या चर्चांचे विषय सार्वजनिक जीवनातील प्रचलित वादविषयक प्रगत विद्यापीठात सुरु असलेले संशोधन याचे संदर्भ देत नवनवीन विषयांबद्दल विचार करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे उच्च शिक्षणात

अपेक्षित असते.

* आजच्या अध्यापनाचे स्वरुप विचारशक्ती विकसित करण्याच्या दृष्टीने कितपत सक्षम आहे हे शोधले तर अत्यंत निराशाजनक चित्र दिसते. उच्च शिक्षणात पदवी मिळवूनही अनेक विद्यार्थी कोणत्याच विषयावर स्वतंत्रपणे आपले विचार मांडू शकत नाहीत हे अनुभवास येते. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांना कधी विचार करण्यास प्रवृत्तच केलेले नसते. अतिशय साध्या उपक्रमातूनही विचार करण्यास प्रवृत्त करता येऊ शकते. अगदी पाठ्यपुस्तकातील माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण करण्यास, त्या माहितीतील परस्पर संबंध शोधण्यास आणि त्यातून निष्कर्ष काढण्यास प्रोत्साहित केले तर ही विचारशक्ती विकसित करता येऊ शकते असे प्रयत्न अगदीच कमी प्रमाणात दिसून येतात. परिणामस्वरूप अगदी प्राथमिक स्वरूपाचे निष्कर्ष काढण्याची क्षमताही विद्यार्थ्यांमध्ये विकसित होत नाही.

* अध्यापनातून विद्यार्थ्यांना विविध ग्रंथाचे संदर्भ मिळावेत. संशोधनातील निष्कर्षाचा परिचय व्हावा ग्रंथालयातील नव्या ग्रंथांची माहिती व्हावी, ते ग्रंथ वाचण्याची उत्सुकता निर्माण व्हावी अशी अपेक्षा असते. याशिवाय नियतकालिके, अहवाल, विश्वकोश, माहिती कोष यासारख्या संदर्भ साहित्यातील संदर्भ शोधण्याची उत्सुकता व क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होईल याचाही प्रयत्न उच्च शिक्षणातील अध्यापनातून व्हायला हवा. अर्थात त्यासाठी प्राध्यापकाने या संदर्भ साहित्याचा आपल्या अध्ययनात भरपूर उपयोग केला असणे गरजेचे आहे. तरच त्याच्या अध्यापनातून संदर्भ साहित्याचा विद्यार्थ्यांना परिचय होईलव ते वाचण्याची प्रेरणा मिळेल. संदर्भसाहित्याचा विद्यार्थ्यांना परिचय होईल आणि ते वाचण्याची उत्सुकता निर्माण होईल असे अध्यापन आता दुर्मिळ झालेले आहे. विद्यार्थ्यांनि स्वयंप्रेरणेने व उत्सुकतेने या साहित्याचा उपयोग केला नसेल आणि प्राध्यापकांच्या अध्यापनातून त्याला या साहित्याचा परिचयही झाला नसेल तर पुढे संशोधन करतांना त्याला असंख्य समस्यांचा सामना करावा लागतो.

* प्राध्यापक आपल्या संशोधनपर लेखनातूनही विद्यार्थ्यांना एकप्रकारे मार्गदर्शनच करीत असतो. काही अपवाद वगळता विविध नियतकालिकांत प्रकाशित होणारे प्राध्यापकांचे लेख बघितले तर त्या लेखांत अनेकदा विशिष्ट विषयावरील विविध ग्रंथ, नियतकालिके किंवा इंटरनेटवरील कोणत्यातरी संकेत स्थळावरुन विशिष्ट विषयावरील अवतरणे आणि परिच्छेद घेऊन ते लेखात एकामागून एक लिहिण्याचे सहज लक्षात येते. अनेकदा त्या परिच्छेदांचा किंवा अवतरणांचा परस्परांशी काहीही संबंध नसतो. ती अवतरणे अपुरी, चुकीच्या ठिकाणी संपादित केलेली आणि अनावश्यक असतात. लेखात जास्तीत जास्त तळटिपा असणे म्हणजे संशोधनपर लेखन करणे अशी अनेकांची कल्पना असते. अनेकदा तर लेखकाने लेखात कोणताच निष्कर्ष काढलेला नसतो. निष्कर्षात कोणताही नवीन विचार मांडण्याचा प्रयत्न नसतो. कोणताही नवीन विचार मांडण्याचा प्रयत्न नसतो. कारण नवीन विचार केलेलाच नसतो. कोणताही नवीन विचार, विषयाचे नवे आकलन, नवा दृष्टिकोन, प्रश्नांची सूत्रबध्दपणे केलेली मांडणी असे काहीच नवे नसलेले अनेक लेख संशोधनपर लेख लिहिले जातात. अशा वेळी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना संशोधनपर लेखन कसे करावे याचे मार्गदर्शन करण्याची खरोखर किती जणांची क्षमता आहे हा प्रश्नच आहे.

* विद्यार्थ्यांना छोटेछोटे विषय देऊन त्या विषयांबद्दल माहिती गोळा करण्याची, त्या विषयातील तज्ज्ञांशी चर्चा करण्याची, त्या विषयाचे स्वरूप जाणून घेण्याची संधी व या अभ्यासाच्या आधारावर अहवाल लेखनाची अध्ययन पध्दती खरेतर उच्च शिक्षणातील शिक्षणाचा भाग व्हायला हवी. त्यादृष्टीने अभ्यासक्रमाची

पुनर्रचना करायला हवी. पण अभ्यासक्रमात नसले तरी असा अभ्यास करण्याचा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देता येऊ शकते. त्यादृष्टीने उच्च शिक्षणात प्रयत्न होतांना दिसत नाही. त्यामुळेच व्यापक स्तरावर सर्व विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची सवय व आवड निर्माण करण्यास अपयश येत आहे. संशोधनाद्वारे प्रश्नांचा अभ्यास करणे, प्रश्नांची उत्तरे शोधणे हे मागासलेल्या देशात मोठ्या प्रमाणात व्हावे लागते. संशोधन आणि अध्ययन हे विकास घडवून आणण्याचे एक प्रभावी साधन असते. त्यादृष्टीने मोठ्या प्रमाणात संशोधकाची आपल्याला गरज आहे. प्रकल्पकेंद्री अभ्यास त्यादृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरतो. परंतु या पध्दतीकडे सध्या काही अपवाद वगळता उच्च शिक्षणसंस्थेत दुर्लक्ष होताना दिसून येत आहे.

**निष्कर्ष:**

सध्याच्या पध्दतीत वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणारी अध्यापन पध्दती आपल्याला विकसित करायची आहे. कारण विकास सर्वांचा करायचा आहे. त्यासाठी संवाद, चर्चा, विचारांचे आदानप्रदान, परिसंवाद, सादरीकरण आणि प्रकल्पकेंद्री अध्ययन अशा सर्वांना लागू केल्या जाणाऱ्या अध्यापन पध्दतींना उत्तम दर्जाच्या विद्यापीठांमध्ये केंद्रस्थान मिळत आहे. आपल्याकडे अजूनही व्याख्यानकेंद्री, प्राध्यापककेंद्री आणि परीक्षाकेंद्री अध्यापन सुरू आहे. हे आपल्या आजच्या अनेक प्रश्नांचे मूलभूत कारण आहे. हे जेवढे लवकर आपल्याला समजेल तेवढे उत्तम नव्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने सक्षम करणाऱ्या नव्या आव्हानात्मक अध्यापन पध्दतीचा स्वीकार करण्याचे महत्त्व आपल्याला जितक्या लवकर कळेल तेवढे बरे. आपल्याला बेकारांची फौज निर्माण करायची नसून स्वावलंबी, सक्षम आणि स्वतंत्र प्रज्ञेने विचार करण्याची क्षमता असलेली नवी पिढी घडवायची आहे. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण सहभाग असलेली अध्यापन पध्दती स्वीकारणे क्रमप्राप्त आहे.

**संदर्भ ग्रंथसूची:**

१) वाघमारे, जनार्दन – शिक्षण आणि समाज परिवर्तन, लोकवाङ्मय प्रकाशन, जून २००५.

२) डॉ. आंबेडकर, बाबासाहेब – दलितांचे शिक्षण (अनुवाद प्रा. देवीदास घोडेस्वार), समता प्रकाशन, नागपूर (१९९४)

३) चेन्नई घोषणापत्र – शिक्षा अधिकार मंच, भोपाल, नोव्हेंबर-२०१२

४) विश्व व्यापार संगठन ; (WTO) समझौता या गुलामी है? – अखिल भारत शिक्षा अधिकार मंच, डिसेंबर-२०१५

५) डॉ. आगलावे, प्रदीप – भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१५, पृष्ठ क्र.१८३ ते १९४

६) National Knowledge Commission Note on Higher Education, 29th November, 2016

* * *

# उच्च शिक्षणातील समकालीन संदर्भ
## (राष्ट्रवाद व मानवी मूल्यांबाबतची अरिष्टे)

प्रा. डॉ. मोहन नगराळे

**प्रस्तावना :**

भारतात उच्च शिक्षणाची सुरुवात १८५७ मध्ये कलकत्ता, मुंबई आणि मद्रास येथे स्थापन केलेल्या विद्यापीठापासून झाली. सुरुवातीला या उच्च शिक्षणाचे माध्यम इंग्रजी हे होते. या शिक्षणाचा हेतू ब्रिटिश शासन पध्दती चालविण्यासाठी लागणारे मनुष्यबळ निर्माण करणे हा होता. याचा दुसरा परिणाम असा झाला की,पाश्चात्य शिक्षण घेऊन नव अभिजन वर्ग आपल्या समाजातील दृष्ट प्रथांचा नायनाट करण्यास प्रबोधन करू लागले. यातून राष्ट्रवादाची भावना प्रसारित होऊ लागली. तसेच भारतातील पारंपरिक शिक्षण पध्दती अमूलाग्र बदल होण्यास प्रारंभ झाला. महिला, दलित, आदिवासी यांच्या शिक्षणाची निकड या नव अभिजनांनी व्यक्त केली. भारतात आधुनिकता तसेच उत्तर.आधुनिकता या घटनेने शिक्षणाचे स्वरुप पुन्हा पालटू लागले. शिक्षण हे खासगी क्षेत्राकडे सुपूर्द केले जाऊ लागले. त्यातून शिक्षण हे चारित्र्य निर्माण सामाजिक समता या मूल्यांची पायभरणी करण्याऐवजी ते समाजात व्यक्तिवाद, उपभोगवाद आणि रोजगारावर अधिक भर यामुळे शिक्षणाचा मुळ आत्मा आज हरवलेला आहे. हा आशय प्रस्तुत निबंधात लेखकाने मांडला आहे.

स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजातील उच्च शिक्षण हे मॅकॉलेच्या शिक्षण प्रणालीप्रमाणेच सुरु ठेवल्या गेले. ब्रिटिशांची शिक्षण पद्धती भारतावरचे राज्य चालविण्यास अनुकूल असाच नोकरवर्ग घडविणे या विचारावरच राहिली. यातून राज्यसभेला पोषक व तिला शरण जाणारी व्यक्तिमत्त्वेच त्याद्वारे निर्मिती करण्यात आली. औद्योगिक वा भांडवली अर्थव्यवस्थेला अनुरूप असेच शिक्षण, प्रशिक्षण, व्यावसायिक शिक्षण केवळ प्रस्थापितांनाच मिळेल अशी व्यवस्था शिक्षणातून केल्या गेली. मागास जातींकडे हे शिक्षण हळूहळू झिरपेल या विचारांवर महात्मा फुले वगळता तत्कालीन महाराष्ट्रातील अनेक समाज सुधारकांचा विश्वास राहिला. शिक्षण व्यवस्था आणि अर्थव्यवस्था यांच्या जवळचा संबंध असतो. आर्थिक विकासासाठी लागणारे कुशल मानवी संसाधन उच्च शिक्षणातून निर्माण केले जाते. उच्च शिक्षणावर खर्च करण्याची तयारी प्रस्थापित श्रीमंतांचीच असल्याने त्यांचीच मुले उच्च शिक्षण घेऊन समाजातील उच्च पदांवर अविरोधपणे आपले बस्तान बसवितात. अशा स्थितीत समता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय ही मानवी मूल्ये नाकारलेच जातात. शिक्षण हे व्यक्ती विकास आणि चारित्र्य निर्माणाचे साधन तर आहेच पण ते सामाजिक परिवर्तनाचेही माध्यम मानले जाते. इ.स. १९९६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांत हीच अपेक्षा व्यक्त केली आहे.

भारतातील प्रस्थापित विषमतेचे निर्मुलन करुन समाजाची समता, स्वातंत्र्य, न्याय या मानवी मूल्यांवर पूनर्मांडणी करण्याची योजना शिक्षणविषयक धोरणांतून केल्या गेली. पण जर शिक्षण हे राज्याच्या अखत्यारीत असते. शिक्षणाचे राष्ट्रीयकरण झाले असते. शिक्षण हे सरकारचे कर्तव्य बनले असते तर कदाचित शिक्षणातून

समाजशास्त्र विभाग प्रमुख, आर. एस. मुंडले धरमपेठ कला, वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

संविधानाधारित तत्त्वांच्या पायांवर समाजाची जडण.घडण करता आली असती. शिक्षण हे खाजगी संस्थांकडे दिल्याने शिक्षण सम्राटांनी मात्र या तत्त्वाची पायमल्लीच केली. शिक्षणासारख्या क्षेत्रात शोषण, पिळवणूक, भ्रष्टाचार या सारख्या दोषांनी धुडगूस घातला आहे.

शिक्षणांत राजकारणाचा हस्तक्षेप ही एक विघटनकारी समस्या मानली पाहिजे. राजकीय अभिजनांकडून शिक्षणाच्या माध्यमातून संकीर्ण मूल्यांचा प्रसार केला जावू शकतो. कारण भारत हे धर्मनिरपेक्ष व लोकशाही असलेले राष्ट्रतर आहेच पण जाती व्यवस्था, भाषावाद, प्रादेशिकता यासारख्या तत्त्वांद्वारे एकात्मतेस अडसर असणाऱ्या घटकांचाही शिक्षणातून वावर होऊ शकतो. त्यातून सामाजिक असंतुल निर्माण होऊ शकते. म्हणून भारतासारख्या बहु सांस्कृतिक समाजात शिक्षणातून विघटनकारी धोके निर्माण होऊ लागले आहेत. ही शिक्षणाची एक काळी बाजूच मानली पाहिजे.

शिक्षण हे लोकशाहीचा आधार असतो. लोकशाही प्रस्थापित करण्यात शिक्षणाला महत्त्व असल्याचे जॉन ड्यूई यांनी जोरकसपणे सांगितले. लोकशाहीवर खऱ्या अथनि श्रद्धा असणारे लोक शिक्षणातून मानवी कल्याणास सहाय्यक असणारी मूल्येच प्रचार, प्रसारित करीत असतात. इ.स. १९९० नंतरच्या भारताच्या शिक्षण व्यवस्था आणि अर्थव्यवस्था यांनी तर पारंपरिक स्तरीकरणाचे अथवा विषमतेचे पुनरूज्जीवीकरण केल्याचे अनुभवास येत आहे. अर्थात आजचे शिक्षण भारतातील विषमता टिकून कशी राहील याच प्रयत्नांत दिसत आहे. शैक्षणिक संस्थांची त्यातूनच एक उतरंड तयार झाली. यासारख्या उच्चतम शैक्षणिक संस्था समाजातील उच्चभ्रूच्याच चिरंजीवांकरिता स्थापन झाल्यास भास होत आहे. त्यामुळेच गुणवत्तेच्या नावाखाली या उच्चतम शिक्षण संस्थांत आर्थिक मागासलेल्या गुणवान मुलांच्या आरक्षणाचा या प्रस्थापितांकडून कंठारवाने विरोध केल्या जातो. आर्थिक मागासलेल्यांसाठी इतर शैक्षणिक संस्थांच्या झोपडपट्ट्या तयार करण्यात आल्या आहे. या झोपडपट्ट्यातून बेरोजगारांचेच तांडे बाहेर पडतात. समाजाचे ध्रुवीकरण यातून टिकून राहण्यास मदतच होत राहते. आज समाजांत द्वद्वांत्मक विरोधाभासाची स्थिती उत्पन्न झाली आहे. एकीकडे भारतीय संविधानाने सर्व प्रकारच्या विषमता आणि सामाजिक भेदाभेद संपविण्याची भाषा केली आहे. मात्र प्रत्यक्षात हे शिक्षणसंस्थाद्वारे विषमता, भेदाभेद या तत्त्वांनाच मोकळीक दिलेली दिसते. धर्मनिरपेक्षता, राज्य, समाजवाद, लोकतंत्र ही तत्त्वे केवळ वाचिक होवून बसले आहेत. शिक्षणाकडून सुद्धा ही तत्वे पायदळी तुडविली जातात.

श्री जे. पी. नाईक यांनी १९४७ ते १९८१ पर्यंतच्या शिक्षण व्यवस्थेविषयी म्हटले की, "स्वातंत्र्यानंतर जो प्रस्थापितांचा वर्ग सत्तेवर आला त्याची अशी इच्छा होती की, उच्च शिक्षणाचा दर्जा वाढावाच कारण त्यामुळे आपण आंतरराष्ट्रीय दर्जाला पोचू पण उच्च शिक्षण हे अशाच प्रस्थापितांकरिता मर्यादित रहावे." इ.स. १९४७ पासूनच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विचार केला तर ही गोष्ट स्पष्ट होण्यास मदत मिळते.

डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक तत्वज्ञान लक्षात घेतल्यास शिक्षणाचा उद्देश काय असावा याचे चांगले स्पष्टीकरण मिळते. जे. व्ही. राघवेंद्रराव यांनी डॉ. आंबेडकरांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाची मांडणी करतांना शिक्षण हे सत्याचा षोध आणि मानवतेचा व्यवहार या दोन मानवी मूल्यांच्या प्राप्ती करताच असावा हे सांगितले. डॉ. आंबेडकरांना ही मानवी मूल्ये भगवान बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून आणि जॉन ड्यूई या शिक्षणतज्ञाकडून परिचीत झाली होती. आजच्या शिक्षणाचा विचार केल्यास डॉ. आंबेडकरांच्या शिक्षणविषयक विचाराकडे आपण कशी

डोळेझाक केली आहे हे लक्षात येते.

डॉ. आंबेडकरांनी १९४६ साली पिपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन करुन समाजातील दलित, पीडितांच्या मुलां-मुलींना उच्च शिक्षण देवून त्यांच्यात मानवता रुजावी, मानवी हक्कांची जाण व्हावी, राष्ट्रीय मूल्यांचे अंतरीकरण व्हावे, भारताची सांस्कृतिक एकता अखंडीत रहावी हाच प्रयत्न केला आहे. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून शाश्वत आणि निरंतर सामाजिक विकासातून क्रांतीकारक बदलासाठी समाजाची रचना, समता, स्वातंत्र्य, न्याय व मानवता या मानवी मूल्यांवर आधारित मांडणी करणे गरजेचे होते. त्याकरिता आपणांस भविष्यात समतावादी समाज अपेक्षित असल्यास त्याची पूर्वतयारी म्हणून शिक्षणाद्वारे याची शिकवण देणे आवश्यक आहे. भारतातील दीन, दलित, पीडितांना पिढ्यान्‌पिढ्या शिक्षणापासून वंचित ठेवल्याने समाजाचे दोन जग तयार झालेत. समाजातील ही दरी बुजविण्यासाठी शिक्षणाची जबाबदारी सरकारनेच घ्यावी अशी आग्रही भूमिका डॉ. आंबेडकर आपल्या राज्य समाजवादाच्या संकल्पनेत मांडतात.

शिक्षण जर खाजगी कंपन्यांनी होती घेतल्यास शिक्षणाचे बाजारीकरण तर होईलच पण त्यातून व्यक्तिवाद, भौतिकवाद या विघटनकारी तत्त्वांचे समाजांत रान माजेल. राष्ट्रीय मूल्ये, चारित्र्य, राष्ट्रवाद, लोकशाही ही मूल्ये केवळ शोभेचे ठरतील. त्यातून भारताचे अमेरिका आणि लंडन झाल्याशिवाय राहणार नाही.

**समारोप :**

एक गोष्ट नक्की आहे की, भांडवली अर्थव्यवस्था व तिच्या सावलीत चालणारी शिक्षण व्यवस्था यांच्या योगाने समाजात फार मोठी घुसळण होवून राहिली आहे. त्यातून कदाचित अतिशय अस्वस्थता व उद्रेक घडून येईल किंवा आपल्या समाजात जी स्थितिस्थापकता आहे. तिच्यात ही घुसळण मिसळून आर्थिक समृद्धी आणि शैक्षणिक उन्नतीची वाटचाल करीत राहील.

सध्याच्या शैक्षणिक सुधारणांबाबत येथे डॉ. उत्तम भोईटे यांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांनी या विषयावरील अधिवेशनांत खालील विचार व्यक्त केले आहे. यांचे विचार या ठिकाणी समर्पक असे आहे. त्यांचे हे विचार या शोधनिबंधाचा सार आहे. शिक्षणाद्वारा मानवी मूल्यांची प्रस्थापना करण्यासाठी समाजातील वंचितांना, सिमांत वर्गीयांना, अल्पसंख्यांकांना व महिलांना उच्च शिक्षण उपलब्ध करुन देणे आजच्या काळाची गरज आहे. आणि हे कार्य सरकारद्वारा नि:स्वार्थबुद्धीने केले पाहिजे तेव्हाच भारत हा ज्ञानात्मक समाज होईल असे प्रस्तुत अभ्यासकाला वाटते.

**संदर्भ :**

१ डॉ. हजारे राहूल, उच्च शिक्षण आणि मानवी मूल्ये जोपासण्याचे आव्हान, डॉ. दिलीप खैरनार, संपा. भारतीय समाजातील नैतिक मूल्ये, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९, पृ. क्र.१४२.

२. नाईक जे. पी., एज्यूकेशन कमीशन ॲण्ड आफ्टर, अलाइड पब्लिकेशन, न्यू दिल्ली. १९८२, पृ. १५९

* * *

# महिलांच्या सक्षक्तीकरणावर प्रकाशझोत टाकणारा ग्रंथ

('कै. जय जोशी' उत्कृष्ट ग्रंथ (२०१४) पुरस्कार प्राप्त डॉ. दीपक पवार यांच्या
'महिलांचे राजकीय सक्षमीकरण' ग्रंथाचे समीक्षण)

समीक्षक : डॉ. सरोज आगलावे

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने दिला जाणारा समाजशास्त्रातील सन २०१४ चा "कै. जय जोशी उत्कृष्ट पाठ्य पुस्तक/संदर्भ ग्रंथ पुरस्कार डॉ. दीपक पवार यांच्या 'महिलांचे राजकीय सक्षमीकरण' या ग्रंथास प्रदान करण्यात आला.

डॉ. दीपक पवार यांच्या 'महिलांचे राजकीय सक्षमीकरण' या संशोधनपर संदर्भ नागपूरच्या श्री. साईनाथ प्रकाशन या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेला आहे. या ग्रंथात डॉ. पवार यांनी भारतातील महिलांची स्थिती व दर्जाची अभ्यासपूर्ण संदर्भासहित मांडणी करून महिलांच्या सक्षमीकरणात, महिलांचा राजकीय सहभाग हा प्रभावी आणि महत्त्वपूर्ण घटक आहे, हे सिद्ध केलेले आहे. समाज व्यवस्थेच्या दृष्टीने पाहिले तर स्त्री आणि पुरुष दोघेही समान आहेत. समाजाला प्रगतीच्या दिशेने न्यायचे असेल तर दोघांचाही विकास होणे आवश्यक आहे. परंतु भारतासह इतर सर्व देशांत अगदी इसवी सन पूर्व काळापासून तर आजपर्यंत समाज व्यवस्थेने स्त्रीला गौणच स्थान दिले आहे. महिलांमध्ये पुरुषांप्रमाणेच सर्व क्षमता असतांना 'चूल आणि मूल' या पलीकडे तिला जाऊ दिले नाही. सिंधू काळात महिलांना अनेक अधिकार होते. पण वैदिक आणि उत्तर वैदिक काळात स्त्रियांवर अनेक बंधने लादून सर्व अधिकारांपासून तिला वंचित करण्यात आले. बौध्द काळात महिलांच्या स्थिती व दर्जात वाढ झाली, पण बौध्द काळानंतर स्मृती व पुराण काळात अनेक बंधने लादून स्त्रियांचे सर्व अधिकार काढून भौतिक वस्तुरूप बनविण्यात आले. मध्ययुगीन काळात स्त्रियांची स्थिती नको इतकी खालावली व त्यांची तुलना ढोर, गवार आणि पशु यांसोबत होऊ लागली. इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावाने काही सुशिक्षित मंडळींवर समतेच्या विचारांचा प्रभाव पडला आणि महिलांच्या स्थितीत सुधारणा होण्यास सुरुवात झाली. सावित्रीबाई फुले व ज्योतिराव फुले यांच्या प्रयत्नाने स्त्रियांना शिक्षण घेण्याची संधी मिळाली. महिला शिक्षण घेऊ लागल्या तसेच त्यांच्यावर पश्चिमात्त्य विचारांचा प्रभाव पडला. महिला प्रचंड संख्येने स्वातंत्र्याच्या आंदोलनात सहभागी झाल्या, काही महिलांनी आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटविला.

**पुस्तक परीक्षण**

स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नामुळे महिलांना संविधानात अनेक अधिकार व हक्क देण्यात आले. त्याचबरोबर महिलांच्या स्थिती व दर्जात वाढ करणारे अनेक कायदे अमलात आले. स्त्रियांमध्ये जागृती निर्माण होऊन शिक्षित स्त्रियांचा एक वर्ग निर्माण

विभागप्रमुख व सहयोगी प्राध्यापिका, महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर
E-mail : sarojaglave@gmail.com Mob.९६०४३४६९८९

झाला. याच सुमारास आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर महिला सुधार चळवळीने वेग घेतला. त्यामुळे भारतीय लोकशाही प्रक्रियेत महिलांना समान संधी देण्याची मागणी पुढे आली. २४ एप्रिल १९९३ ला महिलांना स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायती राजमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याकरिता ७३ आणि ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली आणि स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायती राज मधील जागावर त्याचबरोबर त्यातील पदांवर ३३ टक्के आरक्षण देण्यात आले.

आरक्षणामुळे अनेक महिला राजकारणात आल्यात. त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. त्याचबरोबर पक्षीय राजकारणात देखील महिलांचा सहभाग वाढला. पक्ष पातळीवर महिलांनी छाप पाडली. याचाच परिणाम म्हणून हे आरक्षण महाराष्ट्रात १४ एप्रिल २०११ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी १७ टक्क्यांनी वाढवून ते एकूण ५० टक्के करण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायती राजप्रमाणे संसद व विधिमंडळातही महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळावे ही मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायती राजमधील आरक्षणामुळेच महिला Grass root level ला का असेना, मोठ्या प्रमाणात राजकारणात आहे. त्यांचे राजकीय सामाजिकीकरण होत आहे. त्यामुळेच महिला काही अधिकारयुक्त स्थानांवर, काही पक्षीय राजकारणात तर काही विरोधी पक्षांत प्रभावी आहेत. राजकारणातील सक्रिय सहभागामुळे त्यांच्या राजकीय आणि सामाजिक आकांक्षा उंचावल्या आहेत. पुरुषी वर्चस्वाच्या राजकीय क्षेत्रात महिलांनी प्रवेश केल्याने महिलांच्या परंपरागत सामाजिक दर्जा व भूमिका आणि स्थानांत परिवर्तन झाले आहे. राजकीय सहभाग हा महिलांच्या सक्षमीकरणाकरिता महत्त्वपूर्ण ठरला आहे. अशा प्रकारचे निष्कर्ष डॉ. दीपक पवार यांनी आपल्या संशोधनातून महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाचे समाजशास्त्रीय अध्ययन प्रस्तुत ग्रंथात मांडले आहे.

डॉ. दीपक पवार यांचा हा संशोधनपर ग्रंथ महिला सशक्तीकरण आणि पुरुषांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. हा ग्रंथ महिलांना प्रेरणा देणारा आणि त्यांच्यात स्वविश्वास निर्माण करणारा आहे. तसेच महिला सक्षमीकरण होण्याकरिता किंवा घडवून आणण्याकरिता अनेक महत्त्वपूर्ण घटक आहेत, पण राजकीय सत्ता व अधिकार आणि निर्णय महिलांकडे असेल तरच महिलांचे संपूर्ण आणि निरंतर सक्षमीकरण होऊ शकते. हेच या ग्रंथाचे वैचारिक आणि संशोधनपर महत्त्व आहे. प्रत्येक सृजनाने हा ग्रंथ वाचावा हा माझा आग्रह राहील.

* * *

## २५ व्या अधिवेशनाचा अहवाल

मराठी समाजशास्त्र परिषदेचे २५ वे अधिवेशन कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे डॉ. अरविंद ब. तेलंग वरिष्ठ महाविद्यालय, निगडी, पुणे-४४ येथे २६ व २७ डिसेंबर २०१४ रोजी संपन्न झाले. अध्यक्ष या नात्याने अधिवेशनाचा अहवाल थोडक्यात देत आहे.

या अधिवेशनाचा मुख्य विषय **''भारतीय समाजासमोरील आव्हाने''** असा होता.

या अधिवेशनाचे उद्घाटन शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०१४ रोजी सकाळी १० वाजता संपन्न झाले. या उद्घाटक म्हणून मा. डॉ. द. ना. धनागरे सर (ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ व माजी कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) लाभले तर बीजभाषक म्हणून प्रा. डॉ. आनंद कुमार सर (अध्यक्ष, इंडियन सोशियॉलॉजिकल सोसायटी, नवी दिल्ली) लाभले, तर परिषदेच्या दुसऱ्या सत्रामध्ये 'भारतीय समाजशास्त्राचा विकास' या विषयावरील परिसंवादामध्ये सुद्धा डॉ. द. ना. धनागरे सरांनी अध्यक्ष स्थान भूषविले तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. आनंद कुमार सर, प्रा. डॉ. सी. एस.एस. ठाकूर सर (राणी दुर्गावती विद्यापीठ, जबलपूर, मध्य प्रदेश) डॉ. प्रांजल सरमा (दिब्रुगड विद्यापीठ, आसाम) उपस्थित होते.

परिषदेच्या तिसऱ्या सत्रामध्ये प्रमुख वक्ते म्हणून (डॉ. श्रुती तांबे मॅडम सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे) व डॉ. संपत काळे सर (टाटा समाजविज्ञान संस्था, तुळजापूर) हे उपस्थित होते तर या सत्राचे अध्यक्षपद डॉ. स्मिता अवचार मॅडम यांनी भूषविले.

परिषेदेचे चौथे सत्र 'इरावती कर्वे स्मृती व्याख्यान' या सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉ. स्मिता अवचार मॅडम यांनी अध्यक्ष स्थान भूषविले तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. विद्युत भागवत यांनी 'इरावती कर्वे यांचे स्त्रीवादी आकलन' या विषयावर व्याख्यान दिले. परिषदेचे पाचवे सत्र हे शोधनिबंध सादरीकरणाचे होते. एकूण ११० शोधनिबंध सादर झाले.

या अधिवेशनाचा समारोप दि. २७ डिसेंबर २०१४ रोजी सायंकाळी ४ ते ६ दरम्यान झाला. या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. उत्तमराव भोईटे सर (ज्येष्ठ समाजशास्त्र व माजी कुलगुरू भारती विद्यापीठ, पुणे) यांची प्रमुख उपस्थिती होती. तर अध्यक्ष म्हणून डॉ. व्ही. बी. गायकवाड सर (संचालक, बी.सी.यु.डी. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे) यांनी स्थान भूषविले.

कै. जय जोशी उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार २०१४ डॉ. दीपक पवार यांच्या 'महिलांचे राजकीय सक्षमीकरण' या ग्रंथास देण्यात आला. तर कै. अनुराधा भोईटे उत्कृष्ट प्रकाशित लेख पुरस्कार डॉ. राहुल भगत यांना देण्यात आला.

संपूर्ण परिषदेसाठी २०० समाजशास्त्राचे अभ्यासक उपस्थित होते.

* * *

## समाजशास्त्र संशोधन पत्रिका या वार्षिक नियतकालिकाचे स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन
### ( नियतकालिकांच्या नोंदवणीविषयी नियम ८ प्रमाणे )

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाशन स्थळ | : | मराठी समाजशास्त्र परिषद,<br>द्वारा – समाजशास्त्र विभाग,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद ४३१ ००४ |
| २) | नियतकाल | : | वार्षिक |
| ३) | मुद्रकाचे नाव | : | रुद्रायणी ऑफसेट, औरंगाबाद |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | एम.आय.डी.सी. एरिया, चिकलठाणा परिसर, औरंगाबाद |
| ४) | मुद्रण स्थळ | : | रुद्रायणी ऑफसेट, औरंगाबाद |
| ५) | प्रकाशकाचे नाव | : | डॉ. स्मिता अवचार |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | समाजशास्त्र विभाग,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद ४३१ ००४ |
| ६) | संपादकाचे नाव | : | डॉ. स्मिता अवचार |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | स्तंभ ५ प्रमाणे |
| ७) | मालकाचे नाव | : | मराठी समाजशास्त्र परिषद |
| | पत्ता | : | वरीलप्रमाणे |

मी डॉ. स्मिता अवचार असे जाहीर करते की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

डॉ. स्मिता अवचार
प्रकाशक व संपादक